
चरित्र
692

५८



REFBK-0008941
विषय चरित्र
सं. नं. 692

# जयप्रकाश नारायण

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........ वि:
क्रमांक ........ नों: दि

लेखक
श्री. यदुनाथ थत्ते

REFBK-0008941

मूल्य दीड रुपया

चित्रशाळा प्रकाशन, पुणें २.

सर्व हक्क लेखकाधीन.

आवृत्ति पाहिली.

★

मुद्रक व प्रकाशक :
दामोदर त्र्यंबक जोशी,
बी. ए. (टिळक),
व्यवस्थापक, चित्रशाळा प्रेस,
१०२६, सदाशिव, पुणें २.

# निवेदन

हिंदुस्थानांतील थोर नेत्यांत जयप्रकाशांची गणना होते. स्वातंत्र्याच्या लढ्यांत त्यांनीं अपूर्व अशी कामगिरी बजावलेली आहे. आतां आर्थिक व सामाजिक विषमतेच्या विरुद्ध चाललेल्या लढ्यांतहि ते अग्रभागीं आहेत. जनशक्तीवर त्यांचा अत्यंत भरंवसा आहे. शासनतंत्र हातीं घेऊन तें राबवण्यापेक्षां शासनतंत्रावर अंकुश ठेवूं शकेल असें प्रभावी लोकमत निर्माण करणें लोकशाहीला अधिक हितावह आहे असें त्यांना वाटतें. सतत जागरूकता हीच लोकशाहीची हमी असते. लोकांत ही जागरूकता यावी म्हणून भूदान–यज्ञाच्या कार्यास त्यांनीं स्वतःला वाहून घेतलें आहे.

मराठी भाषेंत जयप्रकाशांचें चांगलेंसें चारित्र उपलब्ध नसल्यानें ती उणीव भरून काढावी म्हणून हें चारित्र प्रकाशित होत आहे. यापूर्वी श्री. बा. न. राजहंस व श्री. मधु पान्वलकर यांनीं लिहिलेलीं जयप्रकाशांचीं चरित्रें प्रकाशित झालीं होतीं; परंतु तीं आज मिळूं शकत नाहींत. ह्या पुस्तकामुळें जयप्रकाशांच्या जीवनाचा व विचारांचा परिचय मराठी वाचकांना होऊं शकेल अशी आशा आहे.

देवळी तुरुंगांतील अन्नसत्याग्रहाच्या वेळीं जयप्रकाशांची माहिती प्रथम मला मिळाली व त्यांच्या जीवनाबद्दल कुतूहल जागें झालें. तेव्हांपासून त्यांच्या चरित्राचें अधिकाधिक आकर्षण मला वाटत गेलें. त्यांचें जीवन समजून घेण्याचा मीं जो प्रयत्न केला त्यांतून ह्या चरित्राचा आराखडा माझ्यासमोर आला. मराठी वाचकांना हें चरित्र आवडेल अशी आशा आहे.

—यदुनाथ थत्ते.

# : अनुक्रम :


| | |
|---|---|
| १. प्रथम जीवनदानी | १ |
| २. दास्यमुक्तीची प्रतिज्ञा | १४ |
| ३. जीवनाची घडण | २३ |
| ४. जनसत्तेची उपासना | ३४ |
| ५. पिंजऱ्यांतून सुटका | ४५ |
| ६. करेंगे या मरेंगे | ५४ |
| ७. गांधीजी आणि जयप्रकाश | ६० |
| ८. स्वातंत्र्योत्तर नेतृत्व | ७६ |
| ९. सदाचाराची प्रेरणा | ८५ |
| १०. परमधामच्या परिसरांत | ९२ |
| ११. समाजवादाचा किमान कार्यक्रम | १०१ |
| १२. चिंतन | ११० |
| १३. भूदान-यात्रा | १२१ |

# प्रथम जीवनदानी

अनेक देशभक्तांच्या अनेकविध प्रयत्नांमुळें आणि जागतिक परिस्थितीच्या दबावानें १९४७ च्या १५ ऑगस्टला भारतावरील आपलें राजकीय वर्चस्व स्वेच्छेनें काढून घेऊन इंग्रजांनीं जगाच्या इतिहासांतलें एक महत्त्वपूर्ण पान लिहिलें. देशाच्या भवितव्याचीं सर्व सूत्रें भारतीय नेत्यांच्या हातीं आलीं. स्वातंत्र्य मिळतांना देशाचे दोन स्वतंत्र हिस्से झाले होते. भूमीच्या विभागणीबरोबर हृदयांची विभागणी होऊं नये यासाठीं गांधीजी जिवापाड कष्ट करीत होते. आपलें सर्वस्व त्यांनीं जणुं पणाला लावलें होतें.

देशाच्या पुनर्रचनेचाहि प्रश्न होता. स्वातंत्र्य मिळणें याचा अर्थ आपल्या मार्गांतला अडथळा दूर होणें. शेतांतले दगडगोटे दूर सारून कृतकृत्य होणारा शेतकरी आणि परक्यांचें दास्य संपल्यामुळें जीवनाची सार्थकता मानणारा देशभक्त दोघेहि एकाच लायकीचे ठरतात. दगडगोटे दूर सारून शेत साफ केल्यानंतरच संपूर्ण पुरुषार्थ पणाला लावून त्या शेताची मशागत करायला हवी असते, त्यांतून मोत्याचे दाणे निर्माण करायचे असतात. त्याप्रमाणेंच परदास्य गेल्यानंतरच सर्व शक्ति एकवटून देशाची पुनर्रचना करावयाची असते. स्वातंत्र्याच्या साधनानें देशांत समता, समृद्धि आणि संस्कृति फुलवायची असते. राजकीय स्वातंत्र्याचा लोकशाहींत विकास करून आर्थिक व सामाजिक क्षेत्रांत ही लोकशाही दाखल व्हावी यासाठीं प्रयत्न करावयाचा असतो.

पण स्वातंत्र्याच्या आनंदानें अनेक बेहोश झाले. कांहींना स्वातंत्र्य-प्राप्ति हीच पुरुषार्थाची इतिकर्तव्यता असें वाटलें. कांहींना इच्छित ध्येयप्राप्तीमुळें समाधानाचा थकवा आला. उद्यांच्या भारताचें मानचित्र अनेकांच्या डोळ्यापुढें नव्हतें. कांहींनीं राज्यशकटाची जबाबदारी पत्करली आणि त्यांतच ते गुंतून गेले.

गांधीजी देशाच्या पुनर्रचनेचीं चित्रें रंगवीत होते. स्वातंत्र्यप्राप्ती-मुळें त्यांच्या जीवनांत नवोत्साह संचारला होता. देशापुढें नवनवीन कल्पना ते मांडीत होते. भंग्याची मुलगी राष्ट्रपति-पदावर आरूढ झालेली दिसली पाहिजे असें ते एका ठिकाणीं म्हणाले. हें एक वाक्य म्हणजे गांधीजींचें नवसमाज-दर्शन आहे. स्त्री-पुरुष समानता, सामाजिक विषमतेचा संपूर्ण निरास, सर्वांना समान संधि उपभोगतां येण्यासारखी सामाजिक, आर्थिक परिस्थिति निर्माण करणें अशा अनंत कल्पनांचें सूचन त्यांनीं ह्या एका वाक्यांतून केलें. समाजवादासंबंधीं आपल्या कल्पना ते प्रार्थना-प्रवचनांतून मांडीत. " देशांतील मार्क्स-वादी तरुण नेत्यांच्या जन्मापूर्वींच कामगारजीवनाशीं मी एकरूप झालों होतों, त्यांच्या लढ्यांशीं तादात्म्य पावलों होतों " असें ते सांगत होते. स्वतंत्र हिंदुस्थान क्षणभरहि आर्थिक विषमता सहन करणार नाहीं. ही आपली घोषणा व्यवहारांत आणण्यासाठीं रात्रंदिन त्यांचें चिंतन चालू होतें. कॉंग्रेस संस्थेचें रूपांतर लोकसेवक-संघांत करून देशांत विधायक लोकशाहीचा एक नवा आदर्श त्यांना निर्माण करावयाचा होता.

परंतु त्यांची शक्ति मुख्यत: जातीय ऐक्यासाठींच खर्च होत होती. रवींद्रनाथांनीं महिमा गायलेली, विविधतेंत ऐक्य पाहणारी, सर्वांचा समन्वय साधणारी संस्कृति निर्माण झाली पाहिजे. भारताचा हा महान् प्रयोग यशस्वी व विकसित करण्यासाठीं ते शक्ति वेंचीत

होते. सबंध देशाला आर्थिक व सामाजिक विषमतेविरुद्ध कटिबद्ध करण्यासाठीं त्यांच्या नेतृत्वाची आवश्यकता होती. पण जातिवैमनस्यें दूर करण्याच्या कार्यांत त्यांची आहुति पडली आणि देशांतील विद्वेषाची आग शांत झाली. निष्पाप रक्ताच्या आहुतीनेंच शेवटीं वैरें शमत असतात.

परंतु आर्थिक व सामाजिक विषमतेचा तर निरास झालाच पाहिजे; त्यासाठीं खटपट करणारे कोणी हवे. लोकशाहींत प्रगति साधावयाची म्हणजे पर्याय पक्ष हवाच. एक सत्ताधारी पक्ष व दुसरा सत्ताकांक्षी पक्ष. यांच्या साहाय्यानें राजकीय लोकशाही प्रगतिपर राहते. सत्ताधारी पक्षाची जागा कॉंग्रेसनें घेतली होती. जनतेला नव विचारांनीं प्रेरित करून आणि विधायक कार्य, अन्याय प्रतिकारक आर्थिक लढे आणि पंचवर्षीय निवडणुकी यांच्या मार्गानें पर्याय पक्षानें अधिकार मिळवायचा प्रयत्न करावयाचा. समाजवादी पक्षानें पर्याय पक्षाचें स्थान घ्यावयाचें ठरविलें.

पर्याय पक्षांत सत्तेच्या स्वीकाराची आकांक्षा धरणारे राजकीय नेते दाखल झाले. वर्गीय अन्यायांविरुद्ध झगडणारे कामगार नेते आले, किसान दाखल झाले. परंतु देशाची पुनर्रचना मुख्यत: सत्ता-स्वीकारानंतरच होऊं शकेल ही भावना त्यांत प्रबळ होती. त्यामुळें जनतेंत उत्साह संचारूं शकला नाहीं.

आपल्यावरील आर्थिक अन्याय निवारून घेण्यासाठीं झगडणारांमध्येंहि पुष्कळ वेळां स्वार्थाचीच भावना प्रबळ असे. सबंध समाजाचा आराखडा बदलण्याचें भान त्यांत क्वचितच दिसे. आपलें आर्थिक हित साधतांना आपल्यापेक्षां जे अधिक आर्थिक विपत्तींत आहेत त्यांच्यावरील अन्याय-निवारण व्हावें यासाठीं पोटतिडीक फारशी कोणाला वाटेना. भांडवलशाही समाज-रचनेचे पुरस्कर्ते आर्थिक

स्वातंत्र्याचा पुरस्कार करतांना असें म्हणत कीं प्रत्येक जण आपल्या फायद्याची जपणूक करूं लागला कीं आपोआपच सर्वांचें हित साधेल. म्हणून आर्थिक स्वातंत्र्य असावें. अप्रत्यक्षपणें हें शोषणाचेंच स्वातंत्र्य होतें. कामगार-चळवळींतहि ही भावना दिसत होती. प्रत्येक धंद्यांतल्या प्रत्येक कामगारानें 'आपापल्या हिताची जपणूक केली कीं सर्व कामगारांचें हित साधेल अशी भावना बळावली. त्यामुळें कामगार-संघटना आर्थिक पुनर्रचनेचें साधन बनण्याऐवजीं कांहीं कामगार-गटांच्या आर्थिक फायद्याचें साधन बनल्या.

हक्काच्या जाणिवेबरोबर कर्तव्याची जी भावना पुनर्रचनेसाठीं हवी ती निर्माण होईना. आपल्या पायापुरतें पाहण्याची वृत्ति वाढली. स्वतःच्या नोकरीची शाश्वति मिळाली कीं इतरांच्या बेकारीचें सोइर-सुतक कुणाला वाटेना.

जमीनदारांच्या अन्यायाविरुद्ध संघटितपणें आवाज उठविणारे व झगड्यासाठीं कटिबद्ध झालेले भूमिहीनहि, शेतमजुरांना चांगल्या रीतीनें वागवीत होते असें नाहीं. त्यांच्यांतील उच्चनीच भावना नष्ट झाली नव्हती. समानतेची एक प्रकारची पांगळी भावना समाजांत निर्माण झाली होती.

समानतेची भावना दुहेरी असते. आपल्यापेक्षां अधिक वरच्या पायरीवरच्या लोकांना आपल्याबरोबर आणलें पाहिजे हें जसें खरें, त्याचप्रमाणें आपल्या खालच्या पायरीवरच्यांना वर उचललें पाहिजे हेंहि खरें. वरच्यांच्या बरोबरीची भावना हीहि एकांगी, खालच्यांना उठविण्याची भावना हीहि एकांगी. वरिष्ठांना खालीं आणणारी भावना ही द्वेषाच्या, हेवेदाव्याच्या रूपानें व्यक्त होऊं लागली कीं ती अशुद्ध होते. खालच्यांच्या कणवेनें करुणेच्या रूपांत प्रकट होणारी एकांगी भावना ही त्यांना परावलंबी बनवते, परस्परावलंबी बनवीत नाहीं.

केवळ प्रतिस्पर्धा, केवळ कणव ह्या एकांगी भावना जाऊन शुद्ध साम्याची भावना निर्माण झाली तरच शोषण आणि विषमतारहित अशी समाजरचना होऊं शकेल. समाजाच्या पुनर्निर्माणासाठीं ही उभयविध भावना हवी. संघटितपणें शोषकांना तोंड द्यायला हवें आणि कणवेनें खालच्यांना वर उचलण्यासाठींहि संघटितपणें धावलें पाहिजे अशी संपूर्ण समानतेची भावना कोठें दिसत नव्हती.

अशा कुचंबलेल्या परिस्थितींत भूदान-यज्ञाची चळवळ उदय पावली. समानतेची शुद्ध आणि संपूर्ण भावना प्रदीप्त करण्याचें सामर्थ्य ह्या चळवळींत दिसून आलें. आपापले गट स्वार्थ संपादन करण्यांत कृतार्थता न मानतां नवसमाजाचें संपूर्ण चित्र उभें करून जनतेला उत्स्फूर्त करण्याचें सामर्थ्य ह्या चळवळीनें दाखविलें. समतेच्या स्थापनेंत खरी अडचण मालकी हक्काच्या भावनेचीच आहे. ही भावना श्रीमंतांत असते आणि गरीबांत नसते असें थोडेंच आहे? व्यक्तिगत मालकीला श्रीमंत जितका जपतो, तितकाच गरीबहि चिकटून राहतो. एखाद्या गिरणींत धनिकाला जी आसक्ति तीच आसक्ति एखाद्या लंगोटीबद्दल गरीबाला. समाजांतून मालकी हक्काचें विसर्जन होईल त्याच वेळीं समाज म्हणून त्याचें अस्तित्व सिद्ध होऊं शकेल.

माझ्या खोलींतल्या हवेचा लोभ धरून जर मी दारें, खिडक्या बंद करून घेईन तर स्वतःचा कोंडमारा करून घेईन. माझ्या खोलींतल्या हवेची आसक्ति सोडून जेव्हां मी दारें खिडक्या मोकळ्या करतों त्या वेळीं साऱ्या विश्वांतली हवा माझ्याच मालकीची होते. ही भावना जनतेला शिकविण्याची गरज आहे. भूदान-यज्ञांतून ही भावना जागृत होत असल्याचा प्रत्यय येऊं लागला. आर्थिक व सामाजिक क्रांतीसाठीं मालकी हक्क विसर्जनाची भावना प्रज्ज्वलित

झाली पाहिजे ह्याची जाणीव देशांतील समतेच्या उपासकांना होऊं लागली होती. परिग्रह करून ठेवलेल्या पैशांचा संकटकाळीं उपयोग होईल त्यापेक्षां समाज एकसंघ, एकजीव झाला तर ती शाश्वति अधिक उपयोगी पडेल ही भावना वाढणें, वाढविणें जरूर होतें.

भूदानांतील ह्या क्रांतिकारी तत्त्वाकडे जयप्रकाश आकर्षिले गेले. हृदय-परिवर्तन आणि परिस्थिति-परिवर्तन ह्या दोन चरणांनीं चाल-णारी ही धट्टीकट्टी क्रांति-भावना त्यांच्या हृदयाची पकड घेत होती. देशांतील उत्पादनाचें प्रमुख साधन भूमि हेंच आहे. ह्या साधनाच्या मानानें इतर उत्पादन साधनें ही तटपुंजी व परावलंबी. इतर उत्पादन-साधनांच्या मालकी हक्कांबाबत जो कळवळा दाखविला जातो तो ह्या मूलभूत साधनाविषयीं दाखविला जात नाहीं असें त्यांना दिसत होतें. महा उत्पादन करणारी यंत्रसामुग्री शेतीच्या मानानें किती लहान, पण शेतीच्या बाबतींला अन्याय दूर करून घेणें हें अवघड काम असल्यामुळें तें उपेक्षितच राहिलें. जयप्रकाशजींनीं किसान आंदोलनासाठीं अनंत खस्ता खाल्लया आहेत, त्यामुळें भूदान-यज्ञांतून ह्या मूलभूत प्रश्नालाच हात घातला जात आहे ह्याचा प्रत्यय त्यांना आला.

त्यांनीं लिहिलें : जमिनीची फेर-वांटणी जास्तींत जास्त बेजमीन शेतमजुरांना जमीन मिळवून देणें हें थबकलेल्या भारतीय आर्थिक क्रांतींतील पहिलें आणि सर्वांत महत्त्वाचें पाऊल आहे. या क्रांतीला भिऊन कॉंग्रेसनें पाठ फिरविली. समाजवाद्यांनीं ह्या क्रांतीच्या रणभेरी वाजविल्या. पण प्रत्यक्ष कामाच्या दृष्टीनें तेहि फारसें कांहीं करूं शकले नाहींत. हें निमित्त करून कम्युनिस्टांनीं तीन वर्षे तेलंगणांत नुसता उच्छाद मांडला, पण प्रश्न जिथल्या तिथेंच अडकून पडला होता. अशा परिस्थितींत संत विनोबा ह्या प्रश्नांचें उत्तर शोधण्यासाठीं पायीं

निघाले. “ हवा, पाणी, प्रकाश यांच्याप्रमाणेंच जमीनहि ईश्वरानें दिलेली आहे आणि तिच्यावर सर्वांचा अधिकार आहे ” हा मंत्र त्यांनीं उच्चारला. धर्माच्या, न्यायाच्या नांवावर, समाजाच्या हितासाठीं त्यांनीं मालकांपाशीं जमीन मागितली. लोक हसले. बुद्धिमान म्हणाले, मागून कुठें जमीन मिळते कीं काय ? पण वर्ष दीड वर्षांत एकट्या विनोबांनीं साडे तीन लाख एकर जमीन हस्तगत केली. आज साऱ्या देशाचें लक्ष या विलक्षण भूदान-यज्ञाकडे आकर्षिले गेलें आहे. असें वातावरण तयार झालें आहे कीं, ह्या अडखळून पडलेल्या क्रांतीचे बंध फार काळ टिकूं शकणार नाहींत.

“ महात्माजींनीं राष्ट्रीय क्रांतीचें अहिंसक रूप साऱ्या जगाला दाखविलें. विनोबा आर्थिक क्रांतीचे अहिंसक रूप आमच्या पुढें उभे करीत आहेत. अहिंसेनें कुठें स्वराज्य मिळालें आहे का, असला काथ्याकूट करण्यांत स्वातंत्र्यसंग्रामाच्या काळांत कितीतरी क्रांतिकारी गुंतून पडले होते. आज तसलाच वादविवाद आर्थिक क्रांतीच्या बाबतींत चालू आहे आणि ह्या आंधळ्या क्रांतिकारकाच्या समोरच क्रांति आपली ध्वजा फडकवूं लागली आहे.

जयप्रकाश हे असले ग्रंथजड आंधळे क्रांतिकारक नाहींत. भूदान-यज्ञांत त्यांना क्रांतीचें दर्शन झालें. आर्थिक क्रांतीचा अडथळलेला गाडा भर वेगानें पुढें न्यावयाचा तर ह्या कामांत शक्ति लावली पाहिजे. हें त्यांनीं ओळखलें. भूदानाच्या कामासाठीं त्यांनीं आपल्या मित्रांना आवाहन केलें. ते स्वत: त्यांत गढून गेले. विनोबांना एक उमदा सहकारी मिळाला. समाजवादी पक्षाचा अग्रणी भूदान-यज्ञाच्या क्रांतिसेवेंत सामील झाला.

परंतु जयप्रकाशांना झालेलें दर्शन सर्वांना झालें नाहीं. विधिमंडळें, अधिकार-स्वीकार, कायदा यांच्या जंजाळांतून त्यांचे सहकारी बाहेर

पडेनात. सार्वत्रिक निवडणुकांमुळेंहि डोळे उघडूं शकले नाहींत. विनोबांनीं कित्येक वेळां सांगितलें: सेनापति पुढें निघाला, पण सेना मागें पडली. 'हमारे नेता जयप्रकाश' अशा घोषणा करणारांना त्यांचें हें आव्हान होतें.

जयप्रकाश भूदानाच्या कार्याला लागले, तसतसें त्यांना ह्या चळवळींतील गुप्त सामर्थ्याचें अधिकाधिक दर्शन होत गेलें. त्यांच्या मनांत ज्या प्रकारची क्रांति वावरत होती, ती साकार करण्याचें सामर्थ्य भूदान यज्ञांत आहे याचा प्रत्यय त्यांना आला. आपल्या मित्रांनीं मोठ्या संख्येनें आणि उत्साहानें ह्या कार्यांत एकरूप व्हावें अशी त्यांची मनीषा. त्यांची तळमळ इतरांना फार मोठ्या प्रमाणावर उत्स्फूर्त करीना. अशा वेळीं सात्त्विक मनुष्य विचार करतो. केवळ घटपट करून मित्रांच्या शंका निवारण करून भागणार नाहीं. आपल्याला जें दर्शन झालें त्या कामाच्या मागें अधिक पोटतिडिकेनें लागलें म्हणजे मित्रांना येईल प्रत्यय. कामांतील आपली समरसता हीच इतरांना प्रत्यय आणून देण्याचें अशा लोकांचें साधन असतें. जयप्रकाश या कामांत मनोभावें पडले. त्यांनीं बिहारमध्यें चांडीलला भरलेल्या संमेलनांत कार्यकर्त्यांना, मित्रांना आवाहन केलें. "एकमेव काम म्हणून ह्या कामांत कांहीं काळ निदान वर्षभर सामील व्हा." असें ते म्हणाले.

त्यांनीं आपली शक्ति या कामाला लावली. बिहारच्या खेड्यापाड्यांत भूदानाचा संदेश ते पोंचवूं लागले. प्रांतोप्रांतीं फिरूं लागले. आतां एकच एक धून. विनोबांच्या सारख्यांनीं वयाची साठी गांठलेली. पण सूर्याच्या नियमितपणानें भूदान-यज्ञाचा नित्य नूतन संदेश ते सांगत फिरत होते. जयप्रकाशांना वाटे, विनोबांचें हें कार्य उचलण्यासाठीं हजारों—लाखों तरुणांनीं यावें. नाना युक्तिवाद ते जनतेसमोर मांडीत होते. त्यांच्याहि पायाला जणुं भिंगरी लागली. त्यांना समजा-

वून सांगण्याचा कंटाळा नाहीं. लोकांच्या अज्ञानाबदल तिरस्कार नाहीं. शंकराचार्यांचा पुन:पुन्हा समजावून सांगण्याचा, पटेपर्यंत समजावण्याचा बाणा जणुं त्यांनीं उचलला. भूदान-यज्ञाची झोळी भरूं लागली. लाखोंनीं संख्या फुगूं लागली. दोन वर्षांत पंचवीस लाख एकर जमीन मिळविण्याची सेवापुरीला प्रतिज्ञा करण्यांत आली होती. बत्तीस लाखांवर एकर जमीन ह्या प्रक्रियेंत मिळाली. जयप्रकाश-जींचा उत्साह, श्रद्धा वाढत गेली.

गयेला १९५४ च्या एप्रिल महिन्यांत सर्वोदय समाजाचें संमेलन भरलें. एप्रिल महिना. कडाक्याचें ऊन. पण हजारों लोक देशांतील प्रांताप्रांतांतून आले होते. जवाहरलाल, राधाकृष्णन् वगैरे नेतेहि आले होते. संकल्पपूर्तीचा आनंद होता, पुढच्या जबाबदारीच्या जाणिवेचें गांभीर्य पसरलें होतें. भूदानाच्या कार्याचें वेगवेगळ्या दृष्टिकोनांतून, वेगवेगळ्या पैलूंनीं विवेचन केलें जात होतें. जयप्रकाशजींच्या मनांत दु:ख साकळलें होतें. ह्या क्रांतिकार्याशीं लोक अजून समरस कां होत नाहींत, इतकें बौद्धिक जाड्य लोकांच्या मनावर कां सांवरलें आहे !

गयेला संमेलनांत ते भाषणासाठीं पुढें आले. त्यांचा कंठ दाटून आला होता. ते म्हणाले, "एक बिहारी म्हणून आज माझी मान खालीं होते. बिहारचा ३२ लाख एकर जमिनीचा संकल्प होता. पूर्ण न होण्यासारखा हा अवास्तव संकल्प होता असें नाहीं. कॉंग्रेस आणि प्रजासमाजवादी पक्ष या दोन्ही पक्षांनीं तो उचलून धरण्याचे ठराव केले. कार्यकर्तेहि त्यांच्याजवळ कांहीं कमी नाहींत. गेले कांहीं महिने या कामांत मी आहें. ज्या श्रद्धेनें मी या कामांत पडलों ती माझी श्रद्धा दिवसेंदिवस बळकट होत आली आहे. माझी खात्री झाली आहे कीं, केवळ जमिनीचाच नव्हे तर एकंदर जीवनाचा प्रश्न

सोडविण्याची शक्ति या चळवळींत आहे. साऱ्या जीवनाचा रंगच यामुळें पालटणार आहे. केवळ कायद्यानें किंवा मारपिटीनें खरी क्रांति होत नाहीं. माणसाच्या हृदयांतलीं मूल्यें बदलल्याखेरीज स्थायी क्रांति अशक्य आहे. भूदान-यज्ञ ही नवमूल्य प्रस्थापनेची चळवळ आहे. नव समाजाची निर्मिति या आंदोलनामुळें शक्य होईल. लोक या नव-क्रांतीच्या स्वागतासाठीं तयार आहेत, पण कार्यकर्ते आळसावले आहेत. जर सर्वांनीं शक्ति लावून निरंतर हें काम केलें असतें तर बिहारचा ३२ लाख एकरांचा संकल्प पूर्ण झाल्याखेरीज राहता ना. परंतु कार्यकर्ते कमी पडतात, त्यांची कार्यक्षमता, तळमळ उणी पडते. हें असें काम आहे कीं ज्यांत आपलें सर्वस्व आम्हीं लावलें पाहिजे. जीवनदानाची ही क्रांति मागणी करीत आहे. माझें हें महान् भाग्य कीं, अशा जीवनदानी कार्यकर्त्यांमध्यें माझें नांव दाखल करण्याचें ठरवीत आहे."

जयप्रकाशांचें तें भाषण ऐकून सारी सभा मंत्रमुग्ध झाली. सगळें वातावरण जणूं भारून गेलें. जयप्रकाशांच्या ह्या घोषणेनें अनेकांना गहिंवरून आलें. कोणाच्या तोंडून शब्द फुटेना. शेवटीं विनोबांनीं वातावरण मोकळें केलें. ते म्हणाले, "आतांचे जयप्रकाशांचें भाषण म्हणजे हृदयाचे बोल. अशी मंगलनिश्चयाची वाणी ऐकून मन उचंबळून येतें. हा यज्ञ सफल होतां होतां आमचीं जीवनेंहि सफल करील अशी माझी भावना आहे. आम्हांला पुष्कळ कार्यकर्ते मिळतील. आम्हां सर्वांना जयप्रकाशबाबूंप्रमाणें दृढसंकल्पी झालें पाहिजे."

जयप्रकाशांच्या आवाहनाचे सादप्रतिसाद अनंत हृदयांतून उठले. संमेलनांत सगळीकडे एक प्रकारचें प्रसन्न गंभीर वातावरण पसरलें होतें. सायंकाळची प्रार्थना झाली. नभोमंडपाखालीं लोक कुजबुजत आपापल्या बिछान्यावर बसले होते. आज तारे अधिक प्रसन्न भासत होते.

पहाटेची वेळ. विनोबा नित्याप्रमाणें उठले. त्यांच्या मनांत जयप्रकाशांची जीवनदानाची घोषणा राहून राहून तरंग उठवीत होती. किती प्रेमानें, विनयपूर्वक, सद्भावपूरित होऊन जयप्रकाश बोलले. विनोबा विचार करूं लागले: आपल्यालाहि याबाबत कांहीं केलें पाहिजे. त्यांनीं आपला नित्याचा कार्यक्रम बाजूला सारला. हातीं कागद कलम धरली. जयप्रकाशांना पहाटेच्या त्या मंगल घटकेला त्यांनीं प्रेमपत्र लिहिलें: "श्री जयप्रकाश, काल तुम्ही जें आवाहन केलें त्याला उत्तर म्हणून भूदानमूलक ग्रामोद्योग प्रधान अहिंसक क्रांतीसाठीं माझें जीवन समर्पण." पत्र घेऊन दूत जयप्रकाशांच्या डेऱ्याकडे आला. तें पत्र वाचून जयप्रकाशजींचे डोळे भरून आले. खुद्द विनोबांनीं त्यांच्या जीवनदानींच्या यादींत आपलें नांव दाखल केलें होतें. जयप्रकाशजींनीं विनोबांचें तें पत्र संमेलनाच्या अध्यक्ष श्रीमती आशादेवी आर्यनायकम् यांच्याकडे पाठविलें. लिहिलें: "विनोबांचें एक पत्र आलें आहे तें सोबत पाठवीत आहे. ज्यांनीं आपणां सर्वांना प्रेरणा दिली त्यांनीं माझ्यासारख्या एका सामान्य माणसाला जीवनदान करणारें पत्र पाठवावें ह्या घटनेबद्दल काय म्हणावें तेंच मला सुचत नाहीं. एवढेंच फारतर म्हणेन कीं हें अमूल्य दान स्वीकारण्याचें सामर्थ्य माझ्यांत नाहीं. आपण तर देवाच्या नांवानें विनोबांनाच जीवनदान करावयाचें आहे."

जयप्रकाशजींच्या जीवनदानाच्या घोषणेनें वातावरण विद्युन्मय झालें होतेंच. विनोबाजींचें पत्र आणि जयप्रकाशांनीं त्याबाबत व्यक्त केलेली भावना यामुळें सगळीकडे भावावेग निर्माण झाला. असे भावनामय प्रसंग क्वचितच पाहायला मिळत असतात: राष्ट्राच्या इतिहासांत घडतातहि क्वचितच. परंतु अशा प्रसंगांतून सारें सत्त्व उफाळून वर येत असतें. प्रथम जीवनदानी जयप्रकाश आणि त्यांच्या

त्या दानाला अधिक पावनत्व देणारे विनोबा. त्यांच्या मागून जीवन-दानींच्या नांवाचा जणुं एक प्रवाह सुरू झाला. बिहारचे वयोवृद्ध तेजस्वी कार्यकर्ते धीरेंद्रभाई मजुमदार म्हणाले : “ हें जीवनदान केवळ भूदानासाठीं नाहीं, सामजांतील सर्व प्रकारचें शोषण नष्ट व्हावें यासाठीं कटिबद्ध होण्याची ही तिज्ञा आहे. हा महान् यज्ञ आहे. ही क्रांति आहे. क्रांतिकारकांच्या नशिबीं जें असतें तेंच आपल्या नशिबीं येईल. उपेक्षा, विरोध आणि दमन यांचा सामना करावा लागेल. पण जीवनदानी यासाठीं तयारच असतो. ” आणि गुजराथचे तपस्वी सेवक रविशंकर महाराज यांनींहि जीवनदान केलें.

जीवनदानींचीं पत्रावर पत्रें येऊं लागलीं. पंचवीस, पन्नास, शंभर, पांचशें, सहाशें असा आंकडा फुगत चालला. लहानमोठे कार्यकर्ते तरुण, वृद्ध, सारे गंभीरपणें जीवनदान देत होते. उत्कलचे गांधी गोपबंधु चौधरी यांचें नांव आलें. बंगालचे श्री. चारुचंद्र भंडारी दाखल झाले. ओरिसाच्या मुख्य प्रधानांच्या पत्नी आणि प्रमुख कार्य-कर्त्या श्रीमती मालतीदेवी चौधरी यांनीं लिहिलें, “ अहिंसक साध-नांनीं शोषणरहित, शासनरहित समाज निर्माण करण्यासाटीं अखेरच्या श्वासापर्यंत झगडत राहणें हें माझें जीवनव्रत आहे. करेंगे या मरेंगे या निर्धारानें तें पूर्ण करायचें आहे.

आणि शांतीच्या शोधांत जगभर भटकणारी ती तेजस्वी अमेरिकन कुमारी पॅट्रिशिया मॅक्गोहन तिलाहि राहवलें नाहीं. त्या सर्व प्रसंगानें जणुं तिच्या साऱ्या शरीरांतून वीज चमकून गेली. तिच्याच्यानें बोल-वेना. तिनें विनोबांना पत्र लिहिलें. मोडक्या तोडक्या हिंदींत तें पत्र होतें. तिनें लिहिलें : “ अहिंसा समजून घेण्यासाठीं, शांतीच्या शोधांत मी येथें आलें. तुमच्या जवळ आल्या-राहिल्यावर अहिंसेच्या साधनानें दुनिया कशी बदलतात तें मीं प्रत्यक्ष पाहिलें, अनुभवलें.

मीहि याच सर्वोदयाच्या मार्गानें माझ्या देशांतला निग्रोंचा प्रश्न सुटावा म्हणून प्रयत्न करीन. मी मायभूमीला परत गेलें तरी आतां घरीं परतणार नाहीं. तुमच्या ह्या महान् कार्यासाठीं मीहि आपलें जीवन अर्पण करतें."

देशांतल्या इतिहासांतला हा अमर प्रसंग आहे. शोषणरहित, शासनरहित प्रेममय समाजरचनेसाठीं इतक्या मोठ्या संख्येनें त्या दिवशीं लोक प्रतिज्ञाबद्ध झाले. प्रथम जीवनदानी जयप्रकाशजी यांनीं कधींपासून हेंच ध्येय हृदयाशीं धरलें होते. ह्या ध्येयासाठीं त्यांनीं दोन तपांवर अनेकविध धडपड चालविली होती. जयप्रकाशजींचें जीवन म्हणजे शोषणरहित समाजरचनेसाठीं भारतांत झालेला भगीरथ प्रयत्नांचा इतिहास.

◆◆ ◆◆ ◆◆

# दास्यमुक्तीची प्रतिज्ञा

गंगाशरयू यांच्या संगमाच्या परिसरांत, उत्तर प्रदेश आणि बिहार या प्रांतांच्या सीमारेषेवर एक छोटेखानी गांव आहे. गंगेच्या प्रवाहांतल्या छोट्या छोट्या बेटांवर अशीं गांवें वसलेलीं असतात, त्यांना दियारा असें म्हणतात. हें गांव राजा सिताबराय यांनीं वसविलें म्हणून त्याचें नांव पडलें सिताबदियारा. नदीनें चारी बाजूंनीं घेरलेलें असल्यानें जन्मतःच एक प्रकारची साहसी वृत्ति या भागांतल्या लोकांत असते. परिग्रहाचा लोभहि जरा कमीच; कारण जतन केलेलें या नद्या केव्हां हरण करून घेऊन जातील याचा नेम नाहीं. लोक भोळेभाळे. वाटेल तर आपला प्राण दुसऱ्यासाठीं देतील, पण दुर्भावनेचा वास आला तर चिमूटभर मातीसाठीं रक्ताच्या नद्या वाहवायला मागेंपुढें पाहणार नाहींत. जमीन गंगेच्या पाण्यावर पोसलेली. त्यामुळें गहूं आणि दुभतें यांची रेलचेल असते. हवा, पाणी आणि अन्न यांच्यामुळें वयांत येतांच मुलें भरदार दिसायला लागतात. सिताबदियारा गांवांत वेगवेगळे मोहोल्ले आहेत. एका मोहोल्ल्याचें नांव आहे ‘ लाला टोली. ’ या वस्तींत बाबू देवकीनंदन लाल राहतात. त्या जुन्या काळांत ते इंग्रजी शिकले. पोलिस-खात्यांत ते फौजदार होते. अत्यंत स्वाभिमानी आणि निर्भय. हातांत हंटर घेऊन घोडा दौडत ते फिरत. सगळे लोक, वरचे अधिकारी-सुद्धां त्यांना वचकून असत एकदां एका इंग्रज अधिकाऱ्यांशीं त्यांची बोलाचाली झाली. तो तोंडाला येईल तें बोलूं लागला. देवकीनंदनजींच्या डोळ्यांतून जणुं आग बाहेर पडूं लागली. हात सळसळूं लागले. त्यांनीं

त्या हंटरनें त्या गोऱ्याला बडविलें. त्याला चांगली अद्दल घडविली. साहेबाला इतरांपुढें ह्याची वाच्यता करतां येईना. एक साधा काळा हिंदी माणूस आपल्याला मारतो, आणि आपण मार खाऊन घेतो हें सांगणें म्हणजे बेइज्जतीच.

बाबू देवकीनंदन आपल्याच कामांत मस्त असायचे. त्यांना मूलबाळ कांहीं नव्हतें. त्यांच्या पत्नीनें नाना व्रतें-वैकल्यें केलीं. पुढें त्यांना मुलगा झाला. त्याचें नांव ठेवलें हरसूदयाल. हरसूदयाल इरिगेशन खात्यांत नोकरीला होते. त्यांच्या पत्नीचें नांव फुलराणी. हरसूदयाल स्वभावानें शांत व सरळ होते. फुलराणी म्हणजे तर प्रेम-स्नेहाची जणुं मूर्ति. त्या अत्यंत कार्यक्षम आणि कर्तबगार होत्या. घरचा सगळा कारभार, शेतीवाडी, देणें-घेणें सगळें त्याच पाहात. नोकराचाकरांशीं त्यांचें वागणें असें असे कीं ते त्यांना पूज्य समजत; त्यांच्याविषयीं फार आदर बाळगीत.

फुलराणी देवींच्या पोटीं १९०२ सालच्या विजयादशमीला एक मुलगा झाला. सगळीकडे उत्साह संचारला होता. शमी वृक्षाच्या हवालीं केलेलीं शस्त्रें या दिवशीं पांडवांनीं पुन्हा हातीं घेतलीं आणि अन्याय निवारणासाठीं ते सिद्ध झाले तोच हा दिवस. सुमुहूर्तावर मुलगा झाल्यानें घरांत आनंदी आनंद पसरला. मुलाचें नांव ठेवण्यांत आलें जयप्रकाश. मुलगा जन्मतःच जणुं विचार गंभीर असावा असें त्याला पाहिल्यावर वाटे. देवापुढच्या नंदादीपासारखें त्याचें मंदमधुर हसणें, अवखळपणा कसा तो नाहींच. पण त्याच्या चेहऱ्यावरची ती प्रसन्न गंभीरता पाहून सर्वांना तो हवाहवासा वाटे. मुलाची प्रगति जरा मंदच होती. आई, बाबा हे शब्द त्याच्या तोंडून लौकर उमटेनात. दांतहि कुठें दबा धरून जणुं बसले होते. त्याची बालपणींची मस्ती पाहून आईनें लाडानें त्याला ‘ बउल ’ म्हणायला सुरुवात केली.

आसपासचे लोकहि त्याच नांवानें पारखूं लागले. मोठेपणीं फक्त ' जी ' मागें लागले, पण गांवकरी अजूनहि ' बउलजी 'च म्हणतात. त्या नांवामागील प्रेमस्नेहामुळें जयप्रकाशांना तें नांव गांवकऱ्यांकडून ऐकण्यांत समाधान वाटतें. मुलाची विचारगंभीर मुद्रा पाहून एक दिवस वडील गमतीनें म्हणाले : " हें मूल जन्मतःच वृद्धत्व घेऊन जणुं आलें आहे. "

बउल शाळेंत दाखल झाला. त्याची एकाग्रता, स्मरणशक्ति तीव्र होती. शाळेंतला तो एक चमकदार विद्यार्थी होता. प्राथमिक शिक्षण तर कसेंतरी आटोपलें. आतां पुढें काय ? हरसूदयालजींच्या वारंवार बदल्या व्हायच्या, मुलाच्या शिक्षणांत यामुळें खंड पडेल कीं काय अशी त्यांना भीति वाटली. त्यांनीं जयप्रकाशांना पाटण्याला शिकायला पाठवायचें ठरविलें. पाटण्याच्या कॉलेजिएट हायस्कूलमध्यें सातव्या वर्गांत ते दाखल झाले. ते एक अत्यंत टापटिपीचे व नीटनेटके विद्यार्थी म्हणून शाळेंत सुपरिचित झाले. वर्गातल्या अग्रगण्य विद्यार्थ्यांत त्यांची गणना होऊं लागली. पण ते स्वभावानें एकलकोंडे होते. त्यांना आपापल्या गटांत ओढण्याचे त्यांच्या वर्गांतले विद्यार्थी प्रयत्न करीत पण ते एकाकीच राहात. स्वतःमध्येंच मस्त असत.

ते ' सरस्वतीभवन ' ह्या प्रसिद्ध वसतिगृहांत राहात. हें वसतिगृह फार प्रसिद्ध होतें. तरुणाचे सुप्त गुण सहज येथें प्रस्फुटित व्हायचे त्या दृष्टीनें नाना योजना तेथें असत. जयप्रकाशांना तेथें राजकारणाचा स्पर्श झाला. अभ्यासाव्यतिरिक्त अन्य विषयाकडे त्यांचें लक्ष वेधलें गेलें. त्यांनीं इतर साहित्य वाचायला आरंभ केला. शाळेच्या वाचनालयांतल्या पुस्तकावर एखाद्या भुकेजल्या सिंहाप्रमाणें ते तुटून पडत. आतां मित्रपरिवार त्यांच्याभोंवतीं जमूं लागला. जयप्रकाशहि चेष्टामस्करी, हास्यविनोद यांत इतरांइतकेंच तरबेज आहेत असें आढळून आलें.



जयप्रकाश नारायण

जयप्रकाश इतरांना मदत करायला सतत तत्पर असत, ब्रजबिहारी बाबू त्यांचे मेव्हणे त्यांच्या स्वयंपाकांतहि मदत करीत.

जयप्रकाशांच्या मनाचा ओढा वाङ्मयाकडे, तर मेंदूचा ओढा विज्ञानाकडे. गणितांत तर त्यांचा हातखंडा असे. देशप्रेमाची भावनाहि त्यांच्यांत बळावत होती. एक इंग्रज गृहस्थ त्यांच्या शाळेचे मुख्याध्यापक होते. त्यांची शिस्त, शिकविणें सारें चांगलें. परंतु भारतीयांच्या भावनांची ते कदर करीत नसत. एकदां एका महत्त्वाच्या सणाच्या दिवशीं त्यांनीं परीक्षा ठेवली. त्यांच्याविरुद्ध 'ब्र' काढण्याची कोणाची प्राज्ञा ? सगळे मनांत जळफळत राहिले. जयप्रकाशजी आणि त्यांचे पांच मित्र यांनीं याबाबत कृति करायचें ठरविलें. परीक्षेच्या दिवशीं वर्गांतले इतर विद्यार्थी हजर पण हे सहा हुशार विद्यार्थी बेपत्ता. गोरे हेडमास्तर रागानें लाल झाले. दुसऱ्या दिवशीं वर्गांत येतांच त्यांना बोलावणें आलें. सहाहि जण छाती काढून हेडमास्तरांच्यापुढें हजर झाले.

" तुम्ही काल परीक्षेला बसला नाहींत."

" नाहीं बसलों."

" कां नाहीं बसलांत ? "

" काल आमचा मोठा सण होता. सणासुदीला सुटी हवी ती परीक्षा ठेवली होती. आमच्या सणाची इतकी बेकदर कां झाली ? "

" तुम्ही उद्धट आहांत. तुम्हांला वठणीवर आणायला हवें. वेतानें फोडून काढलें पाहिजे. करा हात पुढें. "

साहेबांच्या पुढें आपले मृदुकोमल हात निर्भयपणें त्या सहाहि कुमारांनीं धरले. ह्या कमळासारख्या हातांवर वेतांच्या छड्या ! ह्या हुशार स्वाभिमानी विद्यार्थ्यांना सजा ! साहेबांचें हृदय विरघळलें. सजा न मिळतांच हसतमुखानें हा विद्यार्थीगण परतला.

जयप्रकाश जीवनाचा विचार करूं लागले. मानवजीवनाचें रहस्य काय ? हसण्या-खिदळण्याच्या त्या वयांत त्यांना ह्या समस्या अस्वस्थ करूं लागल्या. जीवन तेजस्वी व्हावें यासाठीं त्यांची धडपड सुरू झाली. शरीर इच्छेप्रमाणें वाकलें पाहिजे यासाठीं प्रयत्न करूं लागले. तें बलिष्ठ व्हायला हवें. परंतु त्याचें नुसतें चोज पुरवून हें होणार नाहीं. प्राचीन व गुरुकुलांतील कुमारांप्रमाणें त्यांनीं दिनचर्या बन-विली. पहाटे लौकर उठत. उन्हाळा, हिंवाळा, पावसाळा असो, पहाटे उठून थंड पाण्यानें स्नान करीत. शरीरासक्ति जिंकण्याचा त्यांचा प्रयत्न होता. सुखासीनपणानें विद्या मिळत नाहीं. सुखासंबंधीं वैराग्य लाभलें कीं ज्ञानाच्या पेठा खुल्या होतात, असें त्यांना वाटत होतें. गीतेचा अभ्यास त्यांनीं सुरू केला. गीतेची त्यांना मोहिनी पडली. गीतेचे ते अनन्य उपासक बनले. गीता म्हणजे भारतीय गरिमा. खुदीराम बोसाला हसत फाशीं जाण्याचें धैर्य गीतेनेंच दिलें. भार-ताच्या वैभवशाली संस्कृतीनें साऱ्या जगाला दिपविणारे विवेकानंदहि तर गीतेचेच भक्त. गीता हीच भारतीयांची स्फूर्तिदात्री अशा भावनेनें जयप्रकाश आपल्या मित्रमंडळींच्या पुढें गीतेचें विवेचन करीत. त्यांनींहि गीतेचे भक्त व्हावें यासाठीं धडपडत.

त्या वेळीं बिहारमध्यें देशभक्तीच्या दोन विचारधारा तरुणांना आवाहन करीत होत्या. खुदीराम बोसांचा सर्वस्व समर्पणाचा, सशस्त्र क्रांतीचा मार्ग आणि जनतेला संघटित करून शांततेच्या मार्गानें अन्याय निवारण करून घेणारा गांधींचा मार्ग. मायभूमीला मुक्त करण्यासाठीं उतावीळ झालेल्या आणि जीवन-समर्पणाची ओढ अस-लेल्या तरुणांना खुदीराम बोसांच्या बॉंब--पिस्तुलाच्या मार्गाची एकी-कडे ओढ वाटे, तर दुसरीकडे गांधिजींच्या सामूहिक लढ्यांचें आकर्षण वाटे. खुदीरामचा प्रयोग जसा बिहारमध्यें मुझफ्फरपूरला झाला होता, तसाच चंपारण्यांत सत्याग्रह करून साहेबांना झुकवण्याची कर्तब-

गारीहि गांधींनीं बिहारमध्येंच करून दाखविली होती. गांधीजींच्या जीवनांतला साधेपणा, वैराग्य यामुळें क्रांतिकारकाप्रमाणेंच त्यांचेंहि आकर्षण वाटे. त्यांच्या फकिरी बाण्यांतहि सर्वस्वार्पणाला संपूर्ण वाव आहे हें प्रत्ययास येई. जयप्रकाशांना ह्या दोन्ही विचारांचें आकर्षण होतें. शरीरसुखासंबंधीं ते स्वभावतःच उदासीन होते. गांधीजींच्या लेखामुळें त्यांच्या राहणीवागणींत फरक पडला. जीवनांत अधिक साधेपणा आला. गांधीजीहि खुदीरामाप्रमाणेंच गीतेचे भक्त. त्यांच्या जीवनाचाहि आधार गीताच. गीतेच्या ह्या दोन्ही उपासकांचें त्यांना तीव्र आकर्षण वाटे. परन्तु आतां गीतेच्या जोडीनेंच ते सामाजिक, राजकीय, ऐतिहासिक साहित्याहि वाचूं लागले. आपल्याला जें दर्शन झालें तें आपल्या मित्रांना व्हावें यासाठीं त्यांची तळमळ. आपल्या मित्रांनींहि स्वदेशीचा अंगीकार करावा, ओबडधोबड असला तरी देशी माल वापरावा यासाठीं ते खटपट करीत. त्यांनीं एक छोटें मंडळहि बनवलें होतें, त्यांत चर्चा, वादविवाद चालत.

क्रांतिकारकांच्या जीवनांतील रोमांचकारकतेचें आकर्षणहि कांहीं त्यांना कमी नाहीं. क्रांतिकारकांच्या एका गटाशीं त्यांचा परिचय झाला. गंगाकिनारीं, कधीं एखाद्या घळींत, कधीं रात्रीं अपरात्रीं त्यांच्या भेटीगांठी होऊं लागल्या. देशाच्या स्वातंत्र्याच्या, सरकारी सत्ता-केंद्रावर कब्जा करण्याच्या नाना योजना घडूं लागल्या. देशभर क्रांतिकारकांचें जें जाळें पसरलें आहे त्यांत बिहारहि मागें नाहीं, हा अभिमान वाटूं लागला. क्रांतिसेनेंत दाखल होण्याची प्रतिज्ञा घेण्याचा प्रसंग येतो. जयप्रकाशांना गोखले गांधी यांच्या मार्गाचें आकर्षण कांहीं कमी नव्हतें. त्यांचें मन झोके खात होतें. जयप्रकाश आणि क्रांतिकारी यांच्यामधला दुवा बनलेला तो तरुण एके दिवशीं अचानक नाहींसा होतो आणि जयप्रकाश ह्या मार्गापासून दुरावतात.

साहित्याच्या सामर्थ्याची जाणीवहि त्यांना या काळांत तीव्रतेनें झाली. शब्दांत जीवन-परिवर्तनाची प्रेरणा देण्याचें केवढें अपार सामर्थ्य आहे. शतकानुशतकें साहित्य जीवनाची घडण करूं शकतें. गीतेनें कितीकांच्या जीवनांना आकार दिला. तुळसीदासांचें रामचरित-मानस अजूनहि जीवनें घडवीत आहे. मैथिली शरणगुप्तांच्या 'भारत-भारती' काव्यानें कितीतरी तरुणांचीं जीवनें पालटून टाकलीं. साहित्य हेंहि एक समर्थ साधन आहे. जयप्रकाशांना साहित्याचें जबरदस्त आकर्षण होतें. साहित्य-रसास्वादांत ते मग्न होत. हळूहळू त्यांनाहि लेखणीच्या ह्या लालित्यांत अवगाहन करण्याची स्फूर्ति होऊं लागली. देशाचें दास्य दूर करण्यासाठीं त्यांनीं लेखणी हातीं धरली. ते गद्य काव्य लिहूं लागले. आपल्या त्या काळच्या कवितांच्या ओळी आजहि त्यांना कधींमधीं आठवतात.

परंतु केवळ शब्दसामर्थ्यानें देशाचें रंगरूप पालटणें शक्य नाहीं. जगांतल्या पुढारलेल्या राष्ट्रांच्या पंक्तींत आपला देश बसायचा तर त्यांनीं विज्ञानाचा सहारा घेतला तसा आपल्यालाहि घेतला पाहिजे. विज्ञानाशिवाय तरणोपाय नाहीं. रवींद्रनाथांची देशाला जशी गरज आहे, तशीच जगदीशचंद्र, प्रफुल्लचंद्रांचीहि आहे. जयप्रकाशांना प्रफुल्लबाबूंच्या जीवनाचें आकर्षण अधिक होतें. विज्ञानांत अप्रतिहत त्यांची गति, परंतु त्यांचें जीवन म्हणजे संन्यासी जीवन. किती वैराग्य, किती त्याग ! त्यांचें विज्ञान स्वार्थ संपादून शरीराचे चोचले पुरविण्यांत सार्थक मानणारें नव्हतें, तें विज्ञानहि साधनेच्या भूमिकेवर प्रतिष्ठित असल्यानें परम मंगलाचें साधन बनलें होतें, माणुसकीनें तें ओलें झालें होतें. भारताच्या उद्धारासाठीं असें मानवी विज्ञान अत्यंत आवश्यक आहे अशी जयप्रकाशांची धारणा होती. विज्ञानाचा अभ्यास करण्याचा त्यांचा निश्चय होता.

माध्यमिक शालान्त परीक्षेला जयप्रकाश बसले. अपेक्षेप्रमाणें नेत्र-दीपक यश जरी त्यांना मिळालें नाहीं तरी एक शिष्यवृत्ति मिळवून ते उत्तीर्ण झाले. कॉलेजांत त्यांनीं विज्ञानाचा अभ्यासक्रम घ्यावयाचें ठरविलें. परन्तु ह्या विज्ञानाच्या विद्यार्थ्याच्या खोलींत पदार्थ-विज्ञान, रसायन, गणित या विषयांच्या पुस्तकांबरोबरच तुलसीदास, मैथिलीशरण, यांचे ग्रंथहि हारीनें लावलेले आढळत. साहित्यामुळें विज्ञान राक्षसी न बनतां मानवी होईल आणि विज्ञानामुळें साहित्य हा शब्दबंबाळपणा न होतां विचार व तर्क यांच्या अधिष्ठानावर उभें राहील अशी त्यांची भावना होती.

याच काळांत प्रभावतीबाईशीं त्यांचा विवाह झाला. ह्या विवाहा-मुळें बिहारच्या राजकारणांतील थोर थोर व्यक्तींशीं जयप्रकाशांचा निकटचा संबंध आला आणि गांधीजींच्या निकट ते पोंचले. चंपारण्यां-तील सत्याग्रहासाठीं ज्यांनीं गांधीजींना निमंत्रण केलें ते ब्रजकिशोर बाबू जयप्रकाशांचे सासरे. ह्या विवाहामुळें राजकीय व्यासपीठाच्या निकट त्यांचें उठणें-बसणें होऊं लागलें. राजकीय हालचालींचे साद पडसाद त्यांच्या हृदयांत उमटूं लागले. देशाच्या स्वातंत्र्याबद्दलची त्यांच्या मनांतील तळमळ वाढूं लागली. मित्रमंडळींत अधिक चर्चा होऊं लागल्या.

पहिलें महायुद्ध संपून ब्रिटन व त्याचीं दोस्त राष्ट्रें विजयी झालीं होतीं. हिंदुस्थाननें युद्धकाळांत जी मदत केली तिच्या बदल्यांत सरकारनें रौलेटचे जुलमी कायदे द्यायचे ठरविलें. ह्या कायद्यांविरुद्ध लढण्यासाठीं गांधींनीं देशाला साद घातली. वातावरण तापूं लागलें. सरकारच्या कारभाराशीं असहकार करून राज्ययंत्र बंद पाडतां येईल ही भावना देशांत निर्माण होऊं लागली. वर्तमानपत्रांचे रकानेच्या रकाने ह्या चर्चेनें भरून जात. जयप्रकाश द्विधेंत पडले. एकीकडे हृदय असहकारासाठीं उत्सुक होतें, तर दुसरीकडे नियतीनें माथीं मारलेल्या

विद्याभ्यासांत डोकें खुपसून बसावें लागत होतें. मनांत सतत द्वंद्व चाललें होतें. गांधींच्या तोंडून निघालेल्या देशाच्या हांकेला ' ओ ' द्यायची कीं नाहीं ? परीक्षा जवळ येत होती. फॉर्म विद्यापीठाकडे गेले होते. त्यांतहि ही इंटरची परीक्षा. पुढचें भवितव्य या परीक्षेंतल्या यशावर ठरावयाचें. अभ्यासाच्या पुस्तकांत डोकें घालावें तर देशाच्या नाना विचारांचें काहूर थैमान घाली. पुस्तकांना रामराम ठोकावा तर जबाबदारीची जाणीव अस्वस्थ करी.

देशभर नेत्यांचे दौरे सुरू झाले. असहकाराची घोषणा झाली. मौ. आझाद पाटण्याला आले. त्यांचें भाषण ठरलें. विद्यार्थ्यांच्या झुंडीच्या झुंडी व्याख्यानाला निघाल्या. आझादांचें तेजस्वी भाषण ऐकून जयप्रकाशांच्या मनांतलें द्वंद्व संपलें. सैतानी सरकारशीं असहकार करणें कर्तव्यरूप ठरलें. पाटणा विद्यापीठांतल्या हुषार विद्यार्थ्यांत जयप्रकाशांची गणना होत होती. परीक्षा फक्त वीस दिवसांवर येऊन ठेपली होती. परीक्षेंत चांगलें यश मिळण्याचा संभव होता. नंतरच्या जीवनांतलीं सुखस्वप्नें मोह घालीत होतीं. पण जयप्रकाशांचा निश्चय झाला होता. त्यांनीं सैतानी सरकारशीं असहकार करण्याचें, तें नेस्तनाबूद करण्यासाठीं झगडण्याचें व्रत घेतलें आणि विद्यापीठाला रामराम ठोकला. दास्य-मुक्तीची गंभीरपणें घेतलेली ती प्रतिज्ञा सार्थ करण्यासाठीं त्यांनीं जिवाचें रान केलें.

◆◆ ◆◆ ◆◆

# जीवनाची घडण

जयप्रकाशांच्या जीवनांत भावना आणि बुद्धि यांचा मंगल संगम आढळतो. बुद्धीनें प्रत्येक गोष्टीची ते छाननी करतात. निर्णय करण्याचें काम बुद्धीचें आहे. पण त्यापलीकडे बुद्धीचा आधार उपयोगी पडत नाहीं. त्यापलीकडे बुद्धी तर्काचें स्थान घेतें. मग ती सुखासीनतेची समर्थक बनते, व्यवहारवादाच्या आहारीं जाऊन पांगळी बनते. निर्णयानंतरचें काम भावशक्तीचें. एकदां तावून सुलाखून बुद्धीनें निर्णय घेतला कीं सर्वस्व वेंचून त्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची शक्ति भावनेंतून निर्माण होते. जयप्रकाशांजवळ ह्या दोन्ही शक्ति असल्यानें ते केवळ तर्कवादी स्वार्थसाधक झाले नाहींत किंवा भाबडे भगतहि कोणाचे बनले नाहींत. असहाराचा निर्णय त्यांच्या मनांत कधींचाच शिजत होता. आझादांच्या भाषणाचें फक्त निमित्त झालें. त्यांनीं कितीतरी दिवस ह्या बाबीचा सर्व बाजूंनीं विचार केला होता. वडीलधाऱ्या मंडळींशीं चर्चा केली होती. त्यामुळें वीस दिवसांवर परीक्षा आल्याचा मोह त्यांना वाटला नाहीं. त्यांनीं कॉलेजला रामराम ठोकलाच.

कॉलेज सोडल्यावर त्यांनीं साबरमतीचा रस्ता धरावयाचें ठरविलें होतें. परंतु तेवढ्यांत बिहार विद्यापीठाची स्थापना झाली. सैतानी विद्यापीठांतून बाहेर पडलेल्या तरुणांच्या पुढच्या शिक्षणाची सोय तेथें करण्यांत आली. जयप्रकाश बिहार विद्यापीठाच्या परीक्षेला बसले. पहिल्या वर्गांत उत्तीर्ण झाले. इकडे देशांतलें वातावरण तापत चाललें

होतें. परंतु चौरीचुऱ्याला सरकारी अधिकाऱ्यांवर प्रक्षुब्ध जमावानें अत्याचार केले. गांधीजींचें हृदय व्यथित झालें. त्यांनीं चळवळ मागें घेतली. ऐन रंगांत बेरंग झाला. तरुणांचा उत्साह भंगला. राष्ट्रीय विद्यापीठांचें कामहि मंदावलें. पुढें काय हा प्रश्न उभा राहिला. खादी ग्रामोद्योगांच्या कार्यक्रमांत कांहींनीं स्वतःला गुंतून घेतलें. पण बुद्धीच्या भरारीला वाव मिळेल असें त्यांत कांहीं आहे असा जयप्रकाशांना प्रत्यय येईना. दुसरे कांहीं पुन्हा विधिमंडळांत कार्य करण्याला उत्सुक होते. त्यांनीं स्वराज्य-पार्टी स्थापून तो रस्ता धरला. तरुणांच्या उत्साहाला आणि बलिदानाच्या भावनेला ज्यांत वाव आहे असें कार्य समोर दिसेना. पुढील शिक्षणाचा मार्ग तर बंद झाल्यासारखाच होता. ज्या सरकारला वर्षापूर्वीं सैतानी म्हटलें त्याच्याच विद्यापीठांत शिक्षण घेण्याइतकी असहायता किंवा कोडगेपणा ज्यांच्यांत नव्हता त्यांची मोठी कुचंबणा होत होती. जर समजून उमजून त्या सरकारला सैतानी म्हटलें तर आतां माघार घेणें अशक्य होतें.

परंतु जयप्रकाशांची तीव्र ज्ञानपिपासा त्यांना स्वस्थ बसूं देईना. बनारस विद्यापीठांतील प्राध्यापक वर्मा यांच्या देखरेखीखालीं त्यांनीं विज्ञानाचा अभ्यास जारी ठेवला. चळवळ मागें घेतल्यानंतर जयप्रकाशांना त्यांच्या हितचिंतकांनीं पुन्हा विद्यापीठांत दाखल होण्याचा परोपरीनें सल्ला दिला, पण जयप्रकाश अलग राहिले. त्यांच्या मनांत आलें जर या सैतानी सरकारद्वारा मिळणाऱ्या शिक्षणांत सहभागी व्हायचें नाहीं तर मग करायचें काय ? विज्ञानाच्या अभ्यासाशिवाय देशाची भरीव सेवा कशी करतां येईल ? मग परदेशीं जाऊन शिक्षण कां घेऊं नये ? पण त्यासाठीं लागणारा पैसा कोठून आणावयाचा ? विज्ञानाच्या दृष्टीनें युरोप आणि अमेरिका हीं राष्ट्रें अग्रगण्य असल्यानें त्यांपैकींच एखादा देश निवडायला हवा. इंग्लंड हें तर बोलून चालून सैतानी सरकारचें राष्ट्र, त्यामुळें त्याचा विचारच करायला

नको. इतर युरोपियन राष्ट्रांच्या भाषा वेगवेगळ्या. अमेरिकेची निवड करणें सोयीचें होतें. अशा विचारांत ते मग्न होते. त्या काळांत स्वामी सत्यदेव यांचीं देशांत स्फूर्तिदायक व्याख्यानें होत होतीं. अमेरिकेंतील स्वतंत्र जीवनाचीं वर्णनें ते करीत. त्याचाहि जयप्रकाशां-वर थोडाफार परिणाम होताच. त्याशिवाय गदर पार्टीचे कडवे स्वातंत्र्यवीरहि तेथेंच दबा धरून राहिले होते. याच काळांत बनारस विद्यापीठांत शिक्षण घेत असलेला भोलादत्त पंत नांवाचा एक विद्यार्थी अमेरिकेला जायला निघाला होता. मदत मागण्यासाठीं तो जयप्रकाशांच्या सासऱ्याकडे आला असतां जयप्रकाशांची व त्याची गांठ पडली. दोघांत प्रगाढ स्नेह निर्माण झाला. अमेरिकेंत मजुरी करून स्वावलंबनानें शिक्षण घेतां येईल ही कल्पना त्याच्यामुळें जयप्रकाशांच्या डोक्यांत भरली आणि अमेरिकेला जाण्याचा निश्चय झाला.

जयप्रकाशांच्या मनांत हे विचार घोळत असतांनाच वृत्तपत्रांत अमेरिकेंतील मंदीच्या बातम्या छापून येऊं लागल्या. मजुरी मिळणें किती दुरापास्त होतें त्याचीं वर्णनें छापून आलीं. जयप्रकाश आणि भोलादत्त पंत विचारांत पडले. शेवटीं असें ठरलें कीं भोलादत्त पंतानें पुढें अमेरिकेंत जावें आणि तेथील परिस्थिति प्रत्यक्ष पाहून जयप्रका-शांना लिहावें. भोलादत्त अमेरिकेस रवाना झाले. जयप्रकाश त्याच्या पत्राकडे डोळे लावून बसले. त्यांच्यापुढें दुसरी एक अडचण होती. प्रभावतीशीं त्यांचा विवाह झाला होता. जयप्रकाश परदेशीं गेल्यानंतर त्यांनीं काय करायचें? बिहारमध्यें पडद्याची भयंकर प्रथा. स्त्रिया म्हणजे जणुं गोठ्यांतलें जनावर! या वातावरणांतच जर त्या खितपत पडल्या तर जयप्रकाशांच्या भावी योजनांमध्यें त्यांचें सहकार्य कसें मिळणार? बिहारमध्यें त्यांच्या शिक्षणाची तरी कुठें व्यवस्था करणार? संसार-रथाचें एक चाक कमकुवत असून कसें चालणार? जयप्रका-

शांनीं त्यांना गांधीजींच्या आश्रमांत शिकायला पाठवायचें ठरविलें. गांधींच्या जवळ वावरल्यानेंच केवढें तरी त्यांचें शिक्षण होऊन जाईल असें त्यांना वाटत होतें.

घरांतल्या वडीलधाऱ्या मंडळींची समजूत काढून जयप्रकाशांनीं अमेरिकेला जायची तयारी सुरू केली. जपानमार्गें जायचें त्यांनीं ठरविलें होतें. पौरस्त्य राष्ट्रांचें दर्शन घेत घेत ते अमेरिकेला पोंचले. अमेरिकेंत पोंचतांच वर्णवर्चस्वाच्या हिडीस कल्पनेचा अनुभव त्यांना आला. त्यांना एका निग्रो खानावळींत उतरावें लागलें. अमेरिकेंतील स्वतंत्र जीवनासंबंधीं त्यांच्या मनांत ज्या उच्च कल्पना होत्या त्यांना हा पहिला धक्का बसला. जयप्रकाश भाड्यातोड्याची बेगमी करून आले होते. अमेरिकेंतील शैक्षणिक सत्र सुरू व्हायला दोन अडीच महिने अवकाश होता. जयप्रकाशांनीं विचार केला या काळांत मजुरी करून पुढची बेगमी कां करूं नये ?

कॅलिफोर्नियांतील बगीचांत पुष्कळ हिंदी मजूर काम करतात आणि आपापल्या टोळ्यांत चार दोन हिंदी विद्यार्थ्यांना सामावून घेतात असें त्यांना समजलें. त्यांनीं आपला मोर्चा तिकडे वळवला. जयप्रकाशजींनीं १९२० च्या चळवळींत भाग घेतला आणि सैतानी सरकारशीं असहकार करण्याची प्रतिज्ञा असल्यानें अमेरिकेंत ते आले. ही हकीकत त्या मजुरांना समजतांच त्यांना आनंद झाला. भारतांत हा लढा चालू झाला तेव्हां त्या बातम्या ऐकूनच त्यांचे बाहु स्फुरण पावत होते. निद्रा टाकून स्वातंत्र्यासाठीं सबंध देश उभा राहिल्याचें तें दृश्य त्यांना अपूर्व वाटत होतें. जयप्रकाशांचें शेरखान नांवाच्या एका पठाण मुकादमानें स्वागत केलें आणि आपल्या टोळींत त्यांना सामील करून घेऊन सर्व प्रकारची मदत करण्याचें त्यांना आश्वासन दिलें.

जयप्रकाश त्या मजुरांबरोबर द्राक्षांच्या मळ्यांत काम करूं लागले. विद्यार्थ्यांबद्दल सहानुभूति असल्यानें इतर मजूर त्यांना पुष्कळ सवलती देत आणि फार उदारपणें त्यांच्याशीं वागत. परंतु जयप्रकाशांच्या मनांत होतें कीं शक्यतों त्यांच्या उदारतेचा फायदा घेण्याचा प्रसंग आपल्यावर येऊं नये. ते झटून कामाला लागतात. रोज दहा दहा तास काम करतात. आठवड्याची रविवारची सुट्टीहि घेत नाहींत. सवलतीची त्यांना जरूर पडत नाहीं. शेरखान त्यांच्या ह्या निःस्पृह बाण्यानें त्यांच्यावर अधिकच खूष होतो.

जयप्रकाशांनीं दोन महिने मजुरी करून एका टर्मच्या फी व खर्चापुरते पैसे जमा केले. एवढ्यांत फळबागांतला हंगामहि संपला. जयप्रकाशांनीं कॅलिफोर्निया विद्यापीठांत विज्ञानाकडे आपलें नांव दाखल केलें. विद्यापीठांतलें तें मोकळें वातावरण, ज्ञानासाठीं चाललेली अखंड धडपड, सुसज्ज प्रयोगशाळा यामुळें जयप्रकाशांचा उत्साह दुणावला. परंतु नवेंच संकट त्यांच्यापुढें उभें राहिलें. तेथील विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांनीं फी वाढवावयाचें ठरविलें. जयप्रकाशांजवळ जेमतेम टर्मभर पुरण्यापुरते पैसे होते. त्यांनीं एक टर्म कशी तरी काढली. आतां पुढें काय ? त्यांचा मित्र भोलादत्त पंत इयोवा विद्यापीठांत शिकत होता. तेथें फीहि कमी होती. त्यानें जयप्रकाशांना आमंत्रण दिलें. अमेरिकेंतील विद्यापीठांत आपल्याकडच्या सारखे हेवेदावे-मत्सर नसतात. त्यामुळें कोणीहि टर्म अखेर विद्यापीठ बदलूं शकतो. अभ्यासक्रम सारखा असल्यानें विद्यार्थ्यांचें नुकसान होत नाहीं. जयप्रकाशांनीं इयोवाला जायचें ठरविलें, पण पैसे ? जयप्रकाशांनीं पुन्हा कॅलिफोर्नियाचा रस्ता धरला. तेथें फळबागेंत आणि फळांचे रस डब्यांत भरणाऱ्या कारखान्यांत त्यांनीं काम केलें आणि पुरेसे पैसे जमवून ते इयोवाला गेले.

इयोवाला भारतीय विद्यार्थ्यांचें एक मंडळ होतें. जयप्रकाश त्या मंडळांत दाखल झाले. भोलादत्त पंताबरोबर राहूं लागले. तेथें सर्व प्रांतांतल्या विद्यार्थ्यांशीं संबंध आला. पांच सहा विद्यार्थी हातानें स्वयंपाक करून राहात. जयप्रकाशहि त्यांच्यांत सामील झाले. रविवारीं विद्यापीठाला सुट्टी असे. मग हे विद्यार्थी गांवांत मजुरी करायला निघत. कधीं फर्निचरला पॉलिस कर, कधीं घर धुवून काढ. बर्फ पडलें असलें तर कुदळ घेऊन ते बाहेर निघत आणि लोकांच्या दारांतलें बर्फ फोडून साफ करून मजुरी मिळवीत. हलकींसलकीं कामें करून त्यांना सुट्टयांत चांगले पैसे मिळत. इयोवाला जयप्रकाशांनीं केमिकल इंजिनियरिंगचा अभ्यास केला. वर्षभर त्यांनीं तेथें काढलें. पुढें शिकागोला जाणें त्यांना सोयीचें वाटलें.

शिकागोमध्यें मजुरी मिळण्याला अधिक वाव होता. जयप्रकाशांना खर्च चालविण्यासाठीं अधूनमधून मजुरी करणें भाग पडे, त्यामुळें शिकागोला ते आले. प्रथमच त्यांना काम मिळालें तें संडास साफ करण्याचें. त्यांना भंगी-जीवनाची थोडी झलक त्यामुळें मिळाली. शिकागो हा जगांतला सर्वांत मोठा कत्तलखाना. जयप्रकाशांना कांहीं दिवस डब्यांत मांस भरणाऱ्या एका कारखान्यांतहि काम पत्करावें लागलें. कांहीं दिवस एका कुंभारकामाच्या कारखान्यांत आपलें हस्त-कौशल्य अजमावण्याचा प्रसंग त्यांच्यावर आला. लोखंडाच्या कारखान्यांतहि ते कांहीं दिवस मजुरी करीत होते; पण इतके कष्ट करूनहि त्यांचें नीट भागत नव्हतें. मंदीहि वाढत होती. मजुरी करण्याची इच्छा आणि शक्ति असूनहि संधि मिळत नव्हती. दारोदार त्यांना नोकरीसाठीं फिरावें लागे. 'नोकरी नाहीं' हे शब्द ऐकून त्यांचे कान किटले. पैशांच्या अभावीं एकवेळ भात–भाजीहि पोटांत जाणें दुष्कर झालें ! जयप्रकाश विचार करूं लागले हें असें कां ? श्रम करण्याला तयार असणारांनाहि नीटपणें या जगांत जगतां कां येऊं

नये ? त्यांनीं मग फेरीवाल्याचा धंदा पत्करला. समाजाच्या वेगवेगळया थरांचें निरीक्षण ते करूं लागले. रिकामा वेळ मिळाला कीं ते वेगवेगळ्या इंग्रजी लेखकांचें साहित्य वाचून काढीत. परन्तु हा फेरीवाल्याचा धंदाहि त्यांना सोडावा लागला. शिकागोहि त्यांनीं सोडलें. आणि विस्कॉसिन विद्यापीठांत ते दाखल झाले.

येथेंहि त्यांच्या नशिबीची मजुरी चुकली नाहीं. हॉटेलांत भांडीं विसळणें, वाढण्याचें काम करणें, झाडलोट करणें, आचाऱ्याच्या हाताखालीं काम करणें, जोडे साफ करणें, न्हाव्याच्या दुकानांत काम करणें, अशीं नाना कामें त्यांनीं केलीं. धंद्याच्याबाबतच उच्चनीच भाव त्यांच्या मनांत राहिलाच नाहीं. मजुराचे हें जीवन कंठीत असतांना शिकागोचे अनुभव त्यांना अस्वस्थ करीत. जगांत श्रम करण्याला तयार असणारालाहि ते करून चांगलें जगण्याची संधि कां असूं नये ?

विस्कॉसिन विद्यापीठांतहि जयप्रकाश विज्ञानाचा अभ्यास करूं लागले. ह्या विद्यापीठांत देशोदेशींचे विद्यार्थी शिकत. जयप्रकाशांसारखें स्वावलंबनानें शिक्षण घेणारेहि त्यांतले पुष्कळ. अधून मधून ते एकमेकांना भेटत. त्यांच्या चर्चा होत. अब्राहम लॅंडी नांवाचा एक पोलिश विद्यार्थी तेथें शिकत होता. जयप्रकाशांशीं त्यांची ओळख झाली. मार्क्सवादाचा त्याचा अभ्यास होता. जयप्रकाशांच्या मनांत जो प्रश्न घोळत होता त्याचें विश्लेषण मार्क्सनें आपल्या ग्रंथांत करून ठेवलें आहे असें त्यानें सांगितलें आणि त्यांना मार्क्सचीं पुस्तकें वाचायला दिलीं. मानवेंद्रनाथ रॉय हे त्या वेळीं कॉमिन्टर्नमध्यें काम करीत होते. भारतीय असहकाराच्या आंदोलनाच्या अपयशाचें विवेचन करणारें एक पुस्तक त्यांनीं लिहिलें होतें. वैज्ञानिक पाया नसल्यानें गांधींचें भावनाधिष्ठित राजकारण अपेशी ठरल्याचें त्यांनीं दाखवून दिलें होतें. असहकाराच्या चळवळींची झालेली कुतरओढ जयप्रका-

शांनीं पाहिली होती. गांधींनीं स्वतःच्या अहिंसेच्या कल्पनेसाठीं चौरीचुऱ्याच्या निमित्तानें चळवळ मागें घेऊन राष्ट्राचा तेजोभंग केला असें अनेक तरुणांना वाटत होतें. जयप्रकाशांना नवा प्रकाश मिळाल्यासारखें वाटलें. भांडवलशाही समाजव्यवस्थेंत विज्ञानाची उपासना म्हणजे मूठभर भांडवलदारांच्या अंगावर चरबीचीं पुटें चढविणें असें त्यांना वाटलें. भारताचा उद्धार व्हावयाचा तर केवळ विज्ञानांत डोकें खुपसून बसण्यानें कांहींच फायदा होणार नाहीं असें त्यांना वाटलें. भारतीय जनतेचें अज्ञान दूर करून आर्थिक तत्त्वज्ञानाच्या आधारावर त्यांना संघटित केलें पाहिजे. समाजशास्त्र आणि अर्थशास्त्र ह्या दोन शास्त्रांच्या पावलांनींच समाज प्रगत होऊं शकेल. समाजाचें स्वरूप विज्ञानाच्या, तंत्रकौशल्याच्या आधारें निश्चित होत नसून तें आर्थिक संबंधामुळें निश्चित होतें हें त्यांना दिसून आलें. विस्कॉसिन विद्यापीठांतील समाजशास्त्राचे प्राध्यापक डॉ. रॉस आणि यंग, हे फार प्रसिद्ध होते. त्यांच्या हातांखालीं ह्या शास्त्राचें शिक्षण घ्यायचें त्यांनीं ठरवलें. विज्ञानापेक्षां ह्या शास्त्रांच्या अभ्यासानें देशाचा फायदा होईल असें त्यांना वाटलें. समाजरचनेचे सिद्धान्त समजल्याखेरीज नव्या समाजाच्या रचनेची स्फूर्ति कशी निर्माण होणार ? ही खात्री झाल्यानंतर पांच वर्षें केलेलें विज्ञानाचें अध्ययन पदवी पदरांत पडण्यापूर्वींच त्यांनीं सोडून दिलें आणि समाजशास्त्राच्या वर्गांत ते दाखल झाले.

परन्तु पुन्हा पैशांची तंगी त्यांना नडूं लागली. पुरेशी मजुरी मिळेना. नोकरीसाठीं वणवण करावें लागे. दोन वेळ पुरेसें खायला मिळणेंहि दुरापास्त. अंगावरचे कपडे फाटलेले. जयप्रकाश आजारी पडले. त्यांची धडपड कमी झाली. गरिबाला आजार म्हणजे शाप, दुःखावर डागण्या. गरिबीमुळें किती कुचंबणा ! गरिबीमुळें किती-

कांचे गुण मातींत मिळत असतील. उमेदी मारल्या जात असतील ! जयप्रकाश पांच महिने अंथरुणाला खिळून होते. ज्या काळांत पैशांची जरूरी त्या आजाराच्या काळांत रोज मजुरीवर जगणाराचे किती हाल ? जयप्रकाशांना कर्ज झालें. पांच महिन्यांनीं ते आजारांतून उठले. हवा-फेर करावा आणि मजुरी मिळवावी या दृष्टीनें त्यांनीं विस्कॉंसिन सोडलें आणि ओटियोला ते परत आले. ओटियोला त्यांचे जुने मित्र होते. कंबर कसून ते अभ्यासाला लागले. बी. ए.च्या परीक्षेला बसले. उत्तम रीतीनें पास झाले. एक शिष्यवृत्तिहि पदरांत पडली. त्यांनीं एम्. ए. चा अभ्यास सुरू केला. समाजशास्त्र ते पुस्तकांतून शिकले. त्यापेक्षां अधिक प्रत्यक्ष समाजांत वावरून शिकले होते. त्यामुळें त्यांच्या अध्ययनांत जिवंतपणा होता. एक टर्म संपतांच त्यांना विद्यापीठांत शिकविण्याचें काम मिळालें. आतां मजुरीसाठीं दारोदार फिरण्याचें कारण राहिलें नाहीं.

एम्. ए. साठीं जयप्रकाशांनीं समाजपरिवर्तन (Social variation) या विषयावर प्रबंध तयार केला. समाजपरिवर्तन शास्त्रावरचा तो एक श्रेष्ठ प्रबंध ठरला. जयप्रकाशांना एम्. ए.ची पदवी मिळाली. त्यांना विद्यापीठ अधिकाऱ्यांत चांगली मान्यता मिळाली. डॉक्टरेट-साठीं ते तयारी करूं लागले. परन्तु समाजशास्त्राचा अभ्यास करीत असतांना इतर विषयांचा त्यांना विसर पडला नाहीं. गणिताविषयीं त्यांना विशेष प्रेम असल्यानें फावल्या वेळांत गणित आणि विज्ञान यांचा जमेल तेवढा अभ्यास ते करीत. डॉक्टरेटची तयारी करीत असतांनाच त्यांना आईच्या आजाराची बातमी लागली. जयप्रकाश अस्वस्थ झाले. त्यांनीं परतायचें ठरवलें, पण पैसे कोठें होते ? सात वर्षांत त्यांना आईचें दर्शन झालें नव्हतें. त्यांनीं आपलें सामान रेल्वेनें रवाना केलें आणि हिचहायकिंग पद्धतीनें फुकटांत न्यूयॉर्कला पोंचायचें ठरवलें. गांवाबाहेर रस्त्यावर येऊन ते उभे राहिले. न्यूयॉर्ककडे

जाणाऱ्या रस्त्यानें एक मोटार जात होती. जयप्रकाशांनीं हात दाखवून ती थांबविली. वीसपंचवीस मैलांपर्यंत त्या मोटार-मालकानें त्यांना नेऊन सोडलें. पुन्हा तोच मार्ग अनुसरला. टप्प्याटप्प्यानें त्यांनीं न्यूयॉर्क गांठलें. या पद्धतीला हिचहायकिंग असें म्हणतात. अमेरिकेंत या पद्धतीनें प्रवास करणें शक्य होतें. न्यूयॉर्कमध्यें पोचल्यावर परतीच्या पैशासाठीं त्यांनीं पुन्हा कामाला सुरुवात केली. श्रमिकांचें जीवनच त्यांना पत्करावें लागलें. हॉटेलांत, कारखान्यांत त्यांनीं काम केलें. पण अचानक त्यांची अडचण दूर झाली; त्यांच्या एका मित्रानें आपल्या खर्चानें त्यांना इंग्लंडपर्यंत नेलें.

युद्धानें इंग्लंड काळवंडलें होतें. असा प्रसंग पुन्हा येऊं नये याची चिंता कांहींना लागली होती. जगभर सद्भाव पसरावा, हेवेदावे, शोषण नाहींसें व्हावें यासाठीं एक संस्था काढण्याचें घाटत होतें. त्या संस्थेचें काम करण्याची जयप्रकाशांची इच्छा होती. परंतु ती संस्था कागदावरच राहिली. जयप्रकाश इंग्लंडमध्यें कांहीं काळ राहून परत आले. कलकत्त्याला उतरतांच ते तडक सिताबदियारा येथें गेले, कारण त्यांची आजारी आई त्यांच्याच वाटेकडे डोळे लावून बसली होती. जयप्रकाशांना सात वर्षांनंतर तिनें पाहिलें. त्यांना पाहून तिच्या रोगानें पाऊल मागें घेतलें आणि जयप्रकाशहि थोडे निवांत झाले.

देशांत आल्यावर पुढें काय हा त्यांच्यापुढें सवाल होता. देशांतल्या तरुणांना अर्थशास्त्र आणि समाजशास्त्र यांची नवी दृष्टि देऊन तयार करावें ही त्यांची मनीषा होती. बनारस विद्यापीठांत मालवीयजींनीं त्यांना पाचारण केलें आणि समाजशास्त्र विभागाची जबाबदारी सांभाळण्याची त्यांना विनंती केली.

जयप्रकाश देशांत आले तोंच वातावरण तापत होतें. बार्डोली गाजत होती. स्वातंत्र्याचें वातावरण होतें. जुन्या नव्या पिढींत संघर्ष

## क्रांति अपनी पताका खोलती जा रही है।

विनोबा आर्थिक क्रांति का अहिंसक रूप हमारे सामने पेश कर रहे हैं। स्वराज्य की लड़ाई के ज़माने में बहुतेरे क्रांतिकारी इसी विवाद में फंसे रहे कि अहिंसा से भी कहीं आज़ादी हासिल की जा सकती है। उसी प्रकार आज भी वही विवाद आर्थिक क्रांति के सम्बन्ध में चल रहा है, और इन अंधे क्रांतिकारियों के सामने ही क्रांति अपनी पताका खोलती जा रही है।-

जयप्रकाश नारायण

[ जयप्रकाशजींचें हस्ताक्षर ]

चालला होता. गांधीजींच्या सल्ल्यावरून वसाहतींच्या स्वराज्याची मुदतबंद मागणी करण्यांत आली होती. ही मागणी मान्य होण्याचें कांहींच लक्षण दिसत नव्हतें. तरुण मंडळी पूर्ण स्वराज्याची मागणी करण्यासाठीं उतावीळ झाली होती. जवाहरलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखालीं रावी नदीच्या तीरावर लाहोरला काँग्रेसचें अधिवेशन भरावयाचें होतें. या सगळ्या गोष्टींकडे जयप्रकाश दुर्लक्ष करूं शकत नव्हते.

त्यांच्या पत्नी प्रभावतीदेवी गांधीजींच्या सान्निध्यांत होत्या. सात वर्षें गांधीजींच्या परिवारांत राहून त्यांनीं पुष्कळच विकास करून घेतला होता. त्या जणुं गांधीजींच्या मानसकन्याच बनल्या होत्या. जयप्रकाश देशांत आल्यावर गांधीजींच्याकडे गेले. गांधींनीं त्यांचें आत्मीयतेनें स्वागत केलें. त्यांच्यांत नाना विषयांची चर्चा झाली. जयप्रकाशांबद्दल अत्यंत स्नेहभाव गांधीजींच्या मनांत निर्माण झाला. गांधीजींच्या परिवाराबरोबरच ते लाहोर काँग्रेससाठीं रवाना झाले.

◆◆ ◆◆ ◆◆

ठा... स्थळप्रत.
अ.क्र. 20969 वि. ...
क्रमांक ... नों: दि: ...

# जनसत्तेची उपासना

जयप्रकाश अमेरिकेला गेले त्या वेळीं तेजोभंगामुळें देश उदासीन झाला होता. वर्षांत स्वराज्याच्या घोषणा हवेंत विरल्या होत्या. हतबल होऊन त्यांना परदेशाचा रस्ता धरावा लागला होता. पण ते परत आले तों राष्ट्र नवचैतन्यानें रसरसलेलें दिसत होतें. युवक-चळवळीमुळें तरुण वर्गांत वेगळेंच तेज चमकत होतें. आठ दहा वर्षांत कात टाकून देश पुन्हा तारुण्यानें मुसमुसला होता. ब्रिटिश सरकारला निर्वाणीचा खलिता पाठविला होता. त्याचें ३१ डिसेंबर १९२९ च्या रात्रीं १२ वाजेपर्यंत कोठल्याहि प्रकारचें उत्तर आलें नाहीं. राष्ट्रांतील तेजाची जाणीव परकी सरकारला झाल्याचा प्रत्यय आला नाहीं. स्वातंत्र्या-साठीं उत्सुक झालेल्या तरुणांना ही गोष्ट अपेक्षित होती. त्यांना बरें वाटलें. रात्रीं बारा वाजल्यानंतर नव्या १९३० च्या वर्षाचें स्वागत झेंडा फडकावून आणि संपूर्ण स्वातंत्र्याची घोषणा करून करण्यांत आलें. जयप्रकाश आणि जवाहरलाल यांचा या वेळीं परिचय झाला. जयप्रकाशांनीं विद्यार्थ्यांना समाजशास्त्र आणि अर्थशास्त्र शिकवीत कालक्रमणा करावी हें नेहरूंना पसंत नव्हतें. इतका उमदा तरुण घटपट करीत कॉलेजांत गुंतून पडणें ही राष्ट्राची हानि आहे असें त्यांना वाटलें. त्यांनीं जयप्रकाशांना काँग्रेसच्या मजूर-विभागाची जबाब-दारी पत्करण्याची सूचना केली. जवाहरलाल रशियाचा दौरा करून आले होते. श्रमजीवींच्या क्रांतिकारक प्रवृत्तींतून होणारें नवनिर्माण त्यांनीं प्रत्यक्ष पाहिलें होतें. समाजवादाचें त्यांना आकर्षण होतें. त्यामुळें

मार्क्सवादाचा आणि समाज-परिवर्तनाचा सखोल अभ्यास केलेला जयप्रकाशांसारखा सहकारी त्यांना हवा होता.

जयप्रकाशांनाहि घटपट करण्याची फार आवड होती असें नाहीं. समाजपरिवर्तनाचे सिद्धान्त शेवटीं पुस्तकांत राहण्यांत सार्थक नाहीं. त्या सिद्धान्तानुसार जनसंघटना करून नवसमाज रचना करणें हेंच खरें महत्त्वाचें असतें. श्रमजीवि जीवनाचा सात वर्षें त्यांनीं अमेरिकेंत अनुभव घेतला होता. भांडवलशाही आणि साम्राज्यशाही यांच्यापायीं मानवजीवन कसें मातीमोल होतें तें त्यांनीं पाहिलें होतें. समृद्धीच्या माहेरघरीं दारिद्र्य कसें आणि कां वास करतें ह्याचा छडा त्यांनीं लावला होता. मजुरांविषयींचा त्यांचा कळवळा हा स्वानुभवांतून निर्माण झाला होता. संतांच्या दयाजनित कळवळ्याप्रमाणें तो मानसिक किंवा बौद्धिक नव्हता. श्रमिकांचें जीवन ते जगले होते. समाजांतील विषमता आणि दारिद्र्य यांच्यामुळें त्यांच्या मनांत आगडोंब उसळला होता. पशुपक्ष्यांच्या चारापाण्याची व्यवस्था करणाऱ्या ईश्वराच्या सृष्टींत कष्ट करण्याची तयारी असूनहि मानवावर उपासमारीची पाळी येते हा अन्याय आहे. आणि नव्या आर्थिक पायावर समाजाची रचना झाल्या-खेरीज हे अन्याय थांबणार नाहींत, हें त्यांनीं जाणलें होतें. काँग्रेस-मध्यें श्रमिकांची संघटित शक्ति उभी केल्यावांचून साम्राज्यसत्तेचा नाश करण्याची ताकद तिच्यांत येणार नाहीं हें त्यांना स्वच्छ दिसत होतें. १९२० सालींच देशाचें दास्य दूर करण्याचा विडा त्यांनीं उचलला असल्यानें अन्य सुशिक्षितांप्रमाणें आपल्या व्यक्तिगत सुखसोयींचा विचार त्यांना शिवला देखील नाहीं. त्यांच्या जीवनाला सामाजिक अधिष्ठान मिळालेलें असल्यानें त्यांना पगारदार नोकरीपेक्षां त्यांनीं काँग्रेसच्या मजूर विभागांत काम करणें पसंत केलें.

स्वराज्य-भवनांत येऊन जयप्रकाशांनीं मजूर-विभागाच्या कामा-संबंधीं योजना आंखल्या. परंतु मजूर-संघटना उभी करण्याला उसंत

नव्हती. २६ जानेवारी १९३० हा दिवस देशभर स्वातंत्र्याची प्रतिज्ञा करण्यासाठीं मुक्रर करण्यांत आला. देशाच्या विकासाच्या मार्गांतील महत्त्वाची धोंड म्हणजे परकीय राज्य. हें राज्य नाहींसें झाल्याशिवाय देशाचा आर्थिक, नैतिक कोणताहि विकास अशक्य आहे. म्हणून तें राज्य नामशेष करून स्वतंत्र होण्यासाठीं कंबर कसण्याची हांक त्या दिवशीं सर्वत्र देण्यांत येणार होती. स्वातंत्र्याची ही प्रतिज्ञा म्हणजे भारतीय जनतेच्या हक्काचा जाहीरनामाच होता. गांधीजीहि स्वातंत्र्यासाठीं लढा देण्याच्या योजना घडवीत होते. मार्चच्या १२ तारखेला दांडी-यात्रेसाठीं निवडक सत्याग्रहींसह ते निघणार होते. सरकारी कायद्यांचा सविनय भंग करून परकी सरकारला आव्हान देणार होते. गांधीजींच्या या यात्रेनें देशांतील क्रांतिशक्ति उफाळून आली. सरकारनें गांधीजींना अटक केली. कॉंग्रेस संस्था बेकायदेशीर ठरली. गांवोगांव सरकारचे कायदे मोडले जाऊं लागले. अटका, लाठीमार, सजा यांची झडी लागली. सभा आणि फेऱ्या यांनीं देश दुमदुमून गेला. जनतेच्या देशभक्तीचें तें विराटदर्शन पाहून ब्रिटिश सरकार नमलें. गांधी-आयर्विन करार झाला. या सर्व आंदोलनापासून जयप्रकाश अलिप्त कसे राहतील ? ते त्यांत अधिकाधिक गुरफटत होते. पण एवढ्यांत त्यांच्या आईनें अंथरूण धरलें. जयप्रकाश सेवेसाठीं गेले. भारतमातेच्या ओटींत आपल्या मुलाला घालून माता फुलराणी स्वर्गवासी झाल्या.

जयप्रकाशांच्या घरची आर्थिक परिस्थिति अगदीं मोडकळीस आली होती. गांधी आयर्विन करारामुळें कामांतहि शैथिल्य आलें होतें. आर्थिक कात्रींत सांपडल्यानें जयप्रकाशांना नोकरी शोधावी लागली. त्यांना विद्यापीठांत आतां नोकरी मिळणें शक्य नव्हतें. शेवटीं बिर्लांच्या सेक्रेटरीचें काम त्यांनीं कांहीं काळ पत्करलें. या काळांत भारतीय भांडवलदारांचें अंतरंगदर्शन त्यांना झालें. अशा

माणसाच्या कामांत आपली बुद्धि लावणें त्यांना प्रशस्त वाटेना. त्यांनीं ह्या नोकरीला लाथ मारून पुन्हा कॉंग्रेस कार्यालयाचा रस्ता धरला. गांवोगांव तीस सालीं जे स्वयंपूर्ण उठाव झाले त्यांची हकीकत त्यांनीं जमा केली व एक टांचण तयार करून ठेवलें.

गांधीजी विलायतेला गेले होते. गोलमेज परिषद यशस्वी व्हावी व स्वराज्याच्या दिशेनें देशाचें पाऊल पुढें पडावें यासाठीं त्यांनीं आटोकाट प्रयत्न केले. परंतु ते अपेशी ठरले. इकडे सरकारला कॉंग्रेसशीं बरोबरीच्या नात्यानें केलेल्या तहाचें शल्य डाचतच होतें. सरकारनें कॉंग्रेसची चळवळ नेस्तनाबूद करण्याची तयारी चालविली. गांधीजी विलायतेहून परततांच त्यांनीं चौफेर हल्ला सुरू केला. पुढाऱ्यांना तुरुंगांत डांबण्यांत आलें. पण जनता उसळून प्रतिकारार्थ उभी राहिली. सरकार कॉंग्रेसला चिरडून टाकल्याचा आव आणीत होतें, तर इकडे जनमनांत कॉंग्रेसचीं मुळें अधिकच खोल रुजत होतीं.

पुढारी अटकेंत पडतांच जयप्रकाश संग्राम-समितीचे प्रमुख बनले. त्यांनीं चळवळींत प्राण ओतला. मुंबईला त्यांनीं कॉंग्रेसचें कार्यालय उघडलें. यूथ लीगच्या आणि सेवादलाच्या तरुण कार्यकर्त्यांचें त्यांना साहाय्य आहे. गुप्तरूपानें कॉंग्रेसचें कार्य चालू झालें. कॉंग्रेसच्या पत्रिका सर्वत्र प्रगत होऊं लागल्या. सरकारी गुप्तचरांची मति कुंटित झाली. चळवळीचीं सूत्रें हलतात कुठून हा प्रश्न त्यांना सुटला नाहीं. बहिष्कार, निरोधनें, करबंदी, फेऱ्या यांना तर तोटाच नाहीं. वानरसेना ‘ हें सैतानी सरकार, नाहीं जिवंत आम्ही ठेवणार ’ अशा घोषणांनीं रस्ते दणाणून सोडीत आहे.

पण सर्वांत कहर झाला तो दिल्लींत. व्हाईसरॉयच्या डोळ्यांदेखत कॉंग्रेसचें अधिवेशन भरलें तेव्हां. सरकारचा सर्व जय्यत बंदोबस्त असतांनाहि उघड उघड कॉंग्रेसचें अधिवेशन भरलें. सर्व प्रांतांतून

प्रतिनिधि आले. एक दिवस उजाडतांच चांदणी चौकांत तिरंगी झेंडे फडकूं लागले. ‘ इन्किलाब झिंदाबाद ’ ‘ महात्मा गांधीकी जय ’ या घोषणा दुमदुमल्या. टेबलावर चढून अध्यक्षांनीं भाषण केलें. ठराव पास झाले. सरकारनें याचा सूड म्हणून लाठीमार, अटक यांचें सत्र सुरू केलें. परंतु ‘ कॉंग्रेस मेली ’ हा जो सरकारचा भ्रम होता तो दूर झाला.

यानंतर बनारसला कॉंग्रेस वर्किंग कमिटीची गुप्त बैठक झाली. इंग्लंडमधील ‘ इंडिया लीग ’नें हिंदुस्थानांतील सरकारी अत्याचारांची पाहणी करण्यासाठीं एक शिष्टमंडळ पाठविण्याचें ठरविलें. या शिष्टमंडळानें प्रत्यक्ष डोळ्यांनीं परिस्थिति पाहावी व इंग्लिश जनतेला सर्व समजावून सांगावें अशी कल्पना होती. ब्रिटिश मजूर पक्षाचे युरोपीयन सभासदहि या शिष्टमंडळांत आले होते. जयप्रकाशांनीं देशभर फिरून ह्या शिष्टमंडळाला मदत करावी असें ठरलें. परंतु जयप्रकाश सरकारच्या डोळ्यांत सलत होते. शिताफीमुळें ते पोलिसांच्या हातीं लागले नव्हते इतकेंच. शिष्टमंडळाबरोबर असेपर्यंत तरी जयप्रकाशांना पकडण्याचें धाष्टर्य सरकार करणार नाहीं अशी कल्पना होती. कारण तो तर प्रत्यक्ष पुरावाच शिष्टमंडळाला मिळाला असता. पण सरकारची बुद्धि इतकी ठिकाणावर नव्हती. मद्रासला जयप्रकाश शिष्टमंडळा-बरोबर गेले. देशांतील चळवळींची इत्थंभूत माहिती जयप्रकाशांनाच असल्यानें त्यांच्याशिवाय दुसरा अधिक लायक इसम डेलिगेशनबरोबर फिरण्याला नव्हताच. मद्रासच्या पोलिसांना खबर मिळतांच त्यांनीं जयप्रकाशांना अटक केली आणि नाशिकच्या तुरुंगांत त्यांना रवाना केलें.

जेलमध्यें गेल्यानंतर स्वस्थपणें विचार-विमर्श सुरू झाला. इकडे हरिजनांना दिलेलें स्वतंत्र मतदार-संघ रद्द करवून घेण्यासाठीं गांधींनीं

प्राणांतिक उपवास जाहीर केला. उपवासाची यशस्वीपणें परिसमाप्ति झाली. परंतु दास्यविमोचनावरचें लक्ष उडून तें हरिजन-कार्याकडे केंद्रित होऊं लागलें. सत्याग्रहाची चळवळ हळू हळू बारगळली. जेलमध्यें जमलेले सत्याग्रही वेगवेगळ्या दृष्टिकोनांतून आत्मपरीक्षण करूं लागले. कांहींना वाटलें आपली सत्यनिष्ठा अर्धवट आणि अहिंसेवरचा आधार तकलादू असल्यानें चळवळ अपेशी झाली. विधायक कार्यावर अधिक लक्ष केंद्रित केलें पाहिजे. कांहींना वाटलें ह्या चळवळीमुळें विधिमंडळांत काँग्रेसची अधिक सरशी होईल कारण लोकमत चळवळीमुळें काँग्रेसला अनुकूल झालें आहे. चळवळीनंतर पुन्हा विधिमंडळाचें राजकारण सुरू करण्याच्या योजना ही मंडळी आखूं लागली. तरुणांनीं मार्क्सवादाचा अभ्यास सुरू केला. मार्क्सच्या म्हणण्याप्रमाणें वर्गीय संघटना बळकट करून किसान कामगारांच्या संघटित शक्तीनें साम्राज्यवाद आणि भांडवलशाही ह्या दोहोंवर मात करतां येईल. समाजरचनेचा शास्त्रशुद्ध विचार करून आर्थिक पायावर क्रांतिकारी संघटना उभारल्या पाहिजेत असें त्यांना वाटूं लागलें होतें. नाशिकच्या तुरुंगांत एस्. एम्. जोशी, ना. ग. गोरे, अच्युतराव पटवर्धन, युसुफ मेहेरअल्ली, मसानी प्रभृति युवक नेते हजर होते. त्या सर्वांनीं विचारविनिमय करून देशांत समाजवादाची प्रस्थापना करण्याच्या दृष्टीनें एक कार्यक्रम आंखला. राष्ट्रीय चळवळ ही आम जनतेपर्यंत पोंचल्याशिवाय तिच्यांत सामर्थ्य येणार नाहीं. किसान कामगारांच्या संघटना उभारून त्यांना राष्ट्रीय चळवळीशीं समरस केलें पाहिजे. यामुळें काँग्रेसला समाजवादी आर्थिक तत्त्वज्ञानाचा स्वीकार करण्यास भाग पाडतां येईल आणि किसान कामगारांमुळें काँग्रेसहि बलिष्ठ होईल. लढ्यांच्या दृष्टीनेंहि मध्यम वर्गापेक्षां श्रमिक वर्ग अधिक कडवा असतो. किसान कामगारांच्या संघटना उभारावयाच्या तर त्यासाठीं भविष्य काळचीं सुखस्वप्नें रंगवून त्यांना भुलवण्यापेक्षां त्यांचीं

दैनंदिन गाऱ्हाणीं दूर करण्याचा व्यवहार्य मार्गच पत्करला पाहिजे. काँग्रेसच्या समोर स्वातंत्र्योत्तरकालीन भारताचें जें अस्पष्ट चित्र आहे तें स्पष्टपणें समाजवादी समाजरचनेचें असावें यासाठीं प्रयत्न केला पाहिजे. समाजवादी तत्त्वज्ञान ग्रंथजडतेंतून बाहेर आणून त्याचा राष्ट्रीय समस्यांशीं मेळ घातला पाहिजे. नाशिकच्या तुरुंगाप्रमाणेंच देशांतल्या वेगवेगळ्या तुरुंगांत जे सत्याग्रही होते त्यांच्यापैकीं बरेच जण विचारमंथनानंतर अशा स्वरूपाच्या निर्णयावर पोंचले होते. नाशिक जेलमध्यें काँग्रेस अंतर्गत एक अखिल भारतीय पक्ष स्थापन करण्याचें ठरविण्यांत आलें.

१९३४ चें वर्ष उजाडलें. बिहारमध्यें प्रचंड भूकंप झाला. सगळीकडे हाहा:कार माजला. राजेंद्रबाबूंच्या नेतृत्वाखालीं मदतीचें कार्य सुरू झालें. सर्व कार्यकर्ते त्याच कामांत गढून गेले होते. त्या कामांतून उसंत मिळतांच काँग्रेस कार्यकर्ते पुन्हा राजकीय विचारांत गढून गेले. काँग्रेसच्या राजकारणांत वेगवेगळे प्रवाह स्पष्टपणें दिसत होते. विधिमंडळें राबवून सरकारचा डाव हाणून पाडावा म्हणणारांचा एक गट होता. डॉ. अन्सारी आणि डॉ. विधानचंद्र राय हे ह्या गटाचे कर्णधार होते. विधिमंडळांच्या राजकारणांत रस नसलेले परंतु त्याबाबत उदासीन असलेले विधायक कार्यकर्ते एका गटांत होते. तिसरा गट समाजवादी प्रवृत्तीच्या तरुणांचा होता. ब्रिटिश सरकारशीं सहकार्य करण्याला ह्या गटाची अनुकूलता नव्हती. विधिमंडळाच्या राजकारणांत गुरफटून घेऊन काँग्रेसनें लढाऊ राजकारणाकडे दुर्लक्ष करूं नये असें या गटाचें म्हणणें होतें. ह्या तिन्ही गटांचें आपापल्यापरीं महत्त्व होतें. ह्या तिन्ही गटांनीं आपापलीं वैशिष्ट्यें कायम राखून एका काँग्रेसपक्षांत काम करावें असें गांधीजींना वाटत होतें. तिन्ही गटांना काम करण्यास संपूर्ण वाव मिळावा असें त्यांना वाटत होतें. लढा चालू ठेवण्याची देशाची तयारी नाहीं असें पाहून त्यांनीं

लढा स्थगित केला आणि पाटण्याला १९३४ च्या मे महिन्यांत भरलेल्या अखिल भारतीय काँग्रेसच्या अधिवेशनांत त्यांनीं सनदशीर मार्गानें काम करणाऱ्यांचा मार्ग मोकळा करून दिला. काँग्रेसच्या नांवावरच देशांतल्या निवडणुका लढविण्याचें ठरलें. समाजवादी शक्तिहि संघटित होण्याची वाटच पाहात होती. काँग्रेसच्या अधिवेशनाला जोडूनच देशांतील समाजवादी विचारांच्या कार्यकर्त्यांची एक परिषद आचार्य नरेंद्रदेवांच्या अध्यक्षतेखालीं भरविण्यांत आली. काँग्रेस अंतर्गत समाजवादी विचारांची संघटना उभारण्याचें ठरविण्यांत आलें. जयप्रकाशांचा ह्या सर्व घडामोडींत महत्त्वाचा भाग होता. त्यांनाच ह्या नव्या पक्षाचे संघटन-मंत्री नेमण्यांत आलें. कामगार-वर्गांत काम करण्याच्या दृष्टीनें ट्रेड युनियन काँग्रेसमध्यें भाग घ्यावयाचें ठरविण्यांत आलें.

पाटण्याच्या परिषदेनंतर चार महिन्यांत प्रांतोप्रांतीं काँग्रेस समाजवादी पक्षाचें काम सुरू झालें! ऑक्टोबर १९३४ मध्यें मुंबईला समाजवादी पक्षाची बैठक संपूर्णानंदांच्या अध्यक्षतेखालीं भरून पक्षाची घटना आणि कार्यक्रम ठरविण्यांत आला. श्रमिकांचें प्रभुत्व राज्यसत्तेवर प्रस्थापित करून अशा राज्यसत्तेच्या हातीं आर्थिक संबंधाचें नियंत्रण सुपूर्त करणें हा पक्षाचा उद्देश. या दृष्टीनें मूलभूत महत्त्वाचे असे लोखंड, कापड, वाहतूक, मळे, बँका, विमा कंपन्या वगैरे धंदे राष्ट्रीयीकरण करून त्यावर समाजाची सत्ता स्थापन करणें जरूर आहे. परदेशांशीं होणारा सर्व व्यापार सरकारी नियंत्रणाखालींच असला पाहिजे. ज्या धंद्यांचें राष्ट्रीयकरण करणें आवश्यक नसेल ते धंदे सहकारी पद्धतीवर उभारण्यांत आले पाहिजेत. जमीनदार, भांडवलदार वगैरे ज्या वर्गांनीं मोठ्या प्रमाणावर शोषण केलें त्यांना कोठल्याहि प्रकारें मोबदला न देतां त्यांची मिळकत सरकारनें ताब्यांत घ्यावी. देशांतील जमिनीवरील विषम मालकी हेंच जनतेच्या दारिद्र्याचें

मुख्य कारण असल्यानें जमिनीचें फेरवाटप झाल्याखेरीज आर्थिक अन्याय कमी होणार नाहीं. शेतकरी कामगारांचें कर्जहि रद्दबातल ठरविलें पाहिजे. प्रत्येक माणसाला जीवननिर्वाहासाठीं रोजगाराची शाश्वति मिळेल अशी सोय व्हावी. शक्तीप्रमाणें काम आणि गरजे-प्रमाणें सोयी सर्वांना मिळाल्या पाहिजेत. धर्माबाबत पक्षपात केला जाणार नाहीं. स्त्रीपुरुषांना समान अधिकार मिळतील. समाजवादी पक्षाचें हें उद्दिष्ट म्हणजे जनतेच्या हक्काचा जाहीरनामाच आहे. इतक्या स्पष्ट शब्दांत ध्येयाची घोषणा पक्षानें आरंभींच केली.

यानंतर मुंबईला राजेंद्रबाबूंच्या अध्यक्षतेखालीं कॉंग्रेसचें अधिवेशन भरलें. कॉंग्रेसनें ' न्याय आणि शांतता ' यांच्या मार्गानें स्वातंत्र्यासाठीं लढण्याची प्रतिज्ञा केली होती. गांधीजींची अशी इच्छा होती कीं कॉंग्रेसनें ' सत्य आणि अहिंसा ' यांचा ध्येय म्हणून स्वीकार करावा. परंतु कॉंग्रेसची तेवढी तयारी नव्हती. कॉंग्रेसची व्यापकता कायम ठेवण्याच्या दृष्टीनें ' सत्य आणि अहिंसा ' यांचा आग्रह धरूं नये असें समाजवाद्यांचें मत होतें. सत्य—अहिंसा हें साधन पेलण्याची जनतेची ताकत नाहीं हें पाहून गांधीजींनीं आपला आग्रह सोडला आणि कॉंग्रसचें सभासदत्व त्यांनीं सोडलें. कॉंग्रेससाठीं जरूर तें काम करण्याचें त्यांनीं मान्य केलें होतें. विधिमंडळांच्या निवडणुका कॉंग्रेसनें लढवावयाचें ठरविलें. सरकारला हिंदी राष्ट्रवादाचें हें आव्हान आहे असें मानून कॉंग्रेसमधील तिन्ही विचारप्रवाहांनीं सर्व बळ एकवटून या निवडणुका लढविल्या. असें असलें तरीहि कॉंग्रेसची शक्ति विधिमंडळ कार्यापेक्षां संघटनात्मक व विधायक कार्यांतच अधिक खर्च व्हावी असें सर्वांचें मत होतें. कॉंग्रेस समाजवादी पक्षानें कामगार, किसान, विद्यार्थी, महिला व स्वयंसेवक चळवळी यांच्या कामांत अधिक लक्ष घातलें.

कॉंग्रेसनें सत्ता-स्वीकार करूं नये अशा मताच्या लोकांचा फारसा प्रभाव राजकारणांत पडला नाहीं. गव्हर्नरांकडून हस्तक्षेप न करण्याचें तोंडी अभिवचन घेऊन कॉंग्रेसनें सत्ता स्वीकारण्याचा निर्णय ठरविला. कॉंग्रेस सरकारांनीं हातीं सत्ता घेतली तर ती पुरोगामीपणें वापरून किसान कामगारांच्या संघटना मजबूत होण्याला मदत करावी असें समाजवाद्यांना वाटत होतें. परन्तु कायदेमंडळांतील सभासदांचें धोरण एकाजिनसी व श्रमिकांना अनुकूल नव्हतें. देशांतील विरोधी प्रतिगामी शक्ति ब्रिटिश सरकारच्या पाठिंब्यानें कॉंग्रेस सरकारांना बदनाम करण्यासाठीं धडपडत होत्या. कॉंग्रेसनें पुरोगामी आर्थिक धोरण स्वीकारूं नये यासाठीं प्रस्थापित हितसंबंधाचे लोक खटपट करीत होते. कॉंग्रेस-भोंवतींचें हें स्थापित स्वार्थाचें कडें ढिलें व्हावें आणि पुरोगामी आर्थिक पावलें टाकण्यासाठीं अनुकूलता लाभावी यासाठीं शेतकरी कामगार विद्यार्थ्यांची शक्ति संघटित करण्याची खटपट समाजवादी करूं लागले. सत्तेपेक्षां जनशक्तीवर आणि जनतेच्या क्रांतिकारी वृत्ती-वर जयप्रकाशांचा अधिक भरंवसा असल्यानें सत्ता स्वीकाराच्या राज-कारणाचें त्यांना अजिबात आकर्षण नव्हतें. कॉंग्रेस सरकारांना पुरोगामी धोरण अवलंबितां यावें यासाठीं जनशक्ति संघटित करण्याचा त्यांचा प्रयत्न होता. जनतेच्या संघटित मनाचें प्रतिबिंब अखेर कायद्यांत पडल्याशिवाय राहणार नाहीं अशी त्यांची खात्री होती. परन्तु कॉंग्रेस सरकारांच्या विरुद्ध अशा प्रकारें मतप्रदर्शन करणें कॉंग्रेसश्रेष्ठींना मानवत नव्हतें. कॉंग्रेसचे पदाधिकारी आणि समाजवादी यांच्यांत मतभेद होत होते. परंतु स्वातंत्र्यासाठीं लढणारांचा संयुक्त मार्चा या दृष्टीनें कॉंग्रेसपासून कोणीहि फटकून राहात नव्हतें. कॉंग्रेस हीच अशी एक संस्था होती कीं, जिच्यामार्फत राष्ट्रव्यापी सामुदायिक लढा उभारतां येणार होता. त्यामुळें कॉंग्रेस कमकुवत न बनवितां ती अधिक जहाल व्हावी यासाठीं समाजवादी प्रयत्न करीत होते. जय-

प्रकाशांना काँग्रेस कार्यकारिणीवर देऊं केलेली जागा त्यांनीं पक्ष-संघटनेसाठीं नम्रपणें नाकारली आणि बिहारमध्यें किसान कामगारांच्या लढाऊ संघटना बांधण्यासाठीं त्यांनीं आपली सर्व शक्ति खर्च केली. राजबंद्यांच्या मुक्ततेची त्यांनीं मागणी केली आणि राजबंद्यांची मुक्तता करणें जर मंत्रिमंडळांना शक्य नसेल तर त्यांनीं त्या प्रश्नावर राजीनामे द्यावेत अशी जयप्रकाशांनीं मागणी केली. गांधींनीं ही मागणी उचलून धरली तेव्हां राजबंद्यांचा प्रश्न धसाला लागला.

देशांतील सर्व डाव्या गटांनीं एकत्र यावें व काँग्रेसला जहाल बनवावें या दृष्टीनेंहि जयप्रकाशांनीं खूप खटपट केली. अशा प्रकारची आवळ्याची मोट बांधणें दुरापास्त होतें. त्यांतून एकजुटीच्या पांघरुणा-खालीं दुसऱ्यांना पोखरण्याचे डावपेच कम्युनिस्टांनीं आरंभले. त्यामुळें डाव्याच्या एकजुटीची घोषणा कधींच कार्यान्वित होऊं शकली नाहीं. युद्धाच्या भीतीनें जागतिक आकाश काळवंडूं लागलें होतें. देशाच्या स्वातंत्र्यार्थ या वेळीं निकरानें प्रयत्न करावा असें जयप्रकाश प्रभृतींना वाटत होतें. परंतु युद्धाबाबतचें इतर डाव्यांचें धोरण स्वाभिमान-शून्यतेचें असल्यानें आपोआपच ह्या प्रयत्नांना खंड पडला.

◆◆ ◆◆ ◆◆

# पिंजऱ्यांतून सुटका

युद्धाची सावली जगावर पडत असल्याचें सूक्ष्मदर्शी राजकीय नेत्यांना जाणवत होतें. जागतिक युद्धाची ठिणगी पडली तर पहिल्या महायुद्धानंतर हात चोळीत बसण्याची देशावर पाळी आली तशी पुन्हा येऊं नये असें जयप्रकाशांना वाटत होतें. युद्धाचीं बीजें लोभी साम्राज्यवादांतच पोसलीं जाऊन अंकुरित होतात. त्यामुळें साम्राज्य-वादी युद्ध सुरू झालें, म्हणजे दास्यमुक्तीसाठीं प्रयत्न करणें गुलाम राष्ट्रांना कर्तव्यरूप ठरतें. मातृभूमि स्वतंत्र करण्यासाठीं झटणारांची सेना उभी करण्यासाठीं जयप्रकाश झटत होते. स्वातंत्र्याची त्यांची कल्पना स्वप्नरंजी नव्हती. समाजवादी समाजरचना स्थापन करण्याच्या मार्गांत परदास्य हा मोठा अडथळा असल्यानें तो आधीं दूर झाला पाहिजे हें हेरून किसान—कामगार विद्यार्थी महिला यांच्या लढाऊ संघटना उभारण्याच्या कामांत ते मग्न होते.

१९३९ च्या सप्टेंबर महिन्यांत युद्धाची ठिणगी पडली. व्हाइसरॉयनें एक फतवा काढून हिंदुस्थानच्या जनमताची दखलहि न घेतां हिंदुस्थानला युद्धांत गोवलें. ब्रिटिश सरकारनें युद्धहेतु जाहीर करावे अशी कॉंग्रेसनें मागणी केली. परंतु सरकारनें कॉंग्रेसच्या ह्या मागणीचा अनादर केला. कॉंग्रेस सरकारांनीं राजीनामे दिले. जयप्रकाश प्रभृतींचा आग्रह होता कीं कॉंग्रेसनें लढा सुरू करावा. परंतु कॉंग्रेसनें आस्तेकदम धोरण स्वीकारलें. जयप्रकाश प्रभृति आपल्या भूमिकेचा जोरदार प्रचार जनतेंत करीत होते. युद्धाचें साम्राज्यशाही

स्वरूप स्पष्ट करून अशा युद्धांशीं गुलाम हिंदुस्थाननें सहकार्य करण्यांत काय धोके आहेत तें त्यांनीं लोकांना समजावून सांगितलें. जनसंघटनेच्या आघाडीवराहि त्यांचें आगेकूच चालूच होतें. मजुरांमध्यें कार्य करण्यासाठीं नवे कार्यकर्ते तयार झाले. मुंबई, उत्तर प्रदेश, बिहार, पंजाब, बंगाल या प्रांतांत मजूर-संघटना मूळ धरूं लागल्या. जमशेटपूरला टाटांचा लोखंडांचा प्रचंड कारखाना आहे. तेथील मजूर-संघटनेच्या कामांत जयप्रकाशांनीं जातीनें लक्ष घातलें. जमशेटपूरच्या तार-कंपनीच्या मजुरांनीं संप केला. जयप्रकाश त्यांचें नेतृत्व करीत होते. पण अचानक त्यांना अटक करून नऊ महिन्यांची शिक्षा ठोठावण्यांत आली. कोर्टांत जयप्रकाशांनीं जें निवेदन केलें तें त्यांच्या भूमिकेचें द्योतक होतें. ते म्हणाले : "सरकारनें माझ्यावर युद्ध-प्रयत्नांत अडथळा आणल्याचा आणि युद्धसामग्रीच्या उत्पन्नांत खंड पडेल असें वातावरण निर्माण केल्याचा आरोप केला आहे. माझ्या दृष्टीनें हा सरकारचा आरोप म्हणजे देशभक्तीचें प्रशस्ति-पत्रच आहे. आपल्या देशाची सेवा करण्याबद्दल परकी सरकार जी सजा ठोठावेल ती मी हसत हसत स्वीकारीन. तलवारीच्या बळावर ज्यांनीं आपलें राज्य कायम ठेवलें आहे त्यांच्या कायद्यांच्या दृष्टीनें हा गुन्हा ठरत असेल तर ठरो बापडा, मला त्याची पर्वा नाहीं. कारण हे कायदे हिंदुस्थानची गुलामी कायम टिकविण्यासाठींच बनविले आहेत.

"ह्या महायुद्धांत स्वत:ला कोठल्याहि प्रकारें गुंतवून घ्यायला माझा देश तयार नाहीं. जर्मन नाझीवाद हा आमचा जेवढा दुष्मन तितकाच ब्रिटिश साम्राज्यवादहि दुष्मन आहे. उडदामाजीं काळे गोरे काय निवडणार? आपल्याला दुसऱ्यांचें शोषण करतां यावें यासाठीं दोन्ही बाजू एकमेकांवर प्रहार करीत आहेत. इंग्रज साम्राज्य-शाहीनेंच ह्या नाझीवादाला पोसलें आहे. आतां त्यांच्याविरुद्ध दंड थोपटून तो उभा राहिला म्हणून इंग्रज त्याच्याशीं लढायला तयार

झाले आहेत. इंग्रजांना आपलें साम्राज्य कायम ठेवायचें म्हणून ही त्यांची धडपड आहे. साम्राज्यवादाच्या रक्षणार्थ स्वखुशीनें कोणता गुलाम देश मदत करील ? आणि हिंदुस्थानांतील लोकमताला कस्पटा-समान समजून व्हाईसरॉयनें देशाला युद्धांत ओढलें. जर्मनीनें पोलंडवर केलेलें आक्रमण आणि व्हाईसरॉयचें हें कृत्य यांच्यांत उजवें डावें कांहीं ठरवतां येणार नाहीं. आमची गुलामी कायम ठेवण्यासाठीं चाललेल्या ह्या युद्धांत काडीमात्र मदत करूं नका हें लोकांना शिकविणें हें आमचें कर्तव्यच आहे. हें कर्तव्य केल्याबद्दल आम्हांला तुरुंगांत डांबून सरकार स्वतःच आपल्या साम्राज्यशाही वृत्तीची दौंडी पिटीत आहे. माझ्या व्याख्यानाचा खरोखर किती परिणाम झाला हें मला ठाऊक नाहीं, पण खरोखरच तसें कांहीं झालें असलें तर मला अधिक आनंद होईल.

" हिंदुस्थानच्या संरक्षणाच्या कामांत मी अडथळा आणल्याचा आरोप माझ्यावर आहे, पण आपल्या बेड्या कायम ठेवण्यासाठीं मदत करण्याला कोणीहि गुलाम बांधलेला नाहीं. त्या बेड्या तोडण्यासाठीं तत्पर असणें हें त्याचें कर्तव्य आहे भारताच्या रक्षणाचा बाऊ करण्यांत काय हंशील आहे ? हिंदुस्थान स्वतंत्र झाला म्हणजे साऱ्या जगाला दिसेल कीं तो किती नेकीनें देशाच्या रक्षणार्थ उभा राहतो. "

आणि जयप्रकाशांनीं खरोखरच न्यायाधिशांनीं दिलेली सजा आनंदानें स्वीकारली. त्यांना हजारीबाग जेलमध्यें पाठविण्यांत आलें. तेथें जातांच जयप्रकाशांनीं कामाला आरंभ केला. कार्यकर्ते बाहेर कामांत इतके व्यग्र असतात कीं त्यांना लिहावाचायला, अभ्यासाला फुरसतच मिळत नाहीं. त्यामुळें कार्यकर्त्यांची उंची वाढत नाहीं. जेलमधील वेळेचा शिक्षणासाठीं उपयोग करायचें त्यांनीं ठरविलें.

त्यांनीं कार्यकर्त्यांसाठीं अभ्यासवर्ग सुरू केले. तेथें एकांगी शिक्षण न देतां सर्वांगीण शिक्षण देण्याचा त्यांचा प्रयत्न होता. राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, विज्ञान यांचे वर्ग ते घेऊं लागले. कार्यकर्त्यांमध्यें त्यामुळें नवचैतन्य पसरलें. त्याचबरोबर त्यांनीं बाहेरच्या मंडळींशींहि संबंध जोडले. युद्धकाळांत देशाच्या स्वातंत्र्यासाठीं लढा उभारण्याची जोरदार तयारी करा असा आदेश त्यांनीं मित्रांना पाठविला. सजा पूर्ण होतांच ते हजारीबाग जेलमधून सुटले. गांधीजींनीं व्यक्तिगत सत्याग्रहाला आरंभ केला होता. गांधीजी ज्याची निवड करतील तोच इसम युद्धविरोधी सत्याग्रह करी. सत्याग्रही अगोदर सरकारी अधिकाऱ्यांना सूचना देत असत. जयप्रकाशांची कल्पना होती कीं व्यक्तिगत सत्याग्रह सुरू असल्यानें ते स्वतःहून सरकारला सत्याग्रहाची सूचना देईपर्यंत सरकार फारकरून त्यांना अटक करणार नाहीं. बाहेर येतांच त्यांनीं जोरानें कामाला आरंभ केला. कॉंग्रेसवर जनमताचें दडपण आणून सामुदायिक लढा करण्यासाठीं तिला प्रवृत्त करावें आणि असा लढा सुरू झाला तर जनतेच्या लढाऊ संघटना तयार असाव्या असा त्यांचा प्रयत्न होता. बंगाल, बिहार, उत्तर प्रदेश, गुजरात या प्रांतांतील कार्यकर्त्यांच्या गांठीभेटी घेऊन त्यांना पुढील कामाची योजना समजावून सांगून जयप्रकाश मुंबईला आले. त्यांच्यासाठीं मुंबईंत सरकारनें सांपळा तयार करूनच ठेवला होता. जयप्रकाशांना सरकारनें अटक केली आणि जयप्रकाशांना देवळीच्या तुरुंगाचा रस्ता दाखविला. राजपुतान्याच्या वाळवंटांत ही कैदी छावणी मुद्दाम उघडण्यांत आली होती. राजबंद्यांना त्रस्त करण्यासाठीं ही योजना होती. अगदीं एकाकी छावणी असल्यानें राजबंद्यांचा कितीहि छळ केला तरी बाहेर बातमी फुटण्याची शक्यता नाहीं असें सरकारला वाटत होतें. देवळी छावणींतलें धोरण फार कडक होतें. तुरुंगांत माणुसकीची साधी वागणूक मिळणेंहि दुरापास्त झालें होतें. कैद्यांना एकमेकांशीं भेटण्याला मनाई

होती. त्यांना दोन वेळां आरोग्यदायक जेवण मिळत नसे. स्थानबद्धांत फूट पाडण्यासाठीं मुद्दाम वर्गवारी करण्यांत आली होती. राजपुतान्याचें हवामान सर्व कैद्यांना मानवत नव्हतें. सरकारकडे सामोपचारानें केलेल्या मागण्यांचा कांहींहि उपयोग होईना. सत्याग्रहांतलें अखेरचें शस्त्र म्हणजे अन्नत्याग. अन्नत्यागावर मामला येणार असें दिसूं लागलें. तेव्हां कांहींनीं हातपाय गाळले. परन्तु शरीराची आसक्ति सोडल्याशिवाय अन्यायाच्या प्रतिकारार्थ खऱ्या अर्थानें सज्ज होत नाहीं. शरीराच्या सुखदुःखाच्या पलीकडे जाण्याची ज्याची तयारी त्याला आपली सत्यनिष्ठा टिकवितां येते. कारण अखेरचा सामना स्वतःशींच माणसाला करावा लागतो. अन्याय, असत्य यांच्यापुढें मान तुकवायची कीं त्यापायीं प्राण त्यागाला सिद्ध व्हायचें हाच महत्त्वाचा प्रश्न आहे. जयप्रकाशांची सत्यनिष्ठा तकलादू नाहीं. एकदां ज्या सरकारला सैतानी म्हटलें त्याच्याशीं सहकार्य करणें शक्य नाहीं म्हणून त्यांनीं अमेरिकेची वाट धरली. देवळीच्या राजबंद्यांवरच्या अत्याचाराबाबतहि त्यांचें हेंच धोरण होतें. मागण्या करतांना त्या विचारपूर्वक व किमान कराव्यात, पण त्या मान्य झाल्या नाहींत तर शेंडी तुटो कीं पारंबी तुटो या निश्चयानें उभें राहावें हा त्यांचा बाणा. इतरांनीं हातपाय गाळले तरी जयप्रकाश अलग राहिले.

सरकारकडे मागणीपत्रक गेलें. स्थानबद्धांमधले वर्गीकरण रद्द करावें, त्यांना आपापल्या प्रांतांतील तुरुंगांत पाठवावें, त्यांच्या कुटुंबियांना भत्ता मिळावा, तुरुंगांत अधिक माणुसकीची वागणूक मिळावी ह्या साध्या मागण्यांना सरकारनें वाटाण्याच्या अक्षता लावल्या. तेव्हां अन्नत्याग सुरू झाला. सरकारनें ताठरपणा सोडला नाहीं. चार दिवस, आठ दिवस लोटले. देशांत खळबळ माजली. दिवसेंदिवस सत्याग्रही अशक्त होऊं लागले. महिना झाला तरी सरकार वाकेना. गांधीजींनीं प्रश्न हातांत घेतला. जयप्रकाश तर निर्धारानें उपास करीत होते.

त्यांचें शरीर दुबळें झालें तरी मन:शांति ढळली नाहीं, प्रसन्नता कमी झाली नाहीं.

तेहातिसाव्या दिवशीं जयप्रकाशांना कळविण्यांत आलें कीं तुम्ही अन्न ग्रहण करा, तुमच्या मागण्या मान्य करण्यांत आल्या आहेत. जयप्रकाश हसले. परतंत्र देशांत साधेसुधे अन्याय, मामुली दोष दूर करण्यासाठीं असलीं दिव्यें करावीं लागतात. दुराराध्यांचें हृदय-परिवर्तन करण्यासाठीं प्राण घेऊनच उभे राहावें लागतें. जयप्रकाशांचा उपास सुटल्यानंतर महिनाभरांतच देवळीची छावणी बंद करण्यांत आली. जयप्रकाशांनाहि बिहारच्या हजारीबाग तुरुंगांत पाठविण्यांत आलें.

हजारीबाग तुरुंग जंगल-विभागांत एका बाजूला आहे. रस्त्यानें जातांयेतां कोल्हे-लांडगे यांची सहज गांठ पडते, स्टेशनपासून पन्नास मैलांवर हा जेल आहे. आजुबाजूला डोंगरांच्या रांगा, आदिवासींची वस्ती, या आदिवासींचें रंगरूप, त्यांचे रीतरिवाज सगळे वेगळे. परका मनुष्य ताबडतोब उमटून पडायचा. जेलच्या चारी बाजूंनीं उंच उंच भिंती आहेत. मधून बुरूज आणि त्यावर खडा पहारा. सहसा ह्या जेलमधून पळायचा विचार कोणाच्या मनांत यायचा नाहीं अशी व्यवस्था. ह्या जेलमध्यें जयप्रकाशांना बंदिस्त केलें. दुःखांत सुख एवढेंच कीं त्यांचे परिचित मित्र तेथें होते.

जयप्रकाश हजारीबागला आले तेव्हां क्रिप्स साहेब अपेशी होऊन परत गेले होते. नेत्यांनीं जें सौजन्य दाखविलें त्याची कदर करण्याची बुद्धि ब्रिटिश सरकारनें दाखविली नाहीं. त्यांचा उर्मट ताठरपणा कायम होता. ह्यापेक्षां खालीं उतरणें म्हणजे देशाचा तेजोभंग करणें होतें. जपानहि पूर्व सीमेवर धडका मारूं लागला होता. ‘ इंग्रजांचें येथें राहणें हें जपानला प्रलोभन आहे ’ असें गांधीजींनीं लिहिलें.

गांधीजींचे सारे युक्तिवाद विफल झाले. सत्याग्रहाचें शस्त्र उचलल्यावांचून गत्यंतरच नव्हतें. परंतु आतां मोठ्या प्रमाणावर परिणामकारक उपाययोजना करण्याशिवाय गत्यंतर नव्हतें. गांधीजींनीं उघड बंडाची हांक दिली. जयप्रकाश तुरुंगांत तळमळत होते. राष्ट्रांत स्वातंत्र्याचा यज्ञ सुरू होणार आणि आपण तुरुंगांत बंदिस्त. ते अस्वस्थ झाले. रात्र रात्र त्यांना झोंप येईना. मनांत नाना कल्पना येत. या आणीबाणीच्या प्रसंगीं आपण जेलमध्यें कुचंबत राहणें अयोग्य आहे असें त्यांनीं ठरविलें.

ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यांत मुंबईला अ. भा. काँग्रेसचें अधिवेशन भरून सत्ता-त्यागाची मागणी करण्यांत येणार होती. त्यानंतर गांधीजी व्हाईसरॉयला भेटणार होते. व्हाईसरॉयच्या भेटींत कांहीं तोड न निघाल्यास उघड बंडाला आरंभ व्हायचा होता. ऑगस्टच्या तिसऱ्या आठवड्यांत लढ्याला तोंड लागेल अशी कल्पना असल्यानें त्या सुमारास हजारीबागच्या तुरुंगांतूनच पलायन करून जयप्रकाशांनीं क्रान्तीच्या सुरवातीपासून तिच्यांत दाखल व्हावें अशी योजना आखण्यांत आली. पण सरकारनें अकाल्पितपणें पहिला वार केला. सर्वत्र धरपकड झाली. गांधीजी व वर्किंग कमिटीचे इतर सभासद अटकेंत पडले. तुरुंगभरतीची ही चळवळ होऊं नये अशी गांधीजींची इच्छा होती. पण सरकारनें कार्यकर्त्यांना एकजात तुरुंगांत डांबलें. जे नेते सावध होते त्यांनीं भूमिगत जाऊन कामाला आरंभ केला. गांधीजींनीं ‘ करो या मरो ’ हा दिव्य संदेश दिला होता. हा संदेश अमलांत आणण्यासाठीं जयप्रकाश उतावीळ झाले होते.

जेलमधून राजबंद्यांना मोकळे करण्याची एक योजना आखण्यांत आली. परंतु जेल-अधिकाऱ्यांना योजनेचा सुगावा लागल्याचें लक्षांत आलें. ह्याच सुमारास भागलपूरच्या तुरुंगांत दंगल झाल्यानें सर्व

तुरुंगांवरचा पहारा कडक करण्यांत आला. त्यामुळें योजनेंत फेरफार करणें भाग पडलें ! जेल अधिकारी पुन्हा हळूहळू निर्धास्त झाले आणि जेलमधून पळून जाण्याचे विचार पुन्हा जयप्रकाशांच्या डोक्यांत कल्लोळ माजवूं लागले. 'करो या मरो' हा संदेश वायां जातां कामा नये हाच एक ध्यास त्यांना लागला.

पुन्हा योजनेवर अखेरचा हात फिरला. लक्ष्मी-पूजनाच्या मंगल दिवशीं जेलच्या भिंती ओलांडून जावयाचें ठरलें. जयप्रकाश भारी दुबळे झाले होते. देवळीच्या तुरुंगांतल्या उपवासामुळें जी अशक्तता आली त्यामुळें इतर रोगांनीं त्यांना जर्जर केलें, सायटिकामुळें त्यांना धड चालतां येत नव्हतें. डोळे खोल गेले, गाल बसले. त्यांत दाढी वाढविल्यानें त्यांच्या चेहऱ्यावर अधिकच अवकळा आली. परंतु त्यांचें मन सर्व प्रकारच्या साहसाला उत्सुक आहे. दिवाळीचा दिवस उजाडला. साऱ्या जेलभर उत्साहाचें वातावरण आहे. दिवाळी कशी साजरी करावयाची याच्या योजना आखण्यांत लोक मग्न आहेत. कोणकोणत्या खेळांचे सामने करावयाचें तें ठरलें. एका थाळींत बेचाळीस सालचें प्रतीक म्हणून बेचाळीस पणत्या लावून मिरवणूक काढण्याचें नक्की झालें. गाणें-बजावण्यांत रस असणारे त्या तयारीला लागले.

दुपारीं सुग्रास जेवण लोकांनीं झोडलें. संध्याकाळीं खेळांचे सामने झाले. अंधार पडूं लागतांच लोक मिरवणुकीच्या तयारीला लागले. जयप्रकाश आणि त्यांचे साथीदार समारंभांतून उठले. त्यांनीं आपल्या योजनेबरहुकूम काढता पाय घेतला. मिरवणूक निघाली. तें अभूतपूर्व दृश्य पाहण्यांत सर्व गढून गेले. ह्याच समयाला जयप्रकाश व त्यांचे साथीदार केवळ सहा मिनिटांत भिंती ओलांडून जेलच्या बाहेर गेले. इकडे मिरवणूक एकेका वॉर्डमध्यें जाऊं लागली. कोणाच्या डोक्यांत

शक्कल निघाली कीं जयप्रकाशांच्याकडे मिरवणूक न्यावी. पण कोणीतरी त्यांना सांगितलें कीं त्यांच्या वॉर्डांत एक सत्याग्रही एकाएकी भयंकर आजारी झाला आहे, तिकडे न गेलेलेंच बरें. मिरवणूक दुसरीकडे वळली. वॉर्डरांनीं गलथानपणें रात्रीं बराकींना कुलुपें ठोकलीं. जयप्रकाश व त्यांच्या मित्रांना दूर निघून जाण्याला अवधि मिळाला. दुसऱ्या दिवशीं सकाळीं जयप्रकाशांना भेटण्यासाठीं जेल अधिकारी आला. बरीच शोधाशोध करूनहि जयप्रकाशांचा पत्ता लागला नाहीं, तेव्हां तो चरकला. जयप्रकाश आणि त्यांच्या निवडक मित्रांनीं आपली सुटका करून घेतली होती.

◆◆ ◆◆ ◆◆

# करेंगे या मरेंगे

सामान्यतः आपल्या शब्दाला मनुष्य जी किंमत देतो त्यापेक्षां जास्त किंमत जगांत मिळत नाहीं. जयप्रकाशजींच्या कानांत 'करेंगे या मरेंगे' ही घोषणा सारखी दुमदुमत होती. त्या निर्धारानेंच त्यांनीं जेलच्या भिंती ओलांडल्या आणि जीवनसमर्पणासाठीं ते सिद्ध झाले. जेलच्या भिंती ओलांडणें त्या मानानें सोपें होतें, पण त्या आदिवासी प्रदेशांतून सहीसलामत सुरक्षित स्थळीं पोचणें कठीण होतें. त्यांतून जयप्रकाश फारच अशक्त झालेले. परंतु नाना वेष धारण करून त्यांनीं लढा चालविणाऱ्या मंडळींशीं संबंध प्रस्थापित केला. भूमिगत लोकांनीं एक मध्यवर्ती संग्राम समिती बनविली होती. देशांतील जनतेला ही समिती लढ्याबाबत मार्गदर्शन करीत होती.

सरकारचा पहिला वार जनतेनें मोठ्या हिंमतीनें परतवला होता. अनेक ठिकाणीं ब्रिटिश राजवट नामशेष झाली होती. परन्तु लढ्याचा तपशीलवार कार्यक्रम तयार करून जनतेला पोंचविलेला नसल्यानें ज्या भागांतून ब्रिटिश शासनाचा अंत झाला त्या भागांत पुढें काय, हा प्रश्न कार्यकर्त्यांना भेडावूं लागला. अनेक ठिकाणीं ब्रिटिशांची नष्ट झालेली सत्ता पुन्हा कब्जा करीत होती. क्रांतीची पहिली लाट ओसरूं लागली होती. सरकारच्या सुसज्ज संघटित हिंसेला तोंड देणें दुरापास्त होत होतें. जयप्रकाशांना लोकांमध्यें पसरलेल्या वैफल्यानें बेचैन केलें. जनतेच्या उत्स्फूर्त उठावांना पोलादी संघटनेची जोड नसल्यानें अंतीं सर्व उठाव अपेशी होत होते.

२४१८१ लि- चरित्र
५७२ नो: दि: १८-५-५४



देशाची स्वातंत्र्य-शक्ति दबल्याची खंत जयप्रकाशांना वाटली. त्यांनीं क्रांतीचें दुसरें पर्व सुरू करण्यासाठीं कंबर कसली. क्रांतीसाठीं उद्‌बोधन करणारीं पत्रकें त्यांनीं तयार केलीं. स्वातंत्र्य-सैनिकांसाठीं त्यांनीं लढ्याचा आढावा घेणारें परिपत्रक तयार केलें. पहिल्या फेरींत झालेल्या चुका आणि त्या दुरुस्त करण्याचे उपाय यांचें दिग्दर्शन त्या पत्रकांत केलें होतें. विद्यार्थी हे तर क्रांतीचे आधारस्तंभ. विद्यार्थ्यांनीं हतोत्साह न होतां क्रांतीच्या दुसऱ्या पर्वासाठीं सिद्ध व्हावें यासाठीं त्यांनाहि एक अनावृत पत्र त्यांनीं लिहिलें. हिंदुस्थानच्या भूमीवर अमेरिकन सेना आल्या होत्या. जपानला खडे चारण्यासाठीं इंग्रजांना मदत द्यावी म्हणून आलेल्या अमेरिकन सेनेमुळें अप्रत्यक्षपणें भारताच्या गुलामीच्या बेड्या बळकट होत होत्या. ह्या अमेरिकन सेनेच्या सदसद्विवेक-बुद्धीला कौल लावण्यासाठींहि एक खलिता त्यांनीं तयार केला. पांगलेल्या स्वातंत्र्य-सैनिकांची जमवाजमव ते करूं लागले. जयप्रकाश जेलमधून बाहेर पडल्यावर सरकारहि स्वस्थ बसलें नाहीं. जयप्रकाशांना फरारी ठरवून त्यांना पकडून देणाराला दहा हजारांचें इनाम द्यायचें सरकारनें घोषणा केली. पोलिस खातें डोळ्यांत तेल घालून त्यांचा मागोवा घेऊं लागलें. विद्यार्थी, कामगार आणि किसान यांना क्रांति-कार्यासाठीं संघटित करण्याचेहि उघड प्रयत्न वेगवेगळ्या रूपांनीं सुरू झाले. वेगवेगळीं रूपें घेऊन जयप्रकाशांनीं देशभर प्रवास केला आणि परिस्थितीचा अंदाज घेतला. अमेरिकेचे अध्यक्ष रुझवेल्ट यांनीं भारतांतील परिस्थिति प्रत्यक्ष पाहण्यासाठीं आपला व्यक्तिगत प्रतिनिधि म्हणून फिलिप्स यांना पाठविलें. गांधीजींना भेटण्याची त्यांची इच्छा साम्राज्य सरकारनें उद्दामपणें अव्हेरली. परंतु जयप्रकाशांनीं त्यांची भेट घेऊन त्यांना सर्व घडामोडींची ताजी माहिती विदित केली.

गांव हा घटक मानून पुन्हा एकदां स्वातंत्र्यासाठीं निकराचा प्रयत्न करायचें ठरलें. गांवांतील परकी सत्ता जनतेच्या उत्स्फूर्त उठावानें नामशेष झाल्यानंतर त्या ठिकाणीं प्रति-सरकार स्थापलें जाणें आवश्यक होतें. प्रति-सरकारांचीं गांवावरील पकड कायम ठेवायची तर सरकारी पोलिसांना तोंड देतां येईल असें सैनिकी शिक्षण त्यांना मिळालें पाहिजे. सैनिकी शिक्षण द्यायचें तर शस्त्रास्त्रें पुरेशीं मिळालीं पाहिजेत आणि शिक्षण देण्याइतपत मोकळीकहि मिळाली पाहिजे. जयप्रकाशांनीं 'आझाद दस्ते' तयार करण्याला सुरुवात केली. या दस्त्यांचा प्राथमिक कार्यक्रम सरकारी यंत्राला अडथळा करणें हा होता. त्यासाठीं विध्वंसन करण्याचीं साधनें पुरविण्याची योजना झाली, परन्तु विध्वंसन हा कांहीं अखेरचा कार्यक्रम नव्हता. राजसत्तेची पकड खिळखिळी करणें एवढाच त्यामागचा उद्देश होता. परन्तु मूठभर लोकांच्या उठावानें सत्ता हस्तगत होण्याचा संभव नव्हता. जनक्रांतीची त्यासाठीं गरज होती. सरकारी राज्ययंत्राच्या विध्वंसनाच्या कार्यक्रमांतून जनता संघटित करणें शक्य वाटत होतें. आझाद दस्त्यांचा नंतरचा कार्यक्रम स्वतंत्र झालेल्या ग्रामराज्यांचें रक्षण हा होता. भारतीय सेना हाच ब्रिटिशांचा खरा आधार होता. पोलिस आणि सेना यांना जर वळवितां आलें तर क्रांतीचें काम सुकर होणार होतें. पोलिस आणि फौज यांच्याशीं संपर्क जोडण्याचा जयप्रकाशांनीं प्रयत्न केला. गनिमी सेना उभारण्याचाहि त्यांचा विचार होता. १९३० च्या लढ्याच्या वेळीं गढवाल पलटणीनें दाखविलेली तेजस्विता पुन्हा सैनिकांना दाखवावी अशी जयप्रकाशांची अपेक्षा होती.

मोकळेपणानें क्रांतीच्या दुसऱ्या पर्वाची तयारी करतां यावी यासाठीं नेपाळचा आश्रय घेण्याचें ठरलें. जयप्रकाश आणि इतर क्रांतिकारक नाना वेषांनीं नेपाळांत शिरले. नेपाळांतच शिक्षणकेंद्र चालविण्याचें ठरलें. कोसी नदीच्या कांठीं कडेकपारींत केंद्राची जागा मुक्रर झाली.

साधनांची जमवाजमव झाली. स्वतंत्र भारताचें रेडिओ स्टेशन उभारण्याची तयारी झाली. आघाडीच्या पसतीस लोकांचा शिक्षणक्रम सुरू झाला. ह्या लोकांनीं शिक्षण पूर्ण करून आपापल्या विभागांत जाऊन आपले सैनिक जमवावें असें ठरलें होतें. जयप्रकाशांना नेपाळांत दाखल होऊन दोन एक महिने झाले असतील नसतील तोंच हिंदुस्थान सरकारला जयप्रकाश नेपाळांत घुसल्याची बातमी लागली. त्यांनीं जयप्रकाशांचा तपास करण्याचा लकडा नेपाळ सरकारच्या मागें लावला. क्रांतिकारकांच्या गुप्त हेरखात्यानें बातमी आणली कीं, नेपाळी सरकारहि जयप्रकाशांच्या शोधांत आहे. छावणी हलविण्याचें ठरलें; परन्तु हिंदुस्थानशीं संबंध तुटल्यानें पैशांचा तुटवडा पडूं लागला. नव्या छावणीसाठीं पैशांची जमवाजमव होत असतांनाच नेपाळी पोलिसांनीं छापा घालून या मंडळींना अटक केली. सर्वांनीं खाशी बतावणी केली. परंतु अटक झालेल्या मंडळींना तिथल्या तिथें सोडायला खालचे अधिकारी तयार नव्हते. वरिष्ठ अधिकाऱ्यांपुढें त्यांना उभें करायचें ठरलें. संधि साधून जयप्रकाशांनीं आझाद दस्त्यांना निरोप पाठविला कीं जर आम्हांला ब्रिटिश हद्दींत नेपाळी सरकार नेऊं लागलें तर वाटेल तें करून आमची सुटका करा.

परंतु ब्रिटिश हद्दींत जयप्रकाशांना नेईपर्यंत आणखी काय घटना होतील या कल्पनेनें आझाद दस्त्यांच्या छावणींतले लोक व्याकुळ झाले. जयप्रकाशांच्या रूपानें स्वातंत्र्याच्या चळवळीचा प्राण संकटांत आहे अशी त्यांची भावना होती. त्यांना दम धरवेना. जयप्रकाशांना हनुमान नगरला नेलें होतें. आझाद दस्त्यांच्या छावणींतले सर्व सैनिक सज्ज झाले आणि त्यांनीं हनुमाननगरकडे कूच केलें! मध्यरात्रीला त्यांनीं पोलीस कोठडीवर हल्ला केला. गोळागोळी झाली. आझाद दस्त्यांचा जय झाला. जयप्रकाश व त्यांचे सर्व मित्र मुक्त झाले. प्राणावरच्या एका संकटांतून बचावले. पुन्हा पळापळ सुरू

झाली. कोसीच्या कांठाकांठानें सर्व पुढें जात आहेत. पोलिसांचे डोळे चुकवून जयप्रकाशांनीं कलकत्ता गांठलें. बंगाल दुष्काळानें संत्रस्त झाला होता. जयप्रकाशांना बंगालची ही दशा पाहून अत्यंत वेदना झाल्या. स्वातंत्र्यासाठीं जेथले तरुण तळहातीं शिर घेऊन लढले त्याच बंगाल्यांत हजारों लोक कुत्र्याच्या मौतीनें मरत होते. जयप्रकाश अत्यंत विव्हळ झाले.

नेपाळांतून हातोहात जयप्रकाश निसटल्यानें सरकार अधिकच बावरलें. सर्वत्र जारीनें तपास सुरू झाला. जयप्रकाशांना स्वस्थपणें एका ठिकाणीं थांबणें मुश्कील झालें. कुठें तरी आड रानांत कातडी बचावीत राहणें हा त्यांचा उद्देश नव्हता. क्रांतीच्या दुसऱ्या पर्वासाठीं त्यांना देशांत संघटना उभारावयाची होती. त्यामुळें सरकारचा डोळा चुकवीत संचार करणें त्यांना भागच होतें. त्यांनीं वायव्य सरहद्द प्रांताकडे मोर्चा वळविला. तेथल्या शूर स्वातंत्र्यवादी पठाणांशीं हितगुज करण्याची त्यांची इच्छा होती. पण सरकार क्रांतिकारकांचा पाठलाग करीत होतें.

अमृतसर स्टेशनवर जयप्रकाश चहा घेत होते. इतक्यांत त्यांना चारी बाजूंनीं वेगवेगळ्या पोषाखांतले पोलीस घेरतात. जयप्रकाश आपण मुंबईचे व्यापारी असून रावळपिंडीला जात असल्याचें आर्जवून सांगतात. पण सरकारी अधिकाऱ्याला हा व्यापारी जयप्रकाशच असल्याची बालंबाल खात्री आहे. जयप्रकाशांच्या विनवण्यांचा कांहींहि उपयोग होत नाहीं. त्यांना पुढच्या स्टेशनवर उतरवून घेतात आणि लाहोराच्या किल्ल्याकडे मोटारींतून रवाना करतात. दहा महिने करेंगे या मरेंगे या बाण्यानें जयप्रकाशांनीं भूमिगत राहून अर्धवट कार्य केलें होतें. क्रांतिकारकांचे हालहाल करण्यासाठीं लाहोर किल्ल्यांत नाना योजना तयार होत्या. जयप्रकाशांना अटक झाल्याची

बातमी बाहेर फुटूं नये यासाठीं सरकारची धडपड चालू होती. परंतु देशभर ती बातमी पसरली. जयप्रकाशांचा पोलिसांनीं भयंकर छळ चालविल्याच्या बातम्या देशभर पसरल्या. लोक चिंताग्रस्त झाले. मुंबईचे बॅ. पारडीवाला लाहोरला गेले आणि जयप्रकाशांच्या वतीनें त्यांनीं हेबियस कॉर्पस अर्ज दाखल केला. अर्जाची सुनावणी होण्या-पूर्वींच त्यांना अटक करण्यांत आली. जयप्रकाशांच्या वतीनें कोणी ना कोणी असा अर्ज करील या धास्तीनें सरकारनें जयप्रकाशांना १८१८ च्या कायद्याखालीं स्टेट प्रिझनर केलें.

जयप्रकाशांच्या अटकेमुळें देशभर वादळ झालें. त्यांच्याबद्दल सर्व जनता चिंताग्रस्त झाली. जयप्रकाशांना लाहोर जेलमध्यें नाना यातना भोगाव्या लागत असल्याच्या बातम्यांनीं लोक हवालदिल झाले. लोक-मताचें दडपण सरकारवर येऊं लागलें. शेवटीं जयप्रकाशांना लाहोरहून आग्र्याला आणण्यांत आलें.

हें सगळें घडत होतें तोंवर जपानचा पराभव होऊन दोस्त राष्ट्रें विजयी झालीं. इंग्लंडमध्यें मजूर सरकार सत्ताधारी बनलें. हिंदुस्थानला स्वातंत्र्य देण्यासाठीं वाटाघाटी सुरू झाल्या. वाटाघाटीनें मिळणाऱ्या स्वातंत्र्याबाबत जयप्रकाशांना उत्सुकता नव्हती. जनतेच्या बलिष्ठ लढ्यांतून मिळालेलें स्वातंत्र्य त्यांना अधिक प्रिय होतें.

◆◆ ◆◆ ◆◆

# गांधीजी आणि जयप्रकाश

गांधीजी हिंदुस्थानांत आले ते सत्याग्रहाचें एक नवें शस्त्र आणि शास्त्र शोधून. हिंदुस्थानांत हें शस्त्र प्रथम बिहारमध्यें अजमावण्यांत आलें. चंपारण्यांतील युरोपीयन मळेवाले निळेची लागवड करणाऱ्यांवर सतत अनन्वित अत्याचार करीत आले होते. त्यांच्या अत्याचारांविरुद्ध 'ब्र' काढायची सुद्धां कोणाची प्राज्ञा नव्हती. ब्रजकिशोर बाबूंनीं या अन्यायाकडे गांधीजींचें आणि काँग्रेसचें लक्ष वेधून घेतलें. गांधीजी बिहारमध्यें आले. मुर्दाड बनलेल्या जनतेंत त्यांनीं नवतेजाचा संचार करविला. मातींतून लढवय्ये निर्माण केले. त्यांच्या ह्या पहिल्याच दर्शनानें बिहारचा तरुण वर्ग गांधीजींकडे आकर्षिला गेला. जयप्रकाश त्या वेळीं शाळा शिकत होते. त्यांनाहि या नव्या फकिरीचें आकर्षण वाटलें. पुढें ब्रजकिशोर बाबूंच्या कन्येशीं-प्रभावती देवींशीं-त्यांचा विवाह झाला. ब्रजबाबूंशीं गांधीजींचा फार निकट परिचय त्यामुळें जयप्रकाश गांधी-परिवारांत सहजच मिसळले. वीसच्या सत्याग्रहांत त्यांनीं गांधीजींच्या आदेशाप्रमाणें ब्रिटिशांनीं येथें चालविलेल्या शिक्षणपद्धतीशीं असहकार केला. गांधीजींनीं परकी सरकारला दिलेलें 'सैतानी' हें संबोधन त्यांना अन्वर्थक वाटलें. सरकारी कॉलेजला रामराम ठोकल्यावर ते साबरमतीच्या गांधीजींच्या आश्रमांत जायला निघाले होते. पण बिहार विद्यापीठाच्या स्थापनेमुळें त्यांना तेथेंच राहावें लागलें. प्रभावती देवींच्या हातीं प्रथम त्यांनींच चरखा दिला.

परंतु चौरीचुऱ्याचें निमित्त करून गांधींनीं चळवळ मागें घेतल्यानें जयप्रकाश नाराज झाले. असहकार करून बाहेर पडलेल्या तरुणांना दुसरा लढाऊ कार्यक्रम गांधींनीं दिला नाहीं हाहि त्यांचा राग होता. तरुणांची शक्ति नीट संघटित करून जोपासण्याकडे गांधींनीं दुर्लक्ष केलें. तरुणांच्या एकंदर वृत्ति लक्षांत घेतां गांधींचा चरखा–खादीचा कार्यक्रम त्यांना रुचण्यासारखा नव्हता. परंतु स्त्रियांच्या बाबतींतला गांधींचा उदार दृष्टिकोन व राष्ट्रीय संग्रामांत त्यांना सामील करून घेण्याचें धोरण जयप्रकाशांना फार आवडलें. चंपारण्याच्या सत्याग्रहांत गांधींनीं कस्तुरबांनाहि आणलें होतें. बिहारमधील स्त्रिया जवळ जवळ दास्यांतच खिदपतात. त्यांना सामाजिक जीवन असें नसतेंच. गांधींच्या आश्रमांत त्यांनीं अमेरिकेला जातांना याचसाठीं आपल्या पत्नीला पाठविलें.

अमेरिकेंतून जयप्रकाश आले ते मार्क्सच्या संप्रदायाचा टिळा लावूनच आले. मार्क्सनें समाजघटनेचें केलेलें विवेचन हेंच तेवढें वैज्ञानिक अतएव सत्य अशीं त्यांची निष्ठा होती. विज्ञानाचें सिद्धान्त जसे स्थळ-काळ-निरपेक्ष लागू पडतात, त्याचप्रमाणें मार्क्सच्या वैज्ञानिक भौतिकवादाचें सिद्धान्त तंतोतंत लागू पडतात अशी त्यांची खात्री होती. मार्क्सची भविष्यवाणी खरी ठरण्याबद्दलहि त्यांची खात्री पटली होती. मार्क्सवादी दृष्टिकोणांतून असहकारादि चळवळींचें केलेलें विवेचन त्यांच्या डोक्यांत पक्कें शिरलें होतें. मार्क्सपासून फक्त मार्क्सवादीच शिकूं शकतील, मार्क्सवादाचा दुसऱ्या कोठल्याहि विचाराशीं समन्वय होणें शक्य नाहीं एवढेंच नव्हे तर प्रत्येक धर्मसांप्रदायांतील कडवे अनुयायी ज्याप्रमाणें आपल्या धर्मसंस्थापकाला अखेरचा व परम विकासित प्रेषित मानतात, त्याप्रमाणेंच मार्क्सबद्दलची जयप्रकाशांची कल्पना होती. गांधीजींची सतत विकसनशील वृत्ति त्यांच्या अनुभवाला आली नव्हती. परिस्थितिवादाच्या अंध उपासकांना

वेगळ्या परिस्थितींत मनाची वेगळी घडण होऊं शकते याचीहि जाणीव नव्हती. त्यामुळें त्यांची वृत्ति कडवी बनली होती. वाल्मीकीनें आधीं रामायण लिहिलें आणि मग रामाचें चरित्र तसें घडले अशी आपल्याकडे आख्यायिका आहे. त्याप्रमाणें मार्क्सच्या पुस्तकाचीं पानें उघडून त्याप्रमाणें वागलें कीं तो म्हणतो त्याप्रमाणें आधीं कामगार वर्गाची हुकूमशाही निर्माण होऊन नंतर लोण्याच्या गोळ्याप्रमाणें शासनसंस्था आपोआप वितळून जाईल अशी त्यांची श्रद्धा होती.

अशा मनोभूमिकेंत ते अमेरिकेंतून भारतांत परतले. इथें आल्यावर गांधीजींच्याकडे ते गेले. गांधींनीं त्यांच्याशीं विचारभेद असून जें सौजन्य, प्रेम, स्नेह त्यांना दाखविला त्यामुळें जयप्रकाशांना वेगळाच अनुभव आला. जवाहरलाल नेहरूंशीं गांधींनींच त्यांचा परिचय करून दिला, एवढेंच नव्हे तर त्यांची चांगली प्रशस्तीहि केली. स्वातंत्र्याच्या चळवळींत असा उमदा तरुण आपल्या जोडीला असावा असें त्यांना वाटत होतें. परंतु जयप्रकाशांच्या डोळ्यावरचा मार्क्सवादी चष्मा अजून निघाला नव्हता. समाजवादाचे ते भक्त होते. भारतीय जनतेला समाजवादाची महति शिकविण्याची त्यांना तळमळ होती. काँग्रेसचा उपयोग करून समाजवादाची शिकवण जनतेला देतां येईल असें त्यांना वाटत होतें म्हणून ते काँग्रेसमध्यें आले होते. काँग्रेसच्या मजूर-विभागाचें काम सांभाळत होते. गांधीजींची विचारपद्धति त्यांना पटत नव्हती. गांधीजींचे ते कडवे विरोधक होते. त्यांच्यावर कडवा हल्ला ते चढवीत होते. 'समाजवादच कां?' या आपल्या पुस्तकांत त्यांनीं लिहिलें,—"वर्गयुद्ध हें मूर्खपणाचें आहे असें गांधींचें म्हणणें आहे. भांडवल आणि मजुरी परस्परपूरक असते त्यामुळें समाजांतील वर्गांचा समन्वय हितकर आहे. नफा, मजुरी आणि किंमत यांचें विचारपूर्वक नियंत्रण केलें कीं झालें, अशी त्यांची विचारसरणी आहे. पण या गोष्टी कांहीं नव्या नाहींत. गांधीजींचा तसा दावा असला

तरी त्या पूर्वींच पाश्चात्य विद्वानांनीं सांगून ठेवल्या आहेत. गांधीजींना भांडवलदारांचें हृदयपरिवर्तन हवें आहे. वेल्स प्रभृति लोकहि तेंच सांगतात. गांधींचा ट्रस्टीशिपचा सिद्धान्तहि कांहीं नवा नाहीं. दीडशें वर्षांपूर्वींच गॉडविननें त्याचा निर्देश करून ठेवला आहे.

" गांधीजीचे विचार हे सुधारणावादी आहेत. सुधारणावाद हा प्रचलित समाजव्यवस्था कायम ठेवूं पाहतो. जिथें घर्षण असेल तिथें थोडें तेल लावण्यापलीकडे त्याची मजल जात नाहीं. क्रांतीची त्याला भीति वाटते. यासाठीं परस्परावलंबी हिताचें प्रतिपादन तो करतो. गांधीजी तरी ट्रस्टीशिपच्या नांवाखालीं भांडवलदार जमीन-दारांना काय सांगतात? ते म्हणतात: तुम्ही आपल्या नोकरांशीं नीट वागा. त्यांची स्थिति सुधारा. मग झगडे, द्वेषमत्सर, वर्गयुद्ध कांहीं राहणार नाहीं. सुधारणावाद समाजांत न्यायाची प्रस्थापना करण्यापेक्षां शांतता राखण्याला अधिक महत्त्व देतो.

" समाजवादी पक्षाची स्थापना झाली तेव्हां अवधच्या जमीन-दारांनीं आपली नाराजी जाहीर केली. तेव्हां त्यांना धीर देण्यासाठीं गांधी म्हणाले : मी ज्या रामराज्याचें स्वप्न रंगवतों त्यांत राजे आणि भिकारी या दोहोंचे हक्क सुरक्षित राहतील. गांधीजींच्या तत्त्वज्ञानांत राजे कायम राहतात आणि भिकारीहि नाहींसे होत नाहींत. जर समाजांत भिकारी नसले तर हे आध्यात्मिक नीतिनिपुण लोक आपलें औदार्य कसें मिरवूं शकतील? परंतु समाजांत भिकारी असावेच कां, याचें उत्तर गांधीजींच्याजवळ नाहीं. या उलट समाजांतील विषमतेच्या बुडाशीं असलेल्या कारणांचा छडा समाजवाद लावतो. शोषणाच्या संपूर्ण प्रक्रियेचें त्यांत विश्लेषण केलेलें आहे. समाजवाद शोषणाच्या मुळावरच घाव घालतो. गांधीवाद समाजांतील शोषण-प्रवृत्तीच्या मूलभूत कारणांचें संशोधन करण्याची तसदी घेत नाहीं. श्रमशक्ती-

तूनच सर्व उत्पादन होतें याची त्याला दखल नाहीं. ट्रस्टी बना आणि श्रमिकाच्या हिताला जपा, हें सांगण्यांत त्याला कृतार्थता वाटते.

"हें तत्त्वज्ञान म्हणजे निर्धनांचा विश्वासघात आहे. श्रीमंतांची श्रीमंती हीहि चोरीच आहे आणि तीहि शासनार्ह ठरली पाहिजे. हे श्रीमंत लोक गरिबांच्या लुटीचा माल हिंसेच्या जोरावर आपल्या-पाशीं ठेवतात. गांधीजी अस्तेयाचे उपासक पण या परिग्रहाला त्यांचा विरोध नाहीं. धनिकांनीं जी संपत्ति निर्माण केली नाहीं तिचे ट्रस्टी बनण्याचा त्यांना काय अधिकार ? धन आणि उत्पादन यांचें वैज्ञानिक विश्लेषण केलें पाहिजे. आणि हा ट्रस्टी सिद्धान्त व्यवहारांत तरी कसा आणणार ? त्यांना कसें बदलवणार ? सगळ्या धर्मसंस्थापकांनीं हाच उपदेश केला, पण त्यांना हें करतां आलें नाहीं अशी इतिहास ग्वाही देत आहे. अहमदाबादच्या मिलमालकांचें तरी हृदय-परिवर्तन कुठें झालें ? गांधीजींशीं केलेले करारहि तर त्यांनीं मोडले ! "

जयप्रकाशांचा गांधी-विचारावरचा हा हल्ला मोठा प्रखर होता. परंतु पठडीबाजींतून तो निघाला होता. अपरिचयामुळें जो दुरावा निर्माण झालेला असतो त्यामुळें असे गैरसमज होतात. पण ह्या त्यांच्या विवेचनांतून दलितपीडितांविषयीं त्यांची कळकळ, तळमळ व्यक्त होत होती. गांधींना ही तळमळ मोलाची वाटली. अपरिचया-मुळें, अज्ञानामुळें झालेले गैरसमज दूर होतील अशी त्यांची खात्री होती. जयप्रकाशांचा निःस्पृह बाणा त्यांना आवडला. जयप्रकाशांना त्यानीं उत्तर दिलें नाहीं. उलट त्यांच्यावर अधिक वात्सल्य त्यांनीं दाखविलें. ते म्हणत "जयप्रकाश हे समाजवादाचे आचार्य आहेत. समाजवादाबद्दल एखादी गोष्ट त्यांना ठाऊक नसेल तर हिंदुस्थानां-तील दुसऱ्या कोणालाहि ती माहीत असण्याचा सुतराम् संभव नाहीं...."



आदर्श दांपत्य



अमेरिकेतील विद्यार्थी

तीस सालीं जयप्रकाश आर्थिक अडचणींत सांपडले. आई निवर्तली, वडील अर्धांगवायूनें आजारी पडले. जयप्रकाशांनीं गांधींना आपली अडचण निवेदन केली. जयप्रकाशांना कोठेंतरी काम मिळवून द्यावें अशी गांधीजींनीं बिर्लांना चिठ्ठी दिली. लढ्याच्या वातावरणामुळें शिक्षण-संस्थेंत काम करणें जयप्रकाशांना शक्य नव्हतें; पण बिर्लांनीं आपले सेक्रेटरी म्हणून त्यांना ठेवून घेतलें. जयप्रकाशांना भांडवलशाहीचें अंतरंग कळून आलें. पुढें १९३४ सालीं नाशिकच्या तुरुंगांत कॉंग्रेस समाजवादी पक्षाची स्थापना झाली. समाजवादी पक्षालाहि ही गोष्ट मंजूर होती कीं निकटवर्ती प्रश्न स्वातंत्र्याचा आहे आणि त्यासाठीं संयुक्तपणें लढा देणारी राष्ट्रीय आघाडी पाहिजे. जातिधर्म प्रांतनिरपेक्ष लोकशाही आणि स्वातंत्र्य यासाठीं गांधीजींच्या नेतृत्वाचा उपयोग होईल ही गोष्ट समाजवादी पक्षाला मान्य होती. उलट त्यांना असें दिसून आलें कीं आपल्या गुलामीच्या बेड्या तोडण्यासाठीं सारें राष्ट्र उभें राहिलें त्या वेळीं मार्क्सवादाचा वेळींअवेळीं जयघोष करणारे कम्युनिस्ट त्यापासून अलिप्त राहिले. गांधीजींमध्यें जी विकासक्षमता, उदारता व सर्वसमावेशक वृत्ति होती तिचा तथाकथित मार्क्सवाद्यांत त्यांना अभाव दिसला. याउलट 'स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीं हे समाजवादी विचार मांडून फाटाफूट कशाला ?' असा सवाल निर्माण झाला तेव्हां गांधीजींचे खासगी चिटणीस महादेवभाई यांनीं हरिजनमध्यें लिहिलें. स्वातंत्र्यानंतर कशा पद्धतीची राजवट येथें निर्माण व्हावयाची यासंबंधीं वेगवेगळे विचार लोकांपुढें आले पाहिजेत म्हणजे ऐनवेळीं गोंधळ उडणार नाहीं.

बत्तीसचा लढा संपल्यानंतर चौतीस सालीं कॉंग्रेसनें विधिमंडळांच्या निवडणुकी लढवायचें ठरविलें. जयप्रकाश नरेंद्रदेव प्रभृतींचा कडवा विरोध होता. गांधीजींना विधिमंडळवादी व लढाऊ दोन्ही लोकांना एकत्र राखायचें होतें. उभयतांना संधि मिळावी व राष्ट्रीय

स्वातंत्र्याची एक संयुक्त आघाडी कायम राहावी असें त्यांचें मत होतें. विधिमंडळ प्रवेशाचा ठराव त्यांनीं मांडला; परंतु त्यावर व्याख्यान देतांना सांगितलें, सर्वांनीं याच कामाला लागूं नये. उत्तम माणसें संघटनेच्या कामासाठीं बाहेर पाहिजेत. जर सगळे विधिमंडळाच्या मागें लागतील तर आत्मघात करण्यासारखें होईल. प्रांतिक विधिमंडळाच्या निवडणुका झाल्या, पण प्रथम श्रेणीचे सर्व नेते अलिप्त राहिले. त्यामुळें काँग्रेस म्हणजे सरकारचा एक पूरक भाग अशी स्थिति झाली नाहीं. देशाला संघटित व बलवान् करण्याच्या कामासाठीं प्रभावी नेते सरकार-बाहेरच होते त्यामुळें विधिमंडळाचें राजकारण दुय्यम दर्जाचेंच ठरलें. ह्या नव विचाराच्या तरुणांना योग्य वाव काँग्रेसमध्यें असावा असा सल्ला गांधींनीं दिला. वर्किंग कमिटीवर जयप्रकाश, नरेंद्रदेव व अच्युत-राव या समाजवादी पक्षाच्या लोकांना जागा मिळाल्या. पं. नेहरू व सुभाषबाबू हे दोघेहि समाजवादी विचाराचेंच होते.

१९३९ च्या त्रिपुरी काँग्रेसच्या राष्ट्रीय मागण्यांचा ठराव जयप्रकाशांनींच मांडला. देशांतील दुःखदारिद्र्य स्वातंत्र्याशिवाय जाऊं शकणार नाहीं. जनतेच्या सुप्त शक्तींना स्वातंत्र्याखेरीज बहर येणार नाहीं. जगांतील लोकशाही व स्वातंत्र्यवादी पुरोगामी शक्तींचें बल हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यामुळें वाढेल असें सांगून स्वातंत्र्याची मागणी करणारा तो ठराव होता. गांधीजींच्या नेतृत्वाशिवाय देशव्यापी आणि प्रभावी लढा होऊं शकणार नाहीं अशी जयप्रकाशांची खात्री झाली होती. हिंदुस्थानांतील प्रत्यक्ष परिस्थिति पाहिल्यामुळें गांधीजींचा सर्वस्पर्शी प्रभाव त्यांच्या प्रत्ययास आला. गांधीवाद्यांच्या कर्मकांडाला त्यांचा विरोध असला तरी स्वातंत्र्य-लढ्याच्या बाबतींत गांधीजींना मनोभावें साहाय्य केलें पाहिजे असें त्यांनीं आपल्या अनुयायांना बजावलें. समाजवाद्यांनीं कातण्यावर गांधींनीं जो भर दिला त्याला विरोध केला होता. गांधींनीं लिहिलें: "समाजवाद्यांच्या निर्भीडपणाचें

मी कौतुक करतों, पण जर लढा झाला तर तो शिस्तपूर्ण व अहिंसक झाला पाहिजे. मला मतपरिवर्तन होईपर्यंत विचारविनिमय करीत राहिलें पाहिजे किंवा माझा पराभव कबूल केला पाहिजे. मित्रांना, विरोधकांना एवढेंच नव्हे तर सर्व जगाला परस्परांतील अहिंसेच्या साहाय्यानें परस्परांत आर्थिक, सामाजिक, राजकीय व धार्मिक संबंध नियंत्रित करतां येतात हें पटवून देणें हें माझें जीवितकार्य आहे. जयप्रकाश प्रभृतींबद्दल तर मला फार आदर आहे. माझे सहकारी जर मी त्यांना बनवूं शकलों तर तो माझा मोठा गौरव होईल.''

युद्ध सुरू होतांच जनतेचा लढा उभारण्याची हाकाटी कम्युनिस्टादींनीं सुरू केली. गांधींचें नेतृत्व डावलून नवें नेतृत्व निर्माण करण्याच्या आकांक्षा ते मनांत बाळगून होते. गांधीजींना बदनाम करण्यासाठीं त्यांच्यांत अहमहमिका होती. गांधीजी भांडवलदारांचे हस्तक आहेत असा प्रचार त्यांनीं करून पाहिला होता, पण तो यशस्वी झाला नाहीं. युद्ध सुरू होतांच गांधींनीं इंग्रजांशीं समझौता केल्याची ओरड त्यांनीं सुरू केली. कम्युनिस्टांचा हा कावेबाजपणा जयप्रकाशांच्या ध्यानीं आला. गांधीजींशीं त्यांचेहि मतभेद होते; पण गांधीजींच्या इमानदारीबद्दल त्यांना यत्किंचितहि संशय नव्हता. त्यांनीं त्या वेळीं लिहिलें: '' महात्मा गांधींना जनतेची भीति वाटते, ते हिंदी भांडवलदारांचे दलाल आहेत. आणि त्यांच्या वतीनें ब्रिटिश सरकारशीं त्यांनीं सौदा केला आहे असें म्हणणाऱ्या डावऱ्यांपैकीं मी नाहीं. इतर कोणत्याहि स्वातंत्र्यवादी माणसापेक्षां गांधीजींमध्यें तसूभरहि स्वातंत्र्यभक्ति कमी नाहीं अशी माझी खात्री आहे. गांधीजींना स्वातंत्र्य हवें आहे तें मूठभर धनिकांसाठीं नव्हे तर देशांतील करोडो दीनदलितांसाठींच हवें आहे. दिल्लींत मी त्यांना भेटलें तेव्हां ते म्हणाले: जयप्रकाश, त्या लोकांना सांगा कीं गांधींनीं इतर वाटेल तें केलें तरी ते आपल्या देशाच्या बाबतींत

कधींहि सौदा करणार नाहींत. गांधीजींच्या नियतीबद्दल संशय घेणें घोर चूक आहे. गांधीजी आज जगांतील एक अत्यंत थोर विभूति असल्यानें त्यांच्यावर केवळ पसतीस कोटींचीच जबाबदारी आहे असें नाहीं, तर साऱ्या जगाचें भवितव्य त्यांच्या हातीं आहे. इतिहास त्यांच्या प्रत्येक कृत्याची कठोर परीक्षा केल्यावांचून राहणार नाहीं." कम्युनिस्ट, रॉयिस्ट आणि सोशालिस्ट गांधीजींच्या सिद्धान्तावर व साधनांवर कबरे हल्ले चढवीत आणि आपल्या स्वतःच्या उद्दिष्ट आणि कार्यक्रमाची शेखी मिरवीत असत. परंतु ऐनवेळीं गांधींच्या तोडीची चळवळ उभी करण्याची शक्ति यांपैकीं एकांतहि नाहीं हें जयप्रकाशांना ठाऊक होतें. गांधींनीं चळवळ सुरू केल्यावर त्यांच्यामागे जाण्याशिवाय गत्यंतर राहात नसे. वावटळ आली कीं वाळलेलीं पानें जशीं उडतात त्याप्रमाणें इतर सगळे त्या वावटळींत सांपडत.

पुढें जमशेटपूरच्या एका भाषणाबद्दल सरकारनें जयप्रकाशांना अटक केली. जयप्रकाशांनीं त्या वेळीं जी जबानी दिली तिची गांधीजींनीं शिफारस करून लिहिलें : " जयप्रकाशांच्या निवेदनांत व्यक्त झालेली भावना आज प्रत्येक हिंदी माणसाच्या मनांत आहे. अशा वेळीं जयप्रकाशांना सजा फर्मावण्याऐवजीं सरकारनें आपल्याच वागणुकीचा फेरविचार करावा. " जयप्रकाश आणि लोहिया यांच्यासारखे खंदे वीर तुरुंगांत डांबले जात असतांना मी स्वस्थ बसूं शकत नाहीं असेंहि गांधीजींनीं त्या वेळीं लिहिलें होतें. याच सुमारास रामगडला काँग्रेस भरली. रामगडच्या काँग्रेसमध्यें मांडण्यासाठीं तुरुंगांतून जयप्रकाशांनीं एक ठराव पाठविला होता. स्वातंत्र्यानंतर समाजवादी समाजरचना देशांत स्थापन करण्याचें आश्वासन काँग्रेसनें द्यावें अशी जयप्रकाशांची सूचना होती. जनतेला असें आश्वासन दिलें तर लोकांमध्यें स्वातंत्र्य-युद्धाबाबत अधिक उत्साहाचा संचार होईल असें त्यांना वाटत होतें. पण अशा प्रकारचें आश्वासन द्यायला काँग्रेस-

मधील राष्ट्रवादी गटाचे नेते तयार नव्हते. जयप्रकाशांचा ठराव त्यामुळें मान्य झाला नाहीं. गांधीजींना जयप्रकाशांचा तो ठराव आवडला. आधीं स्वातंत्र्यासाठीं चळवळ व्हावी व नंतर समाजवादी लोकशाहींत तिचें रूपांतर व्हावें असें गांधीजींना वाटत होतें. त्यांनीं जयप्रकाशांचा ठराव ' हरिजन ' साप्ताहिकांत प्रकाशित केला व त्यावर टिपणी लिहिली : " जयप्रकाशांच्या समाजवादी विचारसरणीशीं मी सहमत आहें. स्वातंत्र्योत्तर काळांतील निकटवर्ती ध्येय म्हणून समाजवादाचा स्वीकार केला पाहिजे. देशांतील समाजवादी म्हणविणारांनीं तें ध्येय पत्करण्यापूर्वींच कितीतरी काळ मीं समाजवादाचा स्वीकार केलेला आहे. अर्थात् मी कुठल्याहि पोथींतून समाजवाद शिकलें नाहीं. माझ्या जीवनांत तो सहज विकसित झाला. आहिंसेबाबतच्या माझ्या श्रद्धेतून माझ्या समाजवादाचा जन्म झालेला आहे. " स्वातंत्र्यसंग्रामांत समाजवाद्यांच्या शक्तीचा पूर्ण उपयोग व्हावा अशी गांधींना इच्छा होती. समाजवाद्यांच्या कडव्या स्वातंत्र्यनिष्ठेबद्दल त्यांना कौतुक होतें. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर शोषणरहित समाज निर्माण करावयाचा तर समाजवादाचा प्रश्न देशापुढें येणें अटळ होतें. सुखासुखी समाजवादाची प्रस्थापना होणार नाहीं, स्थापित–स्वार्थाच्या बाजूनें कांहीं प्रयत्न होणारच. समाजवादासाठीं स्वातंत्र्योत्तर काळांत ज्या चळवळी कराव्या लागतील त्या सत्याग्रहाच्या मार्गानें यशस्वी होऊं शकतील असा विश्वास समाजवाद्यांच्या मनांत त्यांना निर्माण करावयाचा होता. हिंसक क्रांतीवांचून समाजवाद येत नाहीं ही समजूत बदलून अहिंसेच्या मार्गानें येणारा समाजवाद हाच खरा समाजवाद असेल हें समाजवाद्यांना पटवून द्यावें अशी तळमळ गांधीजींना होती.

जयप्रकाशांना कांहीं काळ बाहेर राहतां आलें. त्यानंतर त्यांना देवळीच्या तुरुंगांत डांबण्यांत आलें. येणाऱ्या स्वातंत्र्य–लढ्यासाठीं तयारी करावी म्हणून जयप्रकाश धडपडत होते. अटकेनंतर ते स्वस्थ

बसले नाहींत. समाजवादी मित्रांना त्यांनीं तुरुंगांतून मार्गदर्शक पत्रें पाठविलीं. आपल्या पत्नीमार्फत अशाच प्रकारें गुप्तपणें पत्रें बाहेर पाठविण्याचा ते प्रयत्न करीत असतांना तीं पत्रें पकडलीं गेलीं आणि जयप्रकाश आणि गांधीजी दोघांची बदनामी करण्यासाठीं सरकारनें तीं पत्रें प्रसिद्ध केलीं. गांधींनीं हरिजनमध्यें लिहिलें : " जयप्रकाश ज्या संस्थेचे एक माननीय कार्यकर्ते आहेत त्या संस्थेची बदनामी करण्यासाठीं सरकारनें जर तीं पत्रें प्रसिद्ध केलीं असतील तर सरकारचा तो उद्देश सफल होणार नाहीं. जयप्रकाशांचीं तीं पत्रें खरीं आहेत असें घटकाभर मानलें आणि कॉंग्रेसच्या ध्येयाशीं विसंगत अशा मार्गाचीं त्यांत तरफदारी केली असल्यानें त्या विचारांचा निषेध केला, तरी सरकारला तसें करण्याचा कांहींच अधिकार नाहीं. कारण परदेशांतल्या त्यांच्या वकिलाती असल्याच कामगिऱ्या बजावीत असतात. सामान्यतः देशांतील सर्व स्वातंत्र्यवादी लोक सरकारला शत्रु लेखतात आणि जयप्रकाशांनीं जो मार्ग अवलंबिला त्याला फारसें कोणी गैरहि म्हणणार नाहीं. पण जयप्रकाश विचार करतील तर त्यांना असें आढळून येईल कीं, सामुदायिक चळवळी गुप्त मार्गांनीं होत नसतात. सामान्य जनतेला पेलण्यासारखें शस्त्र अहिंसा हेंच आहे. "

राजबंद्यांवरील अन्याय दूर करण्यासाठीं जयप्रकाशांनीं देवळी तुरुंगांत उपवास आरंभला. सरकार त्याची दाद घेईना. महिना लोटला तरी सरकार विचार करीना, तेव्हां गांधीजींनीं जयप्रकाशांना आपला पाठिंबा व्यक्त केला आणि जयप्रकाशांमागें आपलें बळ उभें केलें. तेहेतीस दिवसांच्या दिव्यानंतर जयप्रकाश यशस्वी झाले. या उपवासामुळें जयप्रकाश दुबळे झाले होते. पण सरकारनें त्यांना सोडण्याऐवजीं हजारीबाग तुरुंगांत नेऊन ठेवलें. त्यांच्या प्रकृतीची गांधीजींना काळजी होती. देशांत स्वातंत्र्याचें रणकुंड पेटविण्याची तयारी चालली असतांहि वेळांत वेळ काढून गांधी नियमानें जयप्रकाशांना पत्र लिहीत. त्यांच्या

प्रकृतीची विचारपूस करीत. प्रकृति सुधारण्यासाठीं त्यांनीं घ्यावयाच्या आहाराबद्दल गांधीजींनीं त्यांना पत्रांतून मार्गदर्शन केलें. जयप्रकाशांवर त्यांची वात्सल्याची पाखर सदैव होती.

बेचाळीसच्या ऑगस्टमध्यें सरकारनें पहिला वार करून लढ्याला तोंड फोडलें. जयप्रकाश तुरुंगांतून फरारी होऊन क्रांतिकारकांना संघटित करून लढ्याचें दुसरें पर्व सुरू करण्याची तयारी करीत होते. सरकारनें देशांत जें कांहीं भलें-बुरें घडलें त्याची जबाबदारी गांधींच्या माथीं मारली. जगापुढें आपली बाजू ठेवण्याची संधि देण्याइतकेंहि सौजन्य सरकारनें दाखविलें नाहीं. शेवटीं जनतेच्या न्यायासनासमोर दाद मागण्यासाठीं गांधीजींना उपवासाचें शस्त्र हातीं धरावें लागलें. गांधीजींच्या उपवासामुळें त्यांना लोकमत अनुकूल होऊं नये म्हणून सरकारनें एक चोपडें प्रसिद्ध करून देशांतील घातपाती कृत्यांची जबाबदारी कॉंग्रेसवर असल्याचें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. गांधींनीं कलमवार त्या चोपड्याला उत्तर देऊन त्याच्या चिंधड्या उडविल्या-त्यांनीं लिहिलें : " जर आमच्या मागणीप्रमाणें सरकारनें स्वातंत्र्य दिलें असतें तर देशानें संरक्षणासाठीं प्राणांचा कोट उभारला असता; पण तें दूर राहिलें, उलट जयप्रकाशांसारख्या देशभक्तांची सरकारनें ससेहोलपट चालविली आहे. त्यांना पकडून देणारासाठीं ठेवलेलें पांच हजारांचें इनाम दहा हजारांचें करण्यांत आलें आहे. त्यांच्याशीं कांहीं बाबतींत माझे मूलभूत मतभेद आहेत; परंतु त्यांची निर्भयता, देशासाठीं सर्वस्वार्पण करण्याची त्यांची वृत्ति या गुणांबद्दल मला त्यांचा अभिमान वाटतो. सरकारनें त्यांचा एक जाहीरनामा ह्या आरोप-पुस्तकांत दाखल केला आहे. त्यांतील बाबींशीं क्वचित् कोठें माझा मतभेद असला तरी त्यांतल्या शब्दाशब्दांतून ज्वलंत देशप्रेम आणि परदास्यांतून मुक्तीची तळमळच व्यक्त होत आहे. कोणाहि देशाला अभिमान वाटावा असेच त्यांचे हे गुण आहेत."

गांधीजींच्या उपवासाच्या काळांत जयप्रकाश अत्यंत अस्वस्थ होते. रात्र रात्र त्यांना झोप येत नसे. गांधीजींच्या स्मरणानें ते सद्-गदित होते. परंतु उपवासाच्या दिव्यांतून गांधीजी सहीसलामत बाहेर पडले. जयप्रकाशांनीं पुन्हा सैनिकांची व साहित्याची जुळवाजुळव आरंभिली. त्या प्रयत्नांत असतांनाच त्यांना पकडून सरकारनें लाहो-रच्या तुरुंगांत डांबलें. गांधीजी व वर्किंग कमिटीचे सभासद यांची सुटका होऊन तहाच्या वाटाघाटी सुरू झाल्या. राष्ट्रीय सप्ताहाच्या आदल्या दिवशीं जयप्रकाश व लोहिया यांची सुटका झाली. दुसऱ्या दिवशींच्या प्रार्थना-प्रवचनांत गांधीजी म्हणाले : जयप्रकाश आणि लोहिया या उभयतांना तुम्ही ओळखतां. दोघे मोठे विद्वान् आणि निर्भय क्रांतिवीर आहेत. मनांत आणते तर त्यांना श्रीमंत होणें कठीण नव्हतें. पण त्यांनीं त्यागाचा आणि सेवेचा मार्ग पत्करला. आपली मातृभूमि बंधमुक्त करणें एवढाच एक त्यांना ध्यास होता. साह-जिकच परकी सरकारला ते धोक्याचे वाटले आणि त्यांना त्यांनीं तुरुंगांत डांबलें. पण मूल्यमापन करण्याचा आपला मापदंड वेगळा आहे. त्यांना आपण ज्वलंत देशभक्त मानतों. देशप्रेमाखातर सर्व-स्वाची आहुति द्यायला उत्सुक असलेले वीर समजतों."

सरकारशीं वाटाघाटी सुरू झाल्या तसें जयप्रकाश अस्वस्थ झाले. सरकारनें घटना-समितीची स्थापना केली ती प्रातिनिधिक नाहीं या मुद्द्यावर त्याला जयप्रकाशांनीं विरोध केला. गांधीजी म्हणाले : जयप्रकाशांची ही भाषा मला रुचली नाहीं. जर विधायक कार्याला सर्वांनीं जुंपून घेतलें असतें तर त्यांतून निर्माण झालेल्या शक्तीमुळें जयप्रकाशांच्या अपेक्षेची घटना समिती बनली असती." वाटाघाटींत भरती ओहोटी सुरू झाली मुस्लीम लीगनें कांगावा सुरू केला. त्यांतून बंगालमध्यें आगी पेटल्या. ही आग शांत करण्यासाठीं गांधीजी नौखालीकडे निघाले. तेथें ते जातीय विद्वेषाची आग शांत करीत होते

इतक्यांत बिहारहि पेटला. जातीयवाद अशा प्रकारें बिहारमध्यें उसळून आल्यानें जयप्रकाशांना अत्यंत दु:ख झालें. बिहारला शांत करण्यासाठीं सरहद्द गांधी आले. जातीयतेविरुद्ध जयप्रकाश उभे राहिले.

दिल्लींतली अशांतता मिटविण्यासाठीं गांधीजी दिल्लींत आले. सत्तादानाची तारीख मुक्रर झाली. देश स्वतंत्र होणार, प्रगतीच्या मार्गांतील गुलामीचा अडसर दूर होणार पण हें स्वातंत्र्य समतेशिवाय स्थिर होणार नाहीं, हें गांधीजी जाणून होते. समाजवाद हेंच समतेचें आर्थिक रूप आहे. स्वातंत्र्यानंतर समाजवाद आणला पाहिजे पण तो अहिंसक साधनांनीं यावा असा गांधीजींचा आग्रह होता. ते भाषणांतून समाजवादाचा वारंवार उल्लेख आणि पुरस्कार करूं लागले. सत्य अहिंसेच्या साधनांनीं समाजवाद आणा, तोच चिरस्थायी होईल असें ते सांगूं लागले. रचनात्मक कार्यकर्त्यांनीं जुनी चाकोरी सोडून नव्या प्रेरणेनें कामाला लागावें असें त्यांना वाटत होतें. त्यांना उद्देशून ते म्हणाले, जोंवर आर्थिक समता प्रस्थापित होत नाहीं तोंवर अहिंसक समाजाच्या गप्पा मारण्यांत हंशील नाहीं.

आणीबाणीची वेळ असल्यानें कॉंग्रेसच्या नेहरू, वल्लभभाई, आझाद प्रभृति नेत्यांना मध्यवर्ती सरकारांतील जबाबदाऱ्या पत्करणें क्रमप्राप्त झालें होतें. सरकारांत थोर नेते गुंतल्यानें कॉंग्रेसला दुय्यम स्थान प्राप्त होईल व त्यामुळें सरकारच्या कृत्यांचा पाठपुरावा करणारी संघटना ती बनेल, सरकारचें धोरण सतत पुरोगामी व प्रगतिपर ठेवण्यासाठीं तिचा उपयोग होणार नाहीं अशी शंका गांधीजींना वाटत होती. कॉंग्रेस संस्था अशा परिस्थितींत प्रभावीपणें जिवंत ठेवायची तर नवें प्रखर नेतृत्व तिला देणें जरूर होतें. नेहरू सरकारांत गेल्यावर कॉंग्रेसचें अध्यक्षपद जयप्रकाश किंवा नरेंद्रदेव यांच्याकडे द्यावें अशी आपली इच्छा गांधीजींनीं व्यक्त केली होती. परंतु ती मान्य झाली नाहीं. कॉंग्रेसचें निदान लोकसेवक–संघांत रूपांतर करावें अशी

इच्छा गांधीजींनीं आपल्या अखेरच्या लेखांत व्यक्त केली, पण तिचाहि अव्हेर करण्यांत आला.

जातीय विद्वेषांत आपली आहुति देऊन ती गांधीजींनीं शमविली. कॉंग्रेसचें धोरण यानंतर एकपक्षी होत चाललें. असहिष्णुता वाढत चालली. कॉंग्रेसमधल्या समाजवाद्यांनीं आत्मपरीक्षण केलें. गांधींच्या ध्येयवादाच्या जास्तींत जास्त जवळ आपणच आहोंत, गांधी विचारांत समाजवादाचा सर्वांश येतो असें त्यांना दिसून आलें. गांधीजींच्या कल्पनेप्रमाणें वागण्याचा कॉंग्रेस-नेत्यांचा कल नाहीं असें पाहून समाजवाद्यांनीं कॉंग्रेसबाहेर पडावयाचा निर्णय नाशिकला घेतला. नाशिकच्या अधिवेशनांत जयप्रकाश म्हणाले : " आपल्यावर एक आक्षेप नेहमीं घेतला जातो आणि त्यांत पुष्कळ तथ्यांशहि आहे. आपण विधायक कार्याकडे उपेक्षेनें पाहिलें, त्यांतील क्रांतिकारकता आपल्याला प्रतीत झाली नाहीं हें कबूल केलें पाहिजे. विधायक कार्याच्या अनुभवानें आपण अधिक समृद्धसंपन्न झालों असतों. विधायक कार्यातील क्रांतिकारक शक्ति ओळखून आपण त्याचा स्वीकार केला पाहिजे. याच दृष्टीनें शेतकरी, कामगार, विद्यार्थी, व स्वयंसेवक चळवळी यांच्याकडे आपण पाहिलें पाहिजे. आपल्या राष्ट्रीय जीवनांत आज नैतिक मूल्यें अभावानेंच आढळतात. सर्वत्र सत्तेचें राजकारण, लांचलुचपत, वशिलेबाजी, असें कां ? सगळीकडे जातीयता कां बोकाळते ? कारण हें कीं सत्य आणि अहिंसा यांची तोंडभर स्तुति करणारे पुष्कळ असले तरी निष्ठेनें मनापासून तसे वागणारे मूठभरहि नाहींत. दांभिक सत्य अहिंसेंत जास्त धोका आहे हें ओळखून दंभाचा त्याग केला पाहिजे.

" गांधीजी म्हणत होते त्याप्रमाणें कॉंग्रेसचें लोकसेवक संघांत रूपांतर करण्याची नेत्यांची इच्छा नाहीं. कॉंग्रेसचा एक पक्ष बनविण्याचा त्यांचा मनसुबा आहे. अशा परिस्थितींत पर्याय पक्ष म्हणून

समाजवादी पक्ष हवा. समाजवादी पक्ष नीतीला परमोच्च स्थान देईल. साधनांच्या शुद्धीला महत्त्व देईल. माणसाला नुसतें चांगलें चुंगलें खायला, प्यायला, ल्यायला मिळून भागणार नाहीं. तो उदार, सुसंस्कृत, दयाळूहि हवा. चांगले खायला-प्यायला मिळणारे पशु निर्माण करणारा समाजवाद आपल्याला इथें निर्माण करायचा नाहीं. प्रतिपक्षीयांना व प्रसंगीं आपल्या प्रतिस्पर्ध्यांना वाटेल तीं साधनें वापरून नामोहरम करण्याचा पाश्चात्य देशांतला रिवाज लोकशाहीला विघातक आहे, त्याचा आपण त्याग केला तरच येथें लोकशाही फुलेल.

" महात्माजींनीं या देशाला आणि जगाला अनेक देणग्या दिल्या. परंतु नैतिक मूल्यांची, साधनशुद्धीची त्यांची देणगी सर्वांत थोर आहे. दिवसेंदिवस माझी खात्री होत चालली आहे कीं शुद्ध साधनांनींच थोर ध्येय मिळत असतें, मिळवावें. खुनी, असत्यमय वागणाऱ्याच्या समाजांत, जेथें दया, सहिष्णुता, भ्रातृभाव, उदारता, नाहीं अशा समाजांत खाण्यापिण्याची कितीहि रेलचेल असली तरी राहण्याला मला आवडणार नाहीं. मनुष्य वाईट वागला तरी शिक्षणानें तो चांगला होईल म्हणून जनतेच्या अन्नवस्त्राची तरतूद करतांना थोर नैतिक ध्येयाची स्फूर्तिहि आपल्याजवळ असली पाहिजे. आज सत्तेचा बोलबाला असला तरी सेवेचें कार्य अधिक महत्त्वाचें आहे. जरूर पडली तर सत्ता धारण करावी लागली तरी आपल्या संघटनेंत सेवा करणाऱ्यांचीच अधिक प्रतिष्ठा राहो. कार्यकर्त्यांच्या विविध विधायक व विशुद्ध चळवळींतून खरी लोकशाही अवतरेल. इतर सर्व गोष्टींना वावडें समजून आपण सेवेला लागूं तरच लोकशाही समाजवादाचें ध्येय साध्य होईल. गांधींच्या तत्त्वज्ञानाच्या जास्तींत जास्त जवळ आपणच आहोंत, त्यांचा संदेश कृतींत उतरविण्याचा कसोशीचा प्रयत्न आपण करूं. "

# स्वातंत्र्योत्तर नेतृत्व

" आर्थिक व सामाजिक समतेशिवाय स्वराज्य फार काळ टिकूं शकणार नाहीं " असें गांधीजी सतत म्हणत असत. हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर तें स्वातंत्र्य सुस्थिर करण्यासाठीं आर्थिक व सामाजिक समता प्रस्थापन करण्याचा निकडीचा कार्यक्रम हातीं घेणें आवश्यक होतें. स्वातंत्र्यपूर्व काळांत स्वातंत्र्यासाठीं धडपडणाऱ्यांची कॉंग्रेस ही जशी संयुक्त आघाडी होती त्याचप्रमाणें स्वातंत्र्योत्तर काळांत समतेच्या पाईकांची ती आघाडी बनावी असें गांधींजींना वाटत होतें. परंतु कॉंग्रेसला हें व्यापक रूप देण्याबाबत गांधीजींना यश आलें नाहीं. तिचें लोकसेवक संघांत रूपान्तर करण्याची त्यांची मनीषा सिद्धीस गेली नाहीं. आर्थिक व सामाजिक समता निर्माण करावयाची तर तिचें व्यावहारिक रूप लोकशाही समाजवाद हेंच होतें. जयप्रकाशजींनीं हें कार्य अंगावर घेतलें. समाजवादाची आपली कल्पना त्यांनीं खालील शब्दांत व्यक्त केली आहे.

" जेथें पोटभर खायला देण्यांत येतें, परंतु विचार प्रकट करण्याचें मात्र स्वातंत्र्य नाहीं तेथें माझा समाजवाद असूं शकणार नाहीं. तो तर गुलामांचा समाज मानावा लागेल. मानवाची, मानव्याची जेथें कदर नाहीं तेथें कसला समाजवाद ? उद्यां हिंदुस्थानांत समाजवादी समाज निर्माण करण्यासाठीं, सहकारी, सामुदायिक शेती प्रत्यक्षांत आणण्यासाठीं रशियांतल्याप्रमाणें हजारों शेतकऱ्यांची आपण कत्तल का करणार ? आपल्याला काय अधिकार ? आपण मानवी

वि: ........ नों: दि: ..........



जीविताबद्दल आदर बाळगतों ना ? प्रचार, समजून सांगणें हाच आपला मार्ग, हिंसा आणि हुकुमशाही यांनींच क्रांति होईल असें मार्क्स १८४८ मध्यें म्हणाला. परंतु १८७२ मध्यें त्याचें हें मत बदललें होतें. त्या वेळेस तो परिपक्व बुद्धीचा झाला होता. हॉलंड, इंग्लंड वगैरे देशांत शांततेच्या लोकशाही मार्गानें समाजवाद येऊं शकेल असें तो म्हणाला होता. देशकालप्रमाणें वेगवेगळ्या देशांत वेगवेगळ्या मार्गांनीं समाजवाद येण्याची शक्यता त्यानें सूचित केली आहे.

" समाजवादी पक्ष आगी लावणारा, बॉंब फेकणारा पक्ष नाहीं. त्याचप्रमाणें तो केवळ विधिमंडळांत भाषणें गाजवणारा, निवडणुकी-पुरतां जागा होणारा पक्षहि नाहीं. कालवे खोदणें, रस्ते करणें, शेतीच्या उत्पादन-वाढीचे प्रयोग करणें असे नाना विधायक उपक्रम करीत, त्याचप्रमाणें शांतपणें सत्याग्रह करीत संघटना करणारा, जनतेशीं संबंध जोडणारा तो पक्ष आहे.

" ज्याप्रमाणें लोकशाही मार्गानें सत्ता हातीं येऊं शकते, त्याच-प्रमाणें सत्ता हातीं आल्यावर समाजवादी रचना निर्माण करण्याचें कामहि लोकशाही मार्गानें गोळ्या न झाडतां, रक्त न सांडतां लोकांना समजावून सांगून करतां येणें शक्य आहे. "

ह्या निष्ठेनें जयप्रकाशादि नेते जनसंघटनेच्या कामासाठीं कटिबद्ध झाले. गांधीजींच्या निधनानंतर देशांतल्या सर्व पुरोगामी विधायक शक्ति एकत्र ठेवूं शकेल असा नेता देशांत राहिला नाहीं. अशा नेतृत्वाच्या अभावीं पक्षोपपक्षांत सख्यत्व राहणार नाहीं. त्यांच्यांत तीव्र स्पर्धा व द्वेषमत्सर निर्माण होतील. देशांत नवसमाज-निर्मितीसाठीं उत्साह निर्माण होण्याऐवजीं परस्पर विरोधांत शक्तीचा अपव्यय होईल अशी भीति होती. स्वातंत्र्योत्तर नवजीवनासाठीं जनतेला उत्स्फूर्त करण्यासाठीं एक पक्षातीत अशी चळवळ उभारावी व पक्षकार्य

मर्यादित ठेवावें यादृष्टीनें जयप्रकाशजींनीं पं. नेहरूंशीं वाटाघाटी केल्या. परंतु पक्षातीतता म्हणजे निष्क्रियता, चालू स्थिति कायम ठेवणें नव्हे. आर्थिक व सामाजिक समतेच्या समान ध्येयासाठीं समाजाला उत्स्फूर्त करणें. परंतु नेहरू-प्रभृतींचें मत भिन्न होतें. आधीं समृद्धि, नंतर वांटणी. दारिद्र्याची वांटणी काय करायची असा त्यांचा दृष्टिकोण. तर दारिद्र्याचीहि वांटणी केली तरच समृद्धीचा उत्साह बहुजन समाजांत निर्माण होईल असें जयप्रकाशांना वाटत होतें. त्यामुळें राष्ट्रव्यापी नवजीवनाची चळवळ सुरू करणें शक्य नव्हतें.

समतेच्या आंदोलनाचें शक्तिकेंद्र श्रमिक जनतेंतच निर्माण होतें. जयप्रकाशांनीं श्रमिक जनतेच्या संघटना उभारावयाचें काम हातीं घेतलें. कामगार व किसान यांच्या संघटना ते करूं लागले. देशांत त्या वेळीं दोन प्रकारच्या संघटना होत्या. शांततेच्या मार्गानें आणि सरकारच्या धोरणानें चालणारी इंडियन नॅशनल ट्रेड युनियन काँग्रेस आणि येनकेन प्रकारेण कामगारवर्गाला भडकवून देशांत अशांतता माजवून आपलें घोडें पुढें दामटणाऱ्या कम्युनिस्ट पक्षाच्या दावणीला बांधलेली ट्रेड युनियन काँग्रेस हे दोन्ही मार्ग लोकशाही समाजवादाच्या दृष्टीनें वर्ज्य होते. एक सरकारची री ओढणाऱ्या लाचारांची संस्था तर देशहिताचें सोयरेसुतक न मानणाऱ्या परधार्जिण्या लोकांची दुसरी संस्था. ह्या दोन संघटनांतून विधायक कामगार शक्ति संघटित होणार नाहीं अशा भावनेनें जयप्रकाशजींनीं कम्युनिस्ट व काँग्रेस हे दोन्ही राजकीय पक्ष वगळून राहिलेल्या देशांतल्या सर्व भागांतील कामगार कार्यकर्त्यांची परिषद बोलावली, आणि हिंद मजदूर सभेची स्थापना करण्यांत आली. ट्रेड युनियन संघटनांच्या कामाचे दोन पैलू असतात. एक पैलू त्यांचे आर्थिक हितसंबंध सुरक्षित राखण्याची खटपट करणें, दुसरा पैलू शासन तंत्र कामगारांच्या हिताची ज्यांना कळकळ अशांच्या हातीं यावें म्हणून खटपट

करणें. हे दोन्ही पैलू लक्षांत घेऊन ही संघटना उभारण्यांत आली होती. कामगारवर्गात नवें नेतृत्व निर्माण करावयाचें होतें. कामगाराचें नेतृत्व म्हणजे भंपकपणा किंवा शिवराळपणा अशी स्थिति बदलून रचनात्मक आणि सेवेच्या कामावर भर देणारें नवें नेतृत्व निर्माण करावयाचें होतें. मुंबईला या दृष्टीनें एक कामगार-शिक्षण-संस्थाहि स्थापण्यांत आली होती.

पोस्टमन व तत्सम नोकरांची अखिल भारतीय संघटना देशांत होती. योग्य नेतृत्वाच्या अभावीं संघटना प्रभावीपणें काम करण्याला असमर्थ ठरली होती. पोस्टमनांची संघटना ही देशांतली एक मोठी संघटना. एका अर्थानें हा सर्व व्यवसाय सरकारमार्फत चालणारी, राष्ट्रीय अशा व्यवसायाची संघटना हा एक नाजुक प्रश्न असतो. संयमी आणि निश्चयी नेतृत्वाची अशा संघटनांत आवश्यकता असते. जयप्रकाशजींनीं हें अवघड काम पत्करलें. आपल्यावरील अन्याय दूर करून घेतांना बहुजनसमाजाची सहानुभूति सतत आपल्याला मिळत राहील अशीं पावलें कामगारांनीं टाकलीं पाहिजेत, बहुसंख्य जनतेच्या हिताची जपणूक व विशिष्ट धंद्यांतील कामगारांचा फायदा यांत विरोध येतां कामा नये, हें जयप्रकाशांनीं दाखवून दिलें. पोस्टाचा व्यवसाय हा सरकारी मालकीचा असल्यानें एका अर्थानें तो राष्ट्रीकृत धंदाच होय.या धंद्यांत तरी मालकमजूर, शासकशास्ते असे संबंध नसावेत. सरकारनें आदर्श व्यवसायी म्हणून वागावें अशी जयप्रकाशजींची अपेक्षा होती. पोस्टखात्यांतील कामगारांच्या व अधिकाऱ्यांच्या वेतनांत फार मोठी तफावत दिसत होती. खालच्या नोकरांना मिळणारें वेतन इतकें अल्प होते कीं त्यांना किमान राहणी दर्जा ठेवणेंहि अशक्य होतें. मोठ्या पगारदारांची जमीनदारांसारखी चंगळ होती. राष्ट्रीकृत उद्योगधंद्यांत अशी तफावत असणें हें राज्यघटनेनें उद्घोषित केलेल्या समतेच्या ध्येयाशीं अगदीं विसंगत आहे असें जयप्रकाशजींनीं सरकारला

समजावण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या नेतृत्वाखालीं पोस्टकामगारांची संघटना खूप बलशाली झाली.

रेल्वे आणि संरक्षण खातें हे उद्योगहि सरकारमार्फत चालणारे राष्ट्रव्यापी. पोस्ट-कामगारांच्या सारखाच ह्या कामगारांचाहि प्रश्न नाजुक. ह्या कामगारांच्या संघटनांनींहि जयप्रकाशजींनीं आपल्या संघटनेचे प्रमुख व्हावें म्हणून त्यांना पाचारण केलें. जयप्रकाशांनीं ह्या दोन्ही संघटनांचें फार संयमशील नेतृत्व केलें. कामगारांच्यावरील अन्याय दूर व्हावे पण त्याच बरोबर देशाचें कोठल्याहि प्रकारें नुकसान होऊं नये अशा खुबीनें त्यांनीं संघटना चालविल्या. कामगारांच्या स्वार्थी वृत्तींना आळा घालून त्यांना कर्तव्याची जाणीव करून दिली आणि आंधळ्या, सहानुभूतिशून्य जडतेंतून सरकार-लाहि बाहेर काढलें. राष्ट्रीकृत धंद्यांतील कामगार-मालक संघर्षांत सरकार फिर्यादी आणि न्यायाधीश ह्या दोनहि भूमिका एकाच वेळीं घेत असे. जयप्रकाशजींनीं असें करणें चूक आहे असें वेळोवेळीं दाखवून दिलें.

देशव्यापी, बलिष्ठ अशा तीन कामगार-संघटनांचें नेतृत्व जय-प्रकाशजींकडे होतें. पक्षस्वार्थासाठीं त्यांना ह्या संघटना राबवणें अशक्य होतें असें नाहीं. इतर पक्ष नेते तसेच करीतच होते. इंटकच्या कामगार-संघटना सरकारी इशाऱ्यावर पावलें टाकीत होत्या, तर ट्रेड युनियन कॉंग्रेसच्या नांवाखालीं कम्युनिस्ट आपला पक्ष वाढविण्या-साठीं धडपडत होते. जयप्रकाशजींनीं ह्या तिन्ही संघटनांचें केलेलें नेतृत्व देशांतील कामगार-संघटनेच्या इतिहासांत खास रीतीनें नोंदवावें लागेल.

* * *

कामगार-संघटनांप्रमाणें किसानांच्या संघटनांतहि जयप्रकाशजींनीं लक्ष घातलें. किसान संघटना करणें हें कठिण काम असतें. काम-



नवक्रांतीची चर्चा



गांधीजी आणि जयप्रकाश

गारांइतके त्यांचे हितसंबंध एकाच ठिकाणीं केंद्रित झालेले नसतात. किसानांचा समाज इतका विखुरलेला असतो कीं, त्यांना संघटित करणें हें एक दिव्यच असतें. देशांत कामगार-संघटना निघून वीस-बावीस वर्षें झालीं तरी किसान–संघटना मात्र फारशी कोठेंहि नांवारूपाला आली नाहीं. हिंदुस्थानांतील बहुसंख्य श्रमिक हे किसान असल्यानें देशांतील आर्थिक क्रांतीचा खरा आधार शेतकरीच आहे हें ओळखून हिंद किसान पंचायतीची स्थापना करण्यांत आली. देशांतील किसान असंघटित, नव विचारांशीं अपरिचित रूढिग्रस्त. ह्या ग्रामीण अजगराला जागृत करणें हें काम सोपें नाहीं. परंतु जयप्रकाशांना किसान-संघटनेचा अनुभव होता.

उत्तर प्रदेश आणि बिहार प्रांतांत जमीनदारी प्रथा. ही प्रथा अन्याय्य आहे ही गोष्ट सर्वमान्य होती. परंतु ह्या जमीनदारांच्या कचाट्यांतून किसानांना कसें मुक्त करावयाचें हा प्रश्न होता. जमीन-दारांना मोबदला चुकवून कसणाऱ्यांना जमिनी द्यायच्या म्हणजे कसणाऱ्यांचा जमिनीवरचा हक्क नाकारण्यासारखेंच होतें. वर्षानुवर्षें श्रम न करतां ज्यांनीं चैन केली त्यांना मोबदला मिळून चुकला असें मानणें हें धर्म्य होतें. परंतु दंडशक्ति ही युक्तिवादांनीं वश होत नाहीं, नमत नाहीं; सामर्थ्यापुढें ती वांकते. त्यामुळें जमीनदारी नष्ट करण्याच्या दृष्टीनें युक्तिवाद निष्प्रभ ठरले होते. किसानांच्या संघटित विराट शक्तीचें दर्शन घडविण्यासाठीं उत्तर प्रदेशाची राजधानी लखनौ आणि बिहारची राजधानी पाटणा या दोन ठिकाणीं १९४९ च्या नोव्हेंबर महिन्यांत मोर्चे काढण्याचें ठरलें! स्वातंत्र्योत्तर काळांत किसानांचीं एवढीं प्रचंड निदर्शनें तोंवर तरी कधीं झालीं नव्हतीं. लखनौच्या मोर्चांत चाळीस पन्नास हजार आणि पाटण्याच्या मोर्चांतहि तितकेच किसान सामील झाले होते. त्या दिवशीं पाऊण ते एक कोटी

किसानांनीं निदर्शनें केलीं. हीं निदर्शनें दांडी-यात्रेचें स्मरण करून देणारीं होतीं असें वार्तासमीक्षांनीं सांगितलें. अन्यायनिर्मूलन आणि स्वावलंबन हे दोन संदेश त्या किसानांना देण्यांत आले. अन्याय-निर्मूलनाचीं दोन अंगें असतात. वरिष्ठांचा आपल्यावर होणारा अन्याय आणि कनिष्ठांवर आपला होणारा अन्याय. हे विविध अन्याय दूर करण्याची जाणीव किसानांना करून देण्यांत आली.

हिंदुस्थान खेड्यांत वसलेला आहे. ह्या पांच लाख खेड्यांची पुनर्रचना कशी होणार ? जनतेच्या उत्स्फूर्त कार्योत्साहाशिवाय हें अशक्य आहे. किसानांच्या संघटनेचें हें विराट प्रदर्शन झाल्यानंतर विधायक कार्यासाठीं किसानांची उठावणी करण्याचा कार्यक्रम आंख-ण्यांत आला. भूसेना स्थापन करून स्वावलंबनानें आपल्या गांवाचें स्वरूप पालटावें म्हणून किसानांना आवाहन करण्यांत आलें. बिहार-मध्यें दोनशें गांवांत ही नवनिर्माण चळवळ सुरू झाली. 'नया समाज बनाना है, भूलो मत भूलो मत ! नया गांव बसाना है, भूलो मत, भूलो मत !'' ह्या घोषणांनीं हीं खेडीं गजबजून गेलीं. गांवांतील प्रौढ लोक हातांत फावडीं कुदळीं घेऊन गांवाचा काया-पालट करण्याच्या निर्धारानें उभे राहिले. देशासाठीं सामुदायिक स्वेच्छा प्रयत्नांच्या स्वरूपांत जर प्रत्येक मनुष्य रोज एक तास देईल तर रोज वीस कोटी श्रमतास मिळतील. दुसऱ्याच्या तोंडाकडे आशाळभूतपणें पाहात न बसतां या संघटित श्रमशक्तींतून नवा गांव बनवितां येईल. बिहारमधील अवधारा नदीचें पात्र उथळ झालें होतें. त्यामुळें दरवर्षी तिच्या तीरावरील लोकांना नाना प्रकारच्या आपत्ति भोगाव्या लागत होत्या. सरकार-दरबारीं अर्जविनंत्या आणि शिष्टमंडळें नेऊन लोक जेरीस आले होते. गांधीयुगापूर्वीच्या निष्फळ सनदशीर राजकारणाची पुनरा-वृत्ति होत होती. स्वातंत्र्यानंतर देशांतील जनता अधिक परावलंबी बनली होती. जनतेतील कर्तृत्वशक्ति जागृत करण्यासाठीं केलेल्या

शाब्दिक धडपडी निरुपयोगी ठरत होत्या. ज्या वेळीं जयप्रकाशजी व त्यांचे सहकारी यांनीं हातांत फावडीं, कुदळीं, पाट्या उचलल्या त्या वेळीं ही कर्तृत्वशक्ति जागृत झाली. बिहारच्या खेडोपाडीं उत्साहाची नवी लाट उसळली. अवधारा नदीचें पात्र २० मैल खोल करण्यांत आलें. रस्ते बांधले. स्वातंत्र्यपूर्व काळांत चरख्याच्या गूं गूंनें जनतेची आत्मशक्ति जागृत केली. स्वातंत्र्योत्तर काळांत फावडेंकुदळीं यांच्या खणखणाटानें ती जागृत होऊन कर्तव्यपरायण बनली.

विद्यार्थी वर्ग हा तर समाजांतील नवप्रवृत्तींचा आधार. पण स्वातंत्र्य मिळालें आणि विद्यार्थीवर्ग निष्प्राण बनला. शाश्वति, सुरक्षितता यांच्या मागें लागला. सहज साहसी वृत्ति, कार्योत्साह मावळला. मिठानें खारटपणा सोडला तर पदार्थांना चव कशी येणार? विद्यार्थीच जर निस्तेज, निष्प्राण, हतोत्साह झाले तर नवराष्ट्राची उभारणी कोण आणि कशी करणार? विद्यार्थ्यांना जाग आणण्यासाठीं सर्वांनीं कंबर कसावी या दृष्टीनें प्रयत्न सुरू झाले. नॅशनल युनियन ऑफ स्टुडंट्स ही संघटना सुरू झाली. जयप्रकाश आणि जवाहरलाल यांनीं या कामांत सहकार्यानें भाग घेतला. विद्यार्थ्यांची व्यापक संघटना उभारून त्यांच्या कर्तृत्वशक्तीला आवाहन करण्याचा व ती संघटित रीतीनें राष्ट्रसंवर्धनाच्या कामीं जुंपण्याचा ह्या संघटनेचा हेतु होता.

१९५० साल अस्ताचलीं जाऊं लागलें. कार्यशील जनसंघटना उभारण्याचें जयप्रकाशांचें काम जयप्रकाश करीत होते. विसाव्या शतकाचा प्रथमार्ध संपत आला होता. द्वितीयार्ध सुरू व्हायचा. प्रथमार्ध स्वातंत्र्य प्राप्त करून तें सुस्थिर करण्याच्या कामीं खर्ची पडला. स्वातंत्र्य सुस्थिर झालें. आतां लोकशाही मार्गानें आर्थिक व सामाजिक समतेची स्थापना करून तें बळिष्ठ करावयाचें. विसाव्या

शतकाच्या द्वितीयार्धांतली हीच कामगिरी हा संदेश घेऊनच एक जानेवारी १९५१ चा दिवस उगवावयाचा होता. समाजवादी युगाचा प्रारंभ-दिन म्हणून १ जानेवारी १९५१ चा दिवस साजरा करावयाचें ठरविण्यांत आलें. सर्वत्र समाजवादाची घोषणा आतां दुमदुमली पाहिजे, समाजवादासाठीं लोक कार्यशील झाले पाहिजेत. जयप्रकाशजींच्या नेतृत्वाखालीं मुंबईमध्यें प्रचंड फेरी निघाली. समाजवादी युगासाठीं आतां सगळ्या राष्ट्राची शक्ति उभी राहिली पाहिजे याची द्वाही मुंबापुरींत फिरली. मुंबईला हिंदुस्थानच्या इतिहासांत खास स्थान आहे. १८८५ सालीं काँग्रेसचें पहिलें अधिवेशन याच नगरींत भरलें आणि हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याची मुहूर्तमेढ रोवण्यांत आली. विसाव्या शतकाच्या प्रथमार्धांत देशानें सर्व शक्ति एकवटून हें ध्येय साध्य केलें. स्वातंत्र्याच्या सर्व चळवळींत आरंभ याच मुंबईत झाला. गांधीजींनीं बेचाळीसच्या क्रांतीचें आवाहन येथेंच केलें. समाजवादी युगारंभाची तुतारी जयप्रकाशांनीं येथेंच फुंकली. "समाजवादाच्या स्वीकाराशिवाय हें नूतन लोकसत्ताक सुस्थिर होणार नाहीं. विधायक कार्य आणि सत्याग्रह यांच्या मार्गानें देशांतील समाजवादी चळवळ अधिक प्रभावी होईल आणि विसाव्या शतकाच्या द्वितीयार्धांत देशांत समाजवादाची प्रस्थापना होईल. प्रथम शतकार्धांत सर्व चळवळी स्वातंत्र्याच्या एका ध्येयाशीं निगडित झालेल्या होत्या. द्वितीय शतकार्धांत त्याचप्रमाणें समाजवादानें सर्व चळवळी अनुप्राणित व्हाव्या लागतील." जयप्रकाशांनीं मंगलवाणी उच्चारून समाजवादाचे केलेलें आवाहन सुफलित होण्याचीं चिन्हें दिसत आहेत.

◆◆ ◆◆ ◆◆

# सदाचाराची प्रेरणा

निवडणुकींच्या काळांत जें कांहीं घडलें त्याचे परिणाम जयप्रकाशजींच्या सारख्या संवेदनाशील मनुष्यावर होणें अपरिहार्यच होतें. उपवासकालांत जयप्रकाशजींनीं जें आत्मनिरीक्षण केलें त्यांतून मानवजीवनाविषयीं व समाजाविषयीं अनेक प्रश्न उपस्थित झाले. जगांतल्या वेगवेगळ्या देशांचे इतिहास त्यांच्यासमोर होते. जगांत झालेले प्रयोग व त्यांचीं यशापयशें यांचाहि त्यांनीं विचार केला. 'परिस्थिति तसा माणूस' हें तत्त्वज्ञान सर्वथैव सत्य नाहीं हें त्यांना दिसून आलें. मानवी शरीराचाच केवळ विचार करीत राहिलें तर भौतिक परिस्थिति बदलण्याची निकड प्रतीत होते. परंतु भौतिक परिस्थिति बदलली कीं लगेच जीवन सुधारलें असा अनुभव जगांत येत नाहीं. परिस्थितीच्या बदलानें नव्या समाजाचा घटक बनूं शकणारा नवा मानव निर्माण होतोच असें नाहीं. व्यक्ति हा समाजाचा घटक. तो घटकाहि सुधारला पाहिजे. घटक सुधारायचा म्हणजे त्याला सदाचारसंपन्न करायचें. पण मानव सदाचारसंपन्न कसा होईल ? तो पाप करण्याला कां प्रवृत्त होतो ? सदाचाराची प्रेरणा त्याला कशांतून मिळते ? ह्या प्रश्नाच्या दृष्टीनें त्यांनीं तत्त्वमंथनाला आरंभ केला. जयप्रकाशजींच्या शब्दांतच ह्या मंथनाचें सार व्यक्त झालेलें पाहणें अधिक श्रेयस्कर होईल.

* * *

" पूर्वीं माणसें श्रद्धाळू होतीं. ईश्वरावर त्यांची श्रद्धा असे. या श्रद्धेंतून त्यांना सदाचाराची प्रेरणा मिळे. आपण सत्यनिष्ठ, निःस्वार्थी

परोपकारी होण्याचा सदैव यत्न करीत असलें पाहिजे अशी त्यांची समज होती. शीलवान् व गुणसंपन्न बनणें हें माणसाचें परम नैतिक कर्तव्य आहे असें मानलें जाई. यांत त्यांना यश येत होतें कीं नाहीं हा प्रश्न अलाहिदा. सांप्रदायिक धर्म, ईश्वरनिष्ठा व सामाजिक संकेत माणसांना हीच शिकवणूक व प्रेरणा देत असत. आत्मविकासासाठीं, मुक्तीसाठीं, सुखशांतीसाठीं नीतिमान् बनणें हाच उपाय आहे असे संस्कार माणसांच्या मनांवर केले जात.

" तो जमाना आतां पालटला आहे. समाजावर धर्माचा प्रभाव राहिला नाहीं. ईश्वरनिष्ठा भंगली आहे. नैतिक मूल्य म्हणजे अंधः-श्रद्धा, निर्बुद्धपणा असें मानण्याची पद्धत पडत आहे. मानवी मनांत भौतिकता प्रतिष्ठित झाली आहे. एकदां केवळ भौतिकतेवर माणूस अधिष्ठित झाला म्हणजे सदाचाराला, शीलाची जोपासना करण्याला प्रेरणा कोठून मिळते, हा प्रश्न विचार करण्यासारखा आहे. आजच्या समाजास्थितीचा, भोंवतालच्या प्रश्नांचा व ध्येयांचा विचार करतांना वरील प्रश्नाचें उत्तर शोधणें अनेक दृष्टींनीं फायद्याचें होईल.

" सदाचाराच्या प्रेरणेचा हा प्रश्न अव्वल दर्जाचा आहे असें मी मानतों. समाजांत सर्वत्र भौतिकतेचें वातावरण दिसत असलें तरी त्याचबरोबर आपापल्या धारणेप्रमाणें समाजसुधारणेचे, पृथ्वीवर स्वर्ग आणण्याचे प्रयत्नहि सर्वत्र चालू असलेले दिसतात. मानव-समाजाची अधिक न्याय्य व निर्दोष नवरचना व्हावी म्हणून अनेक जण जिवापाड यत्न करीत आहेत. विश्वबंधुत्व साकार करण्याच्या धडपडी व नवसमाज रचनेचे अन्य ध्येयवादी प्रयोग अजून सफल होत नाहींत. मानवांतील दुष्प्रवृत्ति अनिवार होतांना दिसतात. उच्च आणि उदात्त विचारांचें तारूं दुष्ट प्रवृत्तींच्या खडकावर आदळून छिन्नविच्छिन्न होतें कीं काय अशी भीति वाटते. व्यक्तीची सुधारणा

न करतां केवळ समाजांत बदल घडवून आणण्यासाठीं केलेले प्रयत्न अयशस्वी होतात असा अनुभव येत आहे. समाज व विशेषतः समाजाचे धुरीण सदाचारी असल्याशिवाय नवसमाज निर्मिति अशक्य आहे.

" हा आजच्या युगापुढील मूलभूत प्रश्न आहे. नवा समाज निर्माण व्हावा असा तर सर्वांचा यत्न दिसतो. आधुनिक विज्ञान आणि यांत्रिक शोध यामुळें पूर्वीं कधीं शक्य वाटत नसलेली समृद्धि आटोक्यांत आली आहे. दारिद्र्य व विषमता संपूर्णपणें नष्ट करणें आज शक्य कोटींत आलें आहे. पण माणसाला सदाचारी व शीलवान् बनविणाऱ्या साधनांची उणीव आहे. उच्च ध्येय व आकांक्षा कल्पना-सृष्टींत राहून स्पर्धा, लोभ, महत्त्वाकांक्षा व त्यांतून निर्माण होणारा संघर्ष तेवढा सत्यसृष्टींत वितरलेला दिसतो.

" मानव शीलभ्रष्ट होणार नाहीं असा कांहींतरी उपाय शोधून काढणें आज अगत्याचें आहे. मीं सत्क्रिया कां आचरावी? सदाचारी व गुणसंपन्न कां व्हावें? असा प्रश्न आज प्रत्येकाच्या मनांत उठत असतात. ईश्वर, आत्मा, शाश्वत नीतितत्त्व, परलोक किंवा जन्म-मरणाचा फेरा जे मानीत नाहींत ते या प्रश्नाला काय उत्तर देणार? मनुष्य म्हणजे पंचमहाभूतांचा संघात, क्षणिक जीवनानंतर मृत्यु आला कीं पंचमहातत्त्वांत तो पुन्हा कायमचा विलीन होतो असें भौतिकवाद सांगतो. व्यवहारामध्यें असत्य, अनाचार, वैर, युद्ध आपल्या भोंवतीं सर्वत्र पसरलेलें तो पाहतो. सत्याचा व नीतीचा जय झालेला त्याला क्वचितच दिसतो आणि मग तो स्वतःला विचारतो, " मीच तेवढी शीलाची आणि सदाचाराची कदर कां बाळगावी?" व्यवहारचतुर व राजकारणपटु त्याला म्हणतात. बरोबर आहे, तुझी पापभीरुता निरुपयोगी आहे." जो मनुष्य आपल्या स्वार्थावर नजर

ठेवून वेळ पडेल तसें वागूं शकतो, ज्याला नीति-कल्पनांची पर्वा वाटत नाहीं तोच हुशार व चतुर गणला जातो. मानवी व्यवहाराची नीतीपासून फारकत झाली कीं ध्येयें व स्वप्नें देखील शबलित किंवा विकृत होतात.

" भौतिक विरोध-विकासवादाची मीं अनेक वर्षे उपासना केली आहे. दुसऱ्या कोणत्याहि तत्त्वज्ञानापेक्षां हें तत्त्वज्ञान मला अधिक सुसंगत व ग्राह्य वाटत असे. माझा तत्त्वज्ञानाचा शोध चालूच आहे. पण माणसाला खऱ्या अर्थानें मानव बनविण्याची शक्ति केवळ भौतिकवाद देऊं शकत नाहीं, असें माझ्या प्रत्ययाला आलें आहे. भौतिक संस्कृतीमध्यें सदाचाराला बुद्धिगम्य प्रेरणा उरत नाहीं. भौतिक विरोध-विकासाच्या साम्राज्यांत भीतीमुळें माणसें निर्बंध पाळतात. ईश्वराऐवजीं पक्ष सर्वसत्ताधारी बनतो, पण हा देवच जेव्हां दुराचारी बनतो तेव्हां दुराचार हाच सदाचार मानला जाऊं लागतो.

" माझी अशी खात्री झाली आहे कीं सदाचाराला नित्य प्रेरणा देणारी शक्ति आपल्याला हवी असेल तर भौतिकतेच्या पलीकडे गेल्याशिवाय गत्यंतर नाहीं. इतकेंच नव्हे तर एक पाऊल पुढें जाऊन मी असें म्हणतों कीं भौतिक विरोध विकासाच्या पूजा साइन दिल्याशिवाय नवसमाज-निर्मिति होणार नाहीं.

" श्रद्धेशिवाय सदाचार शक्यच नाहीं काय, असेंहि कोणी विचारतील. देव, धर्म वा अशाच एखाद्या आतिमानुष कल्पनेवर तरच सदाचाराची प्रवृत्ति माणसाच्या मनांत निर्माण होते असें आहे का ? मनुष्य उपजतच सत्प्रवृत्त नाहीं का ? प्रत्येक समाजांत बहुसंख्य लोक निरुपद्रवी व सत्प्रवृत्त नसतात का ?

" मनुष्य हा समाजाशीं बांधलेला (Socio-organic-being) जीव आहे. नैसर्गिक प्रकृति व सामाजिक संकेत यांचें त्याच्या ठिकाणीं

मिश्रण झालेलें असतें. प्रकृति आणि संस्कार यांचें पृथक्करण करणें जवळजवळ अशक्य आहे. निसर्गतः माणूस कसा असतो हें सांगणें कठीण आहे. पापपुण्याची कल्पना खासच निसर्गनिर्मित नाहीं, ती सामाजिक संकेतांतून निर्माण होणारी आहे. भलेबुरे नीतिमान्–अनीतिमान् अशी परीक्षा निसर्गाला ठाऊक नसते. मनुष्यस्वभावहि निसर्गतः असाच असतो. आत्मरक्षण व जातिरक्षण यांची भावना त्यांच्यांत उपजतच असते. पण याव्यतिरिक्त पापपुण्याचा, भल्या-वाईटाचा, नीति-अनीतीचा विचार सामाजिक संस्कारांतून व शिक्षणांतून निर्माण होतो.

" हें खरें कीं कोणत्याहि समाजांतील बहुसंख्य माणसें साधारण-पणें सत्प्रवृत्त असतात. तीं गतानुगतिक वृत्तीनें जीवन कंठितात नीति-अनीतीच्या प्रश्नाचा नव्यानें विचार करण्याची उठाठेव ते करीत नाहींत. सामाजिक संकेत व परंपरा यांच्या चाकोरींत ते जन्मतात, जगतात व मरतात.

" समाजांतील बहुसंख्य लोकांना स्वतःची अशी कोणतीहि निष्ठा नसल्यानें सध्यांच्या संक्रमण-काळांत त्यांची शोचनीय स्थिति झालेली आहे. मनुष्यमात्रांतील लोभ आणि भीति यांना आवाहन करून मतलबी राज्यकर्ते जनसमूहाकडून वाटेल तीं क्रूर व दुष्ट कर्में करवून घेऊं शकतात. भारतांतील शेंकडों सद्वृत्त हिंदु व तसेंच शेंकडों सद्वृत्त मुसलमान वैरानें क्षणभर अंध होऊन एकमेकांवर तुटून पडलेले आपण नाहीं का पाहिले ?

" आदर्श समाज निर्माण करतांना किंवा विकासाची गति व दिशा निश्चित करतांना समाजांतील बहुसंख्य अशा सर्वसाधारण जनतेचा विचार करण्यापेक्षां समाजांतील धुरीणांचा विचार करणें अधिक महत्त्वाचें आहे. समाजधुरीणांच्या तत्त्वज्ञानावर व वृत्तीवर समाजाचें

भवितव्य अवलंबून असतें. समाजधुरीण जर नीति-अनीतिची पर्वा न करणारे, विश्वघटनेमागील ईश्वरी सूत्र न मानणारे असतील तर त्या प्रमाणांत समाजाची हानि झाल्याशिवाय राहणार नाहीं.

" माझ्या म्हणण्याचा विपर्यास होऊं नये म्हणून एक गोष्ट मी प्रामुख्यानें सांगूं इच्छितों. भौतिकवाद मानणारे सर्व लोक दुष्ट किंवा दुर्जन आहेत आणि सर्व ईश्वरवादी सुष्ट किंवा सुजन आहेत असें मला मुळींच म्हणावयाचें नाहीं. माझें म्हणणें एवढेंच आहे कीं, भौतिकवादाच्या तर्कशास्त्रामध्यें सदाचारासाठीं साक्षेपानें तप करण्यास प्रवृत्त करण्याची शक्ति नाहीं. भौतिकतेच्या पलीकडे जाऊन विचार करणारांना दुराचाराचें समर्थन करणें कठिण असतें एवढेंच मला म्हणावयाचें आहे. ' भौतिकवादाच्या पलीकडे ' हा शब्दप्रयोग मी बुद्धिपुरस्सर करीत आहें. कोणत्याहि सांप्रदायिक तत्त्वज्ञानाचा पर्याय म्हणून मला निर्देश करावयाचा नाहीं. कोणत्याहि ईश्वरवादाचा पुरस्कार मला करावयाचा नाहीं. भौतिकवाद असमाधानकारक व अपूर्ण म्हणून त्याचा उल्लेख केला कीं, दुसरी बाह्य श्रद्धा किंवा आधार स्वीकारला पाहिजे असें मी मानीत नाहीं. उलट आत्मविकासाची संपूर्ण जबाबदारी स्वतःवर घेऊन माणूस आत्मनिष्ठ होतो. ही आत्मनिष्ठा माणसाला उच्च नैतिक पातळी देते. त्या पातळीवरून आत्मविकासासाठीं तप करण्याची सतत प्रेरणा माणसाला मिळते. सदाचाराची सहज प्रवृत्ति एकदां जागृत झाली कीं, माणूस जागृत राहून स्वतंत्रपणें आत्मविकासासाठीं प्रयत्न करीत राहतो. भौतिकवादापलीकडे पाऊल टाकलें म्हणजे माणूस स्वतःच्या भवितव्याचा नियंता बनतो. "

* * *

मानव लोभभयांतून मुक्त झाल्याशिवाय मानव सहज सदाचारसंपन्न होणार नाहीं. लोभभयाच्या आधारावर मानवाला नीतीच्या

मार्गावर ठेवण्याचा प्रयत्न प्राचीन काळीं धर्मानें केला. क्षत्रियांच्या युगांत राजांनीं हाच मार्ग चोखाळला. वैश्ययुगांतहि दुसरा मार्ग सांपडला नाहीं. लोभभयाच्या साधनानें मानव अधिक सार्थ मानव बनला नाहीं. उलट त्याची दुराचारिता अधिक सूक्ष्म आणि अव्यक्त बनत गेली. जोंपर्यंत लोभभयाच्या जात्याच्या दोन तळ्यांत मानव भरडत आहे तोंपर्यंत खरी मानवता निर्माण होणें कठिण आहे. लोभभयमुक्त समाज हाच खरा सदाचारसंपन्न समाज बनूं शकेल. असा समाजच खऱ्या अर्थाचा लोकशाही समाजवादी समाज असेल. त्यालाच सर्वोदय समाजहि म्हणतां येईल. जयप्रकाशजी असा समाज निर्माण करण्यासाठीं नव्या प्रेरणा शोधीत आहेत.

◆◆ ◆◆ ◆◆

## परमधामच्या परिसरांत

हिंदुस्थान स्वतंत्र झाला. स्वतंत्र राज्यघटना बनविण्यांत आली. जनतेला राजकीय स्वातंत्र्य मिळालें. तें लोकशाहींत परिणत व्हावें यासाठीं प्रौढ मताधिकार देण्यांत आला. पसतीस कोटि लोकसंख्येच्या देशांत राजकीय लोकशाहीचा अपूर्व प्रयोग होणार होता. १९५१ सालापासून निवडणुकांचे नगारे वाजूं लागले. वेगवेगळे पक्ष आपआपले कार्यक्रम जाहीर करूं लागले. प्रौढ मताधिकारानुसार होणारी सार्वत्रिक निवडणूक हें एक महान् पर्व असतें. नवे विचार सर्वसामान्य जनतेपर्यंत नेऊन पोंचविण्याची ही फार मोठी संधि असते. निवडणुकींचा सर्वस्पर्शीपणा लक्षांत घेतला तर कोणताहि राजकारण-धुरंधर मनुष्य त्यापासून अलिप्त राहूं शकणार नाहीं, हें ध्यानांत येतें. हिंदुस्थानांतले सर्व पक्ष तयारीला लागले.

कॉंग्रेस पक्ष सत्ताधारी होता. कॉंग्रेस सरकारनें उत्पादन-वाढीवर भर देणारी एक पंचवार्षिक योजना बनविली होती. पंचवार्षिक योजना ही कॉंग्रेसची निवडणूक घोषणा होती. समाजवादी पक्षानें लोक-शिक्षणाच्या दृष्टीनें आपला निवडणूक जाहीरनामा तयार केला. समाजवादी हिंदुस्थानचा आराखडा आणि कार्यक्रम त्यांत देण्यांत आला होता. येन केन प्रकारेण निवडणूक जिंकण्यापेक्षां सुजाण लोकमत निर्माण करणें हाच समाजवादी पक्षाचा मुख्य उद्देश होता. समाजवादाचा संदेश घरोघर, गांवोंगांवीं पोंचविण्याची धडपड त्या निमित्तानें देशव्यापी प्रमाणावर करायची होती.

समाजवादी पक्ष निवडणुकीचा विचार करतां बाल्यावस्थेंतच होता. पण हें बालपणच त्याचें वैभव होतें. तारुण्यांत जी ध्येयनिष्ठा अंतः-करणांत तेवत असते ती पक्षांत होती. उदात्त स्वप्नें डोळ्यांसमोर तरळत होतीं. नवें जग निर्माण करण्याचा उत्साह ओसंडत होता. पक्षानें कार्यक्रम तर चांगलाच आंखला, परंतु निवडणुकींतील हिकमती टाळण्याचाहि प्रयत्न केला. जातिवादी व दहशतवादी यांचा संबंध कटाक्षानें टाळण्यांत आला. निवडणुकींत आणि युद्धांत कांहींहि चालतें अशी भूमिका घेण्यांत आली नाहीं. सुजनता ही अंतीं हिताची हें ओळखून जयप्रकाशादि नेत्यांनीं पावलें टाकलीं. पं. नेहरू, मौ. आझाद, संसदेचे अध्यक्ष मावळंकर, जॉन मथाय, चिंतामणराव देशमुख यांच्यासारख्या बुद्धिमान व कर्तबगार उमेदवारां-विरुद्ध पक्षानें उमेदवार उभे केले नाहींत.

एकूण ३२५० जागांपैकीं २१०० जागांसाठीं पक्षानें उमेदवार उभे केले. संसदेच्या ४८० जागांपैकीं ३०० जागा लढविण्याचा निर्णय पक्षानें घेतला. निवडणूक ही लोकशिक्षणाची महान् संधि असें मानून शैक्षणिक वाङ्मय तयार करण्यांत आलें. ही देशांतली पाहिली सार्वत्रिक निवडणूक. देशांतल्या लोकशाही परंपरेचा पाया ह्या निवडणुकीमुळें घातला जाणार होता. निवडणुकी जिंकण्याचे नेहमींचे मार्ग म्हणजे पोकळ भडक आश्वासनें आणि प्रतिपक्षाला शिव्या मोजणें. पण हे मार्ग टाळण्याचा प्रयत्न करण्यांत आला. जय-प्रकाशजींच्या प्रचारांत कोठेंहि अतिभडकपणा नसे. दर्प आणि अहंकार त्यांना शिवत नाहीं. "तार्किक सिद्धान्त एकत्र करून एखादा संप्रदाय निर्माण करतां येईल. पण आम्हांला नवी संस्कृति, नवा समाज, नवा जीवनमार्ग निर्माण करावयाचा आहे. नवी मानवता जगांत फुलवावयाची आहे. जीवनमूल्यांवरच त्यांची उभारणी होऊं

शकेल. समाजवादी चळवळीनें नवीन जीवनमूल्यें समाजांत प्रतिष्ठित केलीं पाहिजेत '' असें जयप्रकाश सांगत.

समाजवादी पक्षानें निवडणुक—जाहीरनाम्यांत अवाच्या सवा आश्वासनें दिलीं नाहींत. आम्हांला निवडून द्याल तर दुधामधाच्या नद्या वाहतील, पृथ्वीवर स्वर्ग अवतरेल असें त्यांनीं सांगितलें नाहीं; उलट जनतेला कर्तव्याचें भान करून दिलें. " सामाजिक क्रांती-खेरीज देशांत समृद्धि येईल असें आश्वासन देणें लबाडीचें आहे. जोंवर शोषण, विषमता आणि खास अधिकार यांच्यावर आधारलेली समाजरचना कायम आहे तोंवर देशांतलें दारिद्र्य जाणार नाहीं, नव-निर्माण शक्तींना बहर येणार नाहीं. ज्या वातावरणांत राष्ट्रें निर्माण होतात तें मानसिक वातावरण आजच्या समाजरचनेंत अशक्य आहे.'' असा इषारा समाजवाद्यांनीं आरंभींच दिला. समाजवादी पक्षाच्या जाहीरनाम्यांत देशांतील सर्व प्रश्नांचा उहापोह करण्यांत आला होता. समता-निर्मितीच्या कार्यक्रमाची त्यांत उत्तम चर्चा करण्यांत आली आहे. पक्षानें लोकशिक्षणाच्या दृष्टीनें निवडणूक लढविण्याचें ठरवून घरोघर समाजवादाचा संदेश पोंचविण्याला आरंभ केला.

जयप्रकाशजींचें सर्व लक्ष निवडणुकींवर नव्हतें. निवडणुकींचें महत्त्व मान्य करूनहि विधायक कार्याची परिणति म्हणूनच शेवटीं समाजवादाची प्रस्थापना होणार आहे अशा धोरणानें त्यांचे कार्यक्रम चालू होते. १९५१ सालीं १५ ऑगस्टचा उत्सव करण्यांत आणि पुढील निवडणुकांवर नजर ठेवून स्वातंत्र्य-संपादनाचें श्रेय स्वतःच्या पदरीं बांधून घेण्याच्या प्रयत्नांत नेते गुंग असतांना हा क्रांतिकारकें नेता वर्ध्याच्या परिसरांत विधायक कार्य करणाऱ्या संस्थांचें निरीक्षण करीत होता. मगनवाडी, सेवाग्राम, गोपुरी या ठिकाणांना त्यांनीं भेटी दिल्या. स्वप्नशील वृत्तीनें भविष्यकाळीं होणाऱ्या क्रांतीवर

भर देऊन सैद्धान्तिक क्रांतिवादांत मधमाशीप्रमाणें अडकून न पडतां जनतेच्या जीवनाशीं समरस होण्यासाठीं व त्यांचें जीवन अधिक उन्नत करण्यासाठीं धडपडणाऱ्या विधायक कार्यकर्त्यांशीं जयप्रकाश-जींनीं मनमोकळ्या चर्चा केल्या.

जयप्रकाशजींना वर्ध्यांतील दोन व्यक्तींचें खास आकर्षण होतें. श्री. किशोरलाल मश्रुवाला व विनोबाजी ह्या त्या दोन व्यक्ति. किशोरलालभाईंशीं चर्चा करून ते विनोबाजींच्या परमधाम आश्रमांत त्यांची भेट घेण्यासाठीं गेले. जयप्रकाश व प्रभावती देवी यांचें आश्रमीयांनीं अत्यंत प्रेमानें स्वागत केलें. विनोबाजींच्या साम्य योगाच्या प्रयोगाचें त्यांनीं निरीक्षण केलें. विनोबाजींशीं त्यांची विविध प्रश्नांवर चर्चा झाली. विनोबाजींच्या वैज्ञानिक गणिती बुद्धि, व्यावहारिक कार्यकुशलता आणि भावनाशीलता यांचा जयप्रकाशांच्या मनावर खोल ठसा उमटला. विनोबाजींनीं रहाटावर कर्ममय प्रार्थना सुरू केली होती. पाण्याचा आणि भक्तीचा प्रवाह वाहात होता. जय-प्रकाशजींहि विनोबांच्या बरोबर रहाटाला भिडले. रहाट फिरत होता, विचारचक्राहि फिरत होतें. हा काटकुळा मनुष्य एवढा उद्यम कशा-साठीं करीत आहे ? शेतकरी हा देशांतील क्रांतीचा आधार, त्या शेतकऱ्याच्या जीवनाचा शास्त्रशुद्ध विचार तेथें चालला होता. प्रयो-गांतून विचार अजमावण्यांत येत होते.

प्रार्थनेनंतर विनोबाजींचें भावस्पर्शी भाषण झालें. विनोबा म्हणाले: "जयप्रकाशजी आज आमच्या आश्रमांत उपस्थित झाले आहेत ही फार आनंदाची गोष्ट आहे. आम्हां भारतीयांचें एक विशाल कुटुंब आहे. त्यांत पांच पांडवाप्रमाणें आम्ही राहतों. हिंदुस्थान देश मोठा, त्यामानानें त्याचे प्रश्नहि मोठे आहेत. त्यांची चिंता आम्हां सर्व भाऊ भाऊ मिळून करतों. प्रश्न मोठे त्यामुळें ते सोडविण्याच्या

बाबतींत मतभिन्नता असणें अगदीं स्वाभाविक आहे. एकीकडे साऱ्या देशाची जबाबदारी वाहणारे जवाहरलालजी आहेत. त्यांचे स्वतःचे कांहीं सिद्धान्त आहेत त्याप्रमाणें ते आपलें धोरण व कार्यपद्धति ठरवतात. दुसरीकडे कृपलानीजी आहेत. त्यांनाहि देशांत शुद्धता हवी आहे. तेहि आपल्यापरी काम करीत आहेत. तसेंच जयप्रकाशजी. आपल्यापरीनें आपल्या सिद्धान्तानुसार तेहि काम करीत आहेत. देशाच्या सेवेसाठीं तळमळत व कष्टत आहेत. आपल्या तत्त्वाप्रमाणें गरिबांचें दुःख दूर करण्याचा ते प्रयत्न करीत आहेत. किशोरलाल भाईसारखे सर्वोदयवादी आपल्या विचारानुसार मार्गदर्शन करीत आहेत.

" मी विचार करतों तेव्हां मनांत येतें कीं आम्ही गरिबांच्या सेवेला लागलेले लोक संख्येनें किती थोडे आहोंत ! आमच्या विचारांतहि फार फरक नाहीं ज्या गोष्टींच्या बाबतींत आमचें मतैक्य आहे त्या गोष्टी आम्हीं समाजापुढें ठेवाव्या. आतां पुढें निवडणुका येत आहेत. समजा जयप्रकाश व मी निवडणुकीला उभे राहिलों असें असून एका रहाटावर आम्ही काम करतों, एका ठिकाणीं जेवतों, फक्त निवडणुकीला वेगळे उभे आहोंत असें दृश्य दिसलें तर निवडणुकीचा ज्वर निर्माण होण्याचें काय कारण ? ज्याला निवडायचें त्याला जनता निवडील. निवडणूक शांततेनें आणि शुद्ध भावनेनें पार पडेल. निवडणूक हाहि खेळ समजून तींत खेळाडू वृत्तीनें आम्हीं भाग घेतला पाहिजे आणि एकमेकांवरील प्रेम कायम ठेवलें पाहिजे. समाजांत आंतरिक प्रेमाचा जो धागा आहे तो तुटूं देतां कामा नये.

" ईश्वर माझ्यापासून कोणतें काम घेऊं इच्छितो याबद्दल जेव्हां मी विचार करतों तेव्हां मला वाटतें कीं तो माझ्यापासून स्नेहवर्धनाचें काम करून घेऊं इच्छित आहे."

जयप्रकाशजी वर्ध्याच्या परिसरांत दीडदोन दिवसच होते. पण त्या वास्तव्याचा परिणाम त्यांच्यावर फार झाला. समाजवाद मान्य असणारांचीं उद्दिष्टें व गांधीजींचीं आर्थिक उद्दिष्टें जवळ जवळ सारखींच आहेत. या गोष्टीचा प्रत्यय जयप्रकाशांना आला. गांधीजी अर्थशास्त्रज्ञ नसले तरी शोषणरहित सहकार्याधिष्ठित समाज निर्माण करण्याच्या प्रश्नाचा अगदीं स्वतंत्र व मूलग्राही बुद्धीनें त्यांनीं विचार केला तसा दुसऱ्या कोणाहि अर्थशास्त्रज्ञानें केला नाहीं. त्यांनीं या बाबतींत अलौकिक प्रतिभा दाखविली आहे असें त्यांना वाटतें.

वर्ध्याच्या ह्या आपल्या भेटीबाबत जयप्रकाशांनीं लिहिलें आहे. "हस्तव्यवसायाशिवाय तूर्त तरी पूर्ण रोजगार देणें अशक्य आहे. या दृष्टीनें विनोबांचा चरख्याचा आग्रह चुकीचा म्हणतां येणार नाहीं. उत्पादन वाढविण्यासाठीं प्रत्येक नागरिकानें नित्य शरीरश्रम करणें आवश्यक आहे असें मलाहि वाटूं लागलें आहे. अशा श्रमाचा पर्याय शोधून काढून आम्हीं तो निष्ठापूर्वक आचरला तरच शोषण-रहित, समताधिष्ठित, समृद्ध समाजाची घोषणा सफल होईल. मी दीड दोन दिवसच वर्ध्याला होतों, पण तेथें मीं जें पाहिलें तें आशादायी, आश्वासक व अनुकरणीय होतें."

विनोबाजींसारखे क्रांतिकारी सर्वोदयाच्या दृष्टीनें जे प्रयोग करीत आहेत त्यांची समाजवाद्यांनीं कदर करावी, महत्त्व समजून घ्यावें अशी जयप्रकाशांना तळमळ होती. महात्मा गांधींनीं मागें ठेवलेली परंपरा व प्रेरणा विसरून किंवा तिच्याकडे डोळेझाक करून भारताला समाजक्रांति करणें अशक्य आहे असें जयप्रकाशांचें मत बनलें. लेखणीबहादर हसले, या आदरयुक्त सहिष्णुतेबद्दल जयप्रकाशांची त्यांनीं टवाळी केली तरी झालेलें सत्यदर्शन त्यांनीं निःसंदिग्धपणें देशापुढें मांडलें. विनोबाजी, कुमारप्पा किंवा अण्णा-

साहेब सहस्रबुद्धे यांनीं चालविलेले प्रयोग समाजवाद स्थापन करण्याच्या दृष्टीनें महत्त्वाचे आहेत, त्यांची उपेक्षा करून चालणार नाहीं ही जाणीव जयप्रकाशांनीं सर्वांना करून दिली. सर्वोदय, विचारक आणि समाजवादी यांच्या उद्दिष्टांत साम्य असल्यानें पुष्कळ मोठा टप्पा हातांत हात घालून ते गांठूं शकतील असें जयप्रकाशजी सांगूं लागले.

निवडणुकी जवळ आल्या तसतशी सर्वांची दृष्टि आणि शक्ति त्यावरच केंद्रित झाली. सारें वातावरण निवडणुकींच्या घोषणांनीं भारून गेलें. स्वत: जयप्रकाश कुठेंहि उमेदवार नव्हते. शासनशक्तीचें महत्त्व मर्यादित असल्यानें सर्वोत्कृष्ट माणसांनीं जनसंघटनेचें काम सोडून शासन-यंत्रांशीं जुंपून घेणें देशहिताला घातक ठरेल हें त्यांनीं ओळखलें. शासन-यंत्राला वाकविण्याचें सामर्थ्य जनशक्तींत असल्यानें जनशक्ति प्रभावी व संघटित करणें हें त्यांना आवश्यक वाटत होतें. परंतु शासन—यंत्राचा मर्यादित प्रभावहि जयप्रकाशांनीं उपेक्षिला नाहीं. समाजवादी उमेवारांसाठीं त्यांनीं देशभर दौरा काढला.

'निवडणुका लढण्याऐवजीं खेळाडूपणानें खेळा' असें विनोबाजींनीं जयप्रकाश त्यांच्या आश्रमांत गेले त्या दिवशींच्या प्रार्थना-प्रवचनांत सांगितलें होतें. लढतांना अपयश आलें कीं, पुन्हा दुसऱ्या लढाईचें बीजारोपण होतें. द्वेषानें द्वेष वाढत जातो. परंतु खेळांतला पराजय हा उत्साहाला कारणीभूत होतो. प्रतिपक्षाचें गुणग्रहण व आत्म-परीक्षण यांना प्रवृत्त करतो. सार्वत्रिक निवडणुकांतील पराजयानें जयप्रकाश अधिक अंतर्मुख झाले. त्यांचा उत्साह मावळला नाहीं. कार्याची तीव्रता मात्र वाढत गेली.

निवडणुकांची धामधूम चालू असतांनाहि विनोबाजींचें भूदान-कार्य एकाकी चालू होतें. कार्यकर्ते निवडणुकींत गुंतले असल्यानें

ठाणे. स्थल
२०१८९
क्रमांक ... नों: दिः ...

विनोबाजींनीं भूदान-पदयात्रा स्थगित करावी असा सल्ला त्यांना देण्यांत आला होता. पण विनोबा थांबले नाहींत. ‘ चरैवेति चरैवेति ’ हा त्यांचा मंत्र होता. विनोबाजींच्या ह्या एकाग्रतेनें जयप्रकाशजी त्यांच्याकडे आकर्षित झाले.

निवडणुकीनंतर जयप्रकाशजींनीं पुण्याच्या नेचरक्युअर क्लिनिकमध्यें एकवीस दिवसांचें उपोषण आरंभलें. १९४६ सालीं जयप्रकाशांनीं त्या वेळचे पोस्ट–खात्याचे मंत्री श्री. किडवाई यांची पोस्टमनांच्या गाऱ्हाण्यांची दाद लावून घेण्यासाठीं भेट घेतली होती. पोस्टमनांनीं संप केला त्या काळचा पगार त्यांना देण्यासंबंधीं वाटाघाटी झाल्या. मंत्र्यांनीं तो पगार देण्याचें आश्वासन दिलें अशी जयप्रकाशांची समजूत. त्यांनीं मंत्र्यांकडून लेखी घेतलें नाहीं. त्यामुळें पुढें वाद निर्माण झाला. अशा वेळीं सत्य ओळखायचें कसें ? पण या प्रकरणांत पोस्ट-कामगारांचें निष्कारण नुकसान होत होतें. आपली कार्यक्षमता कमी पडली हाच त्याचा अर्थ. नेतृत्वपदीं आरूढ असणाऱ्यानें सतत दक्ष असलें पाहिजे. त्याच्या बारिकसारीक चुकीचे परिणाम फार मोठे असतात. जयप्रकाशांच्या मनांत ही भावना प्रबळ झाली. त्यांनीं उत्तर प्रदेशांत विनोबाजींच्या पडावावर जाऊन आपली व्यथा व्यक्त केली. उपवासासंबंधीं त्यांच्याशीं सल्लामसलत केली.

२३ जून १९५२ पासून हें उपोषण सुरू झालें. जयप्रकाशांच्या उपवासानें साऱ्या देशाचें लक्ष वेधलें गेलें. उपवासासंबंधीं जयप्रकाशांनीं निवेदन केलें त्यांत ते म्हणतात : “ हें उपोषण कोणाविरुद्ध नाहीं. आत्मशुद्धीसाठीं हा उपवास आहे. माझें शरीर, बुद्धि व मन अधिक निरोगी, सावधान व सत्यनिष्ठ व्हावें हाच उद्देश आहे.” जयप्रकाशांनीं रागद्वेषरहित बुद्धीनें हें तप आचरिलें. आत्मपरीक्षणांत त्यांनीं हा काळ घालविला.

जयप्रकाशजींच्या ह्या उपवासाचा परिणाम सर्वत्र झाला. विनोबांनीं पत्र पाठवून सद्भावना व्यक्त केली. स्वातंत्र्योत्तर काळांत उपवासाच्या शस्त्राचा वेळींअवेळीं वापर करण्यांत आला; परंतु इतक्या निर्दोष उपवासाचें दुसरें उदाहरण सांपडणार नाहीं असें त्यांनीं लिहिलें. गांधीजींचे व्यक्तिगत चिटणीस असलेल्या प्यारेलालजींनीं 'हरिजन'-मध्यें मुद्दाम अग्रलेख लिहून उपवासाची प्रशस्ति केली. 'समाजांतील वैरभाव शमविण्याचें अशा प्रकारचें निर्हेतुक उपोषण हें साधन आहे' असें त्यांनीं लिहिलें.

◆◆ ◆◆ ◆◆

## समाजवादाचा किमान कार्यक्रम

सबंध देशाचें ज्याला दर्शन घडलें त्याला दैन्यदारिद्र्यानें व्यथित केलें नाहीं तरच आश्चर्य. भूदानपद यात्रेच्या निमित्तानें विनोबांना देशाचें दर्शन घडत होतें. पक्षोपपक्षांची एकमेकांबद्दलची तीव्रता पाहून त्यांना वाईट वाटे. राष्ट्रीय आपत्तींच्या प्रसंगीं तात्कालिक सहकार्य करण्याला आपण तयार असल्याचें वेगवेगळ्या पक्षांचे नेते बोलत. विनोबा त्यांना उद्देशून म्हणत: "राष्ट्रीय आपत्तींच्या वेळीं सहकार्य करण्याला आपण तयार असल्याचे वेगवेगळे पक्षनेते बोलतात. देशांतील गरिबी, विषमता, अज्ञान हीं काय लहानसहान आपत्ति आहे? या आपत्तीला सर्वांनीं मिळून तोंड देण्याचें सोडून सहकार्याची वेळ यावी म्हणून आणखी एखाद्या नव्या राष्ट्रीय आपत्तीला आवाहन करण्याची काय गरज?" विनोबाजींच्या मनांत ही भावना कांहीं नवी नाहीं. 'गांधी आणि मार्क्स' या किशोरलाल मश्रुवालांच्या पुस्तकाला लिहिलेल्या प्रस्तावनेंत ते म्हणतात :"आजचें कॉंग्रेस सरकार गांधींच्या सहकाऱ्यांचें आहे. देशांतील सर्वांत मोठी संघटना कॉंग्रेस तीहि गांधीजींनींच वाढविलेली आहे. सर्वोदयवाले रचनात्मक कार्यकर्ते तर गांधीविचाराचे बिरुद मिरवणारे आहेत. हिंदुस्थानचे समाजवादी देखील गांधीजींचींच मुलें आहेत आणि या देशांत सत्याग्रही समाजवाद स्थापन करण्याची त्यांची प्रतिज्ञा आहे. ते दोघे, तिघे, चौघे एकवटून आपआपल्या शक्ति व वळणानुसार सहविचारानें जनतेच्या सेवेस भिडले तर दैन्य, दुःख, दारिद्र्य कोठें

तोंड दाखवूं शकेल ? पण या चौघांनीं आज चार वाटा धरल्या आहेत आणि तो पांचवा धावून येत आहे. कोण तो पांचवा ? उपनिषदांच्या भाषेंत : मृत्योर्धावति पंचमः— तो पांचवा मृत्यु धावत येत आहे. " सज्जनांचें सहकार्य होत नाही यामुळें विनोबांना वेदना होत होती. त्यांची वेदना देशांत एक वातावरण निर्माण करीत होती. निवडणुकींतील पराजयानें समाजवादी अंतर्मुख आणि नम्र बनले होते. पंडित जवाहरलाल नेहरूंनीं काँग्रेस पक्षाच्या वतीनें निवडणुकींत धवघवीत यश संपादन केलें होतें. परंतु आटापिटा करून निवडून आणलेल्यांपैकीं नवविचारांचा स्पर्श झालेले व नवसमाज-निर्मितीसाठीं धडपडणारे फारच थोडे. या घटकांच्या सहकार्यानें पंचवार्षिक योजना व राज्य-घटना यांत उद्घोषित केलेला समाज निर्माण करणें त्यांना कठीण वाटत होतें.

काँग्रेसच्या हातीं सत्ता आली पण राष्ट्र-संजीवनाची शक्ति तिच्यांत दृग्गोचर होत नव्हती. मनीं मंत्र आहे पण हातीं तंत्र नाहीं अशी समाजवाद्यांची स्थिति. ध्येयदृष्टीनें नेहरूंना जे जवळचे ते समाजवादी दुरावले होते. नेहरूंनंतर राष्ट्राचें ऐक्य सांभाळूं शकणारी कोणतीहि शक्ति काँग्रेसमध्यें नव्हती. जयप्रकाशांच्या संयमशील उपवासानें नेहरूंचेंहि हृदय हाललें. त्या वेळीं त्यांनीं संदेश पाठविला होता. रंगूनमध्यें आशियायी समाजवाद्यांची परिषद भरली होती आणि पुरोगामी शक्ति आशियांत संघटित होत होत्या. भारतीय समाजवादी पक्षानें या शक्ति संघटित करण्यांत फार मोठी कामगिरी बजावली होती. जयप्रकाशांनीं ह्या परिषदेचें नेतृत्व अत्यंत धीरोदात्तपणें केलें होतें. विधायक कार्यकर्त्यांशीं जयप्रकाश प्रभृतींचें अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले होते. भूदान-यज्ञामुळें विनोबांचा प्रभाव वाढत होता. नेहरूंच्या नेतृत्वाखालीं सत्ताधिष्ठित

झालेले राष्ट्रवादी आणि आर्थिक व सामाजिक समतेसाठीं लोकशाही मार्गानें झगडणारे समाजवादी यांचें सहकार्य व्हावें अशी विनोबांनीं प्रदर्शित केलेली इच्छा डावलणेंहि सोपें नव्हतें. त्यामुळें जवाहरलाल-जींनीं जयप्रकाशांना भेटीसाठीं निमंत्रण धाडलें. अन्य व्यवधानांमुळें १९५३ सालच्या फेब्रुवारीपर्यंत त्यांची गांठभेट होऊं शकली नाहीं.

फेब्रुवारी १९५३ मध्यें जयप्रकाशजी व पंडित नेहरू यांच्यांत वाटाघाटी सुरू झाल्या. अत्यंत निर्भीडपणें पण स्नेहपूर्ण वातावरणांत ह्या वाटाघाटी झाल्या. वाटाघाटी बराच काळ चालल्या तरी त्या यशस्वी झाल्या नाहींत. जयप्रकाशजींचा आग्रह होता कीं कार्यक्रमाबाबत एकमत असल्याखेरीज सहकार्याचा देखावा उभा करण्यात हंशील नाहीं; तर नेहरूंचें मत असें होतें कीं किमान कार्यक्रम ठरविण्याची वेळ अद्याप आलेली नाहीं. वाटाघाटी निष्फळ ठरल्या तरी कटुता निर्माण होऊं नये म्हणून उभयतांनीं दक्षता घेतली.

पं. नेहरूंनीं ह्या सहकार्यापूर्वी प्रजा–समाजवादी पक्ष काँग्रेस-मध्यें विलीन करण्याची मागणी केली नव्हती. पक्ष स्वतंत्रपणें कार्य करीत राहावा याला त्यांची मान्यता होती. वाटाघाटी अयशस्वी झाल्यावर त्यांनीं जें पत्रक काढलें त्यांत त्यांनीं म्हटलें होतें : " राजकीय व आर्थिक कार्यक्रमावर आधारलेल्या पक्षांत काँग्रेस वगळल्यास प्रजा–समाजवादी पक्षच महत्त्वाचा आहे. इतर कितीहि मतभेद दोघांत असले तरीहि त्यांच्यांत बरीच समान भूमिका आहे. त्यांच्यांतील सहकार्याचें क्षेत्र व्यापक व्हावें असें मला वाटतें. जातीयता विरोध आणि नवरचना कार्यासाठीं उत्साह निर्माण करण्यांत समाजवाद्यांनीं सहकार्य करावें असें मला वाटतें. " अर्थात् किमान कार्यक्रम मान्य करण्याची त्यांची तयारी नव्हती.

जयप्रकाशांनींहि ह्या वाटाघाटीबाबत निवेदन प्रकाशित केलें. विधिमंडळांत प्रचंड बहुसंख्येनें काँग्रेस उमेदवार निवडून आले असूनहि पं. नेहरूंनी सहकार्यासाठीं हात पुढें केल्याबद्दल त्यांनीं प्रथम संतोष व्यक्त केला. संक्रमण-काळ आणि समाजस्थित्यंतराची निकड यामुळें असें सहकार्य करणें इष्ट होईल असें जयप्रकाशांना वाटलें. परंतु किमान कार्यक्रमाशिवाय असें सहकार्य निष्फळ ठरेल असेंहि त्यांनीं आरंभींच सांगितलें.

किमान कार्यक्रम सुचविणारें जें पत्र नेहरूंना जयप्रकाशांनीं पाठविलें तें पत्र हा एक ऐतिहासिक दस्तऐवज आहे. नेहरूंच्या एकूण धोरणासंबंधीं त्यांत निर्भीडपणें विचार मांडले आहेत. त्यांत ते म्हणतात : " समाजवादी पुनर्रचना करावयाची तर जागरूक प्रयोगशीलता व स्वतंत्र प्रज्ञा आवश्यक आहे याची आम्हांला पूर्ण जाणीव आहे. आमचा दृष्टिकोन शब्दप्रामाण्यवादी व सनातनी नसून स्वतंत्र वृत्तीचा व डोळस आहे. आर्थिक व सामाजिक समतेवर आधारलेला व्यक्तिस्वातंत्र्य व विकास यांची हमी देणारा शोषण-रहित समाज आम्हांला निर्माण करावयाचा आहे. यासाठीं धडाडीचा कार्यक्रम निश्चित केला पाहिजे. त्याशिवाय जनतेंत नवरचनेसाठीं उत्साह निर्माण करतां येणार नाहीं. गांधीदर्शनाचा मला नव्यानें प्रत्यय येऊं लागला आहे. नवराष्ट्र-निर्मितीच्या कार्यांत त्यांच्यापासून शिकण्यासारखें आहे.

न्यायप्रस्थापनेची तळमळ व गतिमानता गांधीजींच्यामध्यें अपार होती. आज सरकारी तंत्रांत गांधीजी फक्त जयजयकारापुरते आहेत. त्यांच्या तत्त्वांना त्यांत स्थान नाहीं. आशिया, आफ्रिका यांच्यासमोर भारत व चीन हे दोन आदर्श आहेत. अशा परिस्थितींत केवळ कल्याण राज्याच्या घोषणांनीं भागणार नाहीं. आपण कांहीं विशेष कर्तबगारी

दाखविली पाहिजे तरच लोक आपल्याकडे आकर्षिले जातील आणि या महान् खंडांतील राष्ट्रांत शांततापूर्ण परिवर्तनें घडून येतील. पण जर आपण कांहीं करूं शकलों नाहीं तर ह्या राष्ट्रांना चीनच्या मार्गाचा मोह पडेल आणि कोट्यवधि लोकांना अनंत यातनांच्या खाईत आपण लोटून दिलें असें होईल. परदेशांतून लोक भारतांत येतात आणि स्तुतिसुमनें उधळतात त्यानें हुरळून जाण्यासारखें नाहीं. त्यांच्या बोलण्यामागचें रहस्य आपण ओळखलें पाहिजे. हिंदुस्थान हें एक अत्यंत मागासलेलें राष्ट्र आहे अशा समजुतीनें हे लोक येथें आलेले असतात. त्या पार्श्वभूमीवरून ते शेरे देतात. त्यांनीं भाळून जाणें योग्य नाहीं. पूर्व-पाश्चिमेची प्रगति जेथें कुंठित झाली तेथून आपल्याला नवसमाजाची वाट-चाल सुरू करायची आहे.

" तुम्ही जें सहकार्य मागतां तें केवळ संमिश्र मंत्रिमंडळ बनविण्यासाठीं नसून, नवसमाज-निर्मितीच्या महान् कार्यांत खांद्याला खांदा लावून नवीन श्रद्धेनें आपण व आपल्या मागें सर्व राष्ट्रानें कंबर बांधून उभें राहावें यासाठींच आपण ही सहकार्याची सूचना केली आहे असें मी मानतों. लोकशाही पक्षांनीं एकत्र यावें ही राष्ट्राची इच्छा आहे हें खरें; पण जर त्यांचें दैन्यदारिद्र्य हरण करण्यांत आपण असमर्थ ठरलों तर साऱ्या राष्ट्रांत भीषण विफलता बोकाळेल. या वैफल्यांतून जी अंदाधुंदी बोकाळेल तिला मग आवर घालतां येणार नाहीं. ऐक्याची आवश्यकता तुम्ही वारंवार प्रतिपादन करतां, पण हें ऐक्य गतिमान् स्थितींत आपल्याला कायम ठेवायचें आहे ही गोष्ट विसरतां कामा नये. किमान कार्यक्रमाशिवाय असें ऐक्य दुरापास्त आहे. नव्या आर्थिक व सामाजिक ध्येयाकडे आपण पुढें गेलों तरच ऐक्यवर्धक शक्तींचा परिपोष होईल. अशा प्रयत्नांतून जी सामूहिक भावना व वृत्ति निर्माण होईल तीच विसंघटक व विद्रोही शक्तींचा बीमोड करूं शकेल.

" सहकार्य कशासाठीं हा प्रश्न महत्त्वाचा आहे. नवराष्ट्र–निर्मितीचें कार्य त्वरेनें करावयाचें या निश्चयानें एकत्र येऊन कांहीं प्रयोग आपण करणार असलों तरच त्यांत कांहीं स्वारस्य आहे. जर तुमचीं आमचीं उद्दिष्टें एकच असतील, त्याचें तुम्हांआम्हांला सारखेंच अगत्य व निकड भासत असेल तरच सहकार्याचा विचार करण्यांत कांहीं हंशील. जर तसें नसेल तर हीं बोलणीं थांबविलेलीं बरी. "

जयप्रकाशजींनीं विचारार्थ एक चौदा कलमी कार्यक्रमहि सादर केला होता. हा किमान कार्यक्रम म्हणजे समाजवादाच्या दिशेनें राष्ट्राचीं पावलें पडूं लागलीं आहेत याची निशाणी ठरली असती. समाजवादी मार्गावरचें पहिलें पाऊल कसें पडावें याचा स्वच्छ निर्देश या कार्यक्रमांत आहे. समाजवादी समाजरचनेकडे प्रगति होत आहे कीं नाहीं हें या कार्यक्रमाच्या कसोटीवर घासून ठरवितां येईल.

१—घटना दुरुस्ती : ( अ ) संस्थानिक व सनदी नोकर यांना दिलेली घटनात्मक संरक्षणें काढून घ्यावीं. ( ब ) वरिष्ठ विधिमंडळें बंद करावीं.

२—( अ ) विकेंद्रीकरणाच्या दृष्टीनें राज्ययंत्रांत सुधारणा करावी.

( ब ) न्यायदान-पद्धतींत या दृष्टीनें योग्य तो बदल घडवून आणावा. लांचलुचपतीला प्रतिबंध करण्यासाठीं जालीम उपायांचा अवलंब करावा.

३—( अ ) भाषा, राज्यकारभार व आर्थिक स्वयंपूर्णता यांच्या दृष्टीनें सर्व प्रांताचीं पुनर्रचना करावी. ( ब ) राज्यपाल हायकोर्टें प्रत्येक राज्यासाठीं स्वतंत्र न ठेवतां सामाईक करून राज्यकारभारांतील खर्चिकपणा कमी करावा.

४—( अ ) जमिनींचें फेरवांटप करावें. ( ब ) तुकडेबंदी करावी. ( क ) जमीनदारी प्रथा नामशेष करावी. ( ड ) सहकारी पद्धतीची ग्रामव्यवस्था निर्माण करण्यासाठीं कायदे करावे. ( इ ) शेतीच्या पुनर्रचनेसाठीं कर्जाची व्यवस्था करावी.

५—पडित जमिनी लागवडीखालीं आणाव्या.

६—बँका व इन्शुरन्स कंपन्या यांचें राष्ट्रीकरण करावें.

७—स्टेट ट्रेडिंगचा विकास करावा.

८—कांहीं निवडक कारखाने मजुरांच्या सामाईक मालकीचे करण्याच्या दृष्टीनें प्रयत्न करावा.

९—मजूर-संघटनांची बजबजपुरी थांबविण्यासाठीं युनियन शॉप—एका धंद्यांत एक संघटना ह्या तत्त्वावर मजूर-संघटना चालवाव्या.

१०—कोळसा, लोखंड व अन्य खनिजांच्या खाणींचें राष्ट्रीकरण करावें.

११—सरकारी मालकीच्या कारखान्यांच्या व्यवस्थेंत कामगारांना प्रतिनिधित्व द्यावें,

१२—छोटे धंदे व कारखानदारी उत्पादन यांचीं क्षेत्रें निश्चित करून छोट्या धंद्यांना संरक्षण द्यावें.

१३—आर्थिक समतेच्या मार्गावरचें पहिलें पाऊल म्हणून वरिष्ठ सरकारी नोकरांचे पगार कमी करावे.

१४—स्वदेशीची प्रवृत्ति राष्ट्रांत वाढीस लावावी.

ह्या चौदा कलमी कार्यक्रमाला जर मान्यता मिळाली असती तर राष्ट्रांत नवसमाज-रचनेचा जोम संचारला असता. परंतु पं नेहरूंना या अटी स्वीकारणें अशक्य वाटलें व ह्या वाटाघाटी संपल्या.

* * *

वाटाघाटी संपल्या. कार्यक्रमाला नेहरू कबूल झाले नाहींत, यामुळें देशांत थोडी निराशा पसरली. परंतु किमान कार्यक्रमाखेरीज सहकार्य करण्यांत अर्थहि नव्हता. दंडशक्तीच्या आधाराशिवाय समाजपरिवर्तनाची ऊर्मि राष्ट्रांत जागृत करण्यासाठीं विनोबाजी भूदान-यज्ञ चालवीत होते. समतेच्या भावनेची जोपासना करणारें व नव-जागृति आणणारें हें आंदोलन वाढविलें पाहिजे असें जयप्रकाशजींच्या मनानें घेतलें. ह्या समाजक्रांतींत सहभागी होण्याचें ठरवून पक्षांतील आपलें लक्ष त्यांनीं मर्यादित केलें.

राजकीय पक्षांचें जनतेवरील प्राबल्य दिवसेंदिवस वाढत आहे. राजकीय पक्ष जनतेला परावलंबी बनविण्याचा प्रयत्न करीत आहे. सत्ताधारी व सत्ताकांक्षी दोन्ही पक्ष सत्तेशिवाय कांहीं घडूं शकत नाहीं असें तत्त्वज्ञान अप्रत्यक्षपणें जनमनांत रुजवींत असतात. सगळ्या तत्त्व-ज्ञानांचें अंतिम साध्य शासन व शोषणमुक्त समाजाची स्थापना हेंच असलें तरी स्वतःचें अस्तित्व अटळ राहावें असाच त्यांचा प्रयत्न असतो, त्यामुळें शासनरहित व शोषणरहित समाजरचना हें एक स्वप्नच राहतें. त्याऐवजीं शासनरहिततेची वाटचाल क्रमाक्रमानें चालूं लागलें तर तें ध्येय कधींकाळीं तरी साध्य होण्याची आशा निर्माण होईल. शासनमुक्त समाज म्हणजे स्वयंशासित समाज-शासनाची कक्षा कमी करीत सहकार्याची कक्षा वाढवींत गेलें म्हणजे ध्येयाची वाटचाल सुरू होईल. निदान ग्रामीण जीवनांत तरी पक्षीय राजकारण आणूं नये या दृष्टीनें जयप्रकाशजींनीं समाजवादी पक्षाचें धोरण आंखलें. ग्राम-पंचायतींच्या निवडणुकांत पक्षांनीं आपले उमेदवार उभे करूं नये असें त्यांच्या पक्षानें ठरविलें. कॉंग्रेसनेंहि ह्या तत्त्वाला मान्यता दिली आहे.

जयप्रकाशजी भूदानांत भाग घेऊं लागले. क्रांतीसाठीं पक्षाकडील लक्ष त्यांनीं कमी केलें. कांहीं मंडळींना वाटलें जयप्रकाशजींनीं आतां

पक्षाचा त्याग केला तर बरें होईल. पण जयप्रकाश समाजवादी पक्षाचे सभासद राहिले आहेत. विनोबांना याविषयीं प्रश्न विचारला तेव्हां विनोबा म्हणाले : "जयप्रकाश प्रजासमाजवादी पक्षाचे सभासद आहेत. त्यांनीं राजीनामा देण्याची आवश्यकता नाहीं. आपल्या पक्षाला आपल्याबरोबर आणण्याचा प्रयत्न ते करतील." भूदानाच्या क्रांतिकार्यांत समाजवाद्यांनीं उत्साहानें भाग घ्यावा असें विनोबांना वाटतें. हें काम तर त्यांचेंच आहे असेंहि ते म्हणतात. सेनापतीच्या मागें सैनिक येत नसल्याची खंतहि त्यांनीं भाषणांतून व्यक्त केली आहे. जयप्रकाशजींहि या कार्यासाठीं आपल्या मित्रांना आवाहन करीत असतात.

◆◆ ◆◆ ◆◆

# चिंतन

जयप्रकाशजींच्या चिंतनाची दिशा समजून घ्यायची तर त्यांनीं केलेलें प्रकट चिंतनच साहाय्यभूत होईल. ते म्हणतात :

आपल्या हातीं सत्ता यावी असें समाजवाद्यांना वाटतें. पण जर आमच्याजवळ नैतिक मूल्यें नसतील तर केवळ सत्ता हातीं आली म्हणून चांगला समाज आम्हांलाहि निर्माण करतां येणार नाहीं. समाजवादाच्या घोषणा करणारेच त्याचा खेळखंडोबा करतील, त्याला बदनाम करतील. आज आपल्या डोळ्यांदेखत हें घडत आहेच. माझें जें हृदयमंथन आज चाललें आहे तें समाजवादापासून पळ काढण्यासाठीं चाललेलें नाहीं यावर विश्वास ठेवा. समाजवादाची प्रस्थापना लौकरांत लौकर आणि उत्तम अर्थानें व्हावी यासाठींच माझी सारी धडपड चालली आहे.

समाजांतलें शोषण कसें नाहींसें होईल हा खरा प्रश्न आहे. शोषण-रहित समाजांत श्रमिकाला आपल्या श्रमांचा पूर्ण मोबदला मिळाला पाहिजे. जेव्हां लहान उद्योगधंदे घरोघर चालू लागतील आणि मोठ्या उद्योगधंद्यांवर काम करणारांची मालकी प्रस्थापित होईल तेव्हांच शोषणाचा अंत होईल. यालाच आर्थिक विकेंद्रीकरण म्हणतात. राजकीय सत्तेचेंहि अशाच प्रकारें विकेंद्रीकरण करावें लागेल. त्यासाठीं खेडीं स्वावलंबी व स्वयंपूर्ण बनवावीं लागतील.

आज सगळीकडे स्वार्थपरायणता दिसते. माणसाचा हा स्वभाव बदलला पाहिजे. त्याला परार्थ पाहायला शिकविलें पाहिजे. यासाठीं जीवनमूल्यें बदलावीं लागतील. जीवनमूल्यें बदलायचीं याचाच अर्थ

व्यक्तीला बदललें पाहिजे. जर व्यक्ति बदलली नाहीं तर एक वेळ शोषण बंद केलें तरी तें पुन्हा डोकें वर काढील. पण जर व्यक्ति बदलली तर एकदां बंद झालेलें शोषण सहसा पुन्हा डोकें वर काढणार नाहीं. ह्यासाठीं हजारों लाखों व्यक्तींच्या जीवनांत क्रांति करावी लागेल, नव्या मूल्यांची त्यांना दीक्षा द्यावी लागेल. हिंदुस्थानांतील कोट्यवधि लोकांचा जमिनीशीं निगडित संबंध आहे. भूदान-यज्ञामुळें ह्या कोट्यावधि लोकांच्या जीवनांत प्रवेश करतां येईल.

जी साधनसामग्री समाजांत आहे ती कोणा एकाच्या मालकीची नाहीं. साऱ्या समाजाची त्यावर मालकी आहे. ही गोष्ट समजल्या-शिवाय समजांतली स्वार्थी वृत्ति जाणार नाहीं. परस्परांचें हित पाहण्याची व त्यासाठीं झटण्याची प्रेरणा निर्माण होणार नाहीं. समाजवाद म्हणजे शेवटीं सारे समाजाचे ही भावना वाढविणें भूदानाच्या रूपानें विनोबा ही गोष्ट आज शिकवीत आहेत. यांत गुरूची दृष्टि आहे. गुरुजी आधीं सोपीं अक्षरें शिकवितात, मग जोडाक्षरें, मग शब्द, त्याचप्रमाणें टप्प्याटप्प्यानें विनोबा ही वृत्ति जीवनाच्या सर्व क्षेत्रांत लागू करूं पाहतात. उद्योगधंदे, कारखाने यांच्या बाबतींत एक वेळ मनुष्य म्हणूं शकेल कीं, आमच्या मेहनतीनें आम्हीं हें उभारले. त्यांचा हा विचार बरोबर नसला तरी तसा विचार मनुष्य करूं शकेल. पण जमिनीच्या बाबतींत तसें कांहींच म्हणतां येण्यासारखें नाहीं. जमीन कांहीं कोण्या माणसानें निर्माण केलेली नाहीं ! जो कसेल त्याची तेवढ्या काळापुरती जमीन असावी हें सहज समजूं शकेल. पूर्वीच्या काळीं सुद्धां असेंच होतें. जमिनीवर साऱ्या गांवाची मालकी असे आणि गांवच्या लोकसंख्येच्या प्रमाणांत तिचें दर पिढीला वांटप होत असे. हा धडा पटला कीं, मग उद्योगधंदे, कारखाने यांचीं जोडाक्षरें वाचतां येतील.

कोणीहि मनुष्य एकटा संपत्ति निर्माण करूं शकत नाहीं. अनेकांच्या सहकार्यानें संपत्ति निर्माण होत असते. कापड-धंद्याचें उदाहरण घेऊं या. कापूस निर्माण करणाऱ्या शेतकऱ्यापासून तों विणणाऱ्यापर्यंत कितीतरी लोकांचा हातभार त्यासाठीं लागतो. त्या सर्वांच्या सहकार्यातून ती संपत्ति निर्माण होते. जर डॉक्टर, वकील, कारखानदार यांना आपण संपत्ति निर्माण केली, आपणच तिचे मालक असें वाटत असेल तर त्यांनीं जंगलांत जाऊन बसावें आणि दाखवावी संपत्ति निर्माण करून. संपत्ति हें शेवटीं सहकार्याचें फळ आहे. मग एखाद्यानेंच आधाशीपणानें तिचा उपभोग घेणें गैरच म्हणावें लागेल. जें आहे तें सारें समाजाचेंच हीच भावना शेवटीं टिकते.

गरीब संघटित होतील तेव्हांच समाज बदलेल आणि त्यासाठीं हिंसेचा उपयोग करावाच लागेल असें कांहींना वाटतें. हिंसेनें समाज बदलूं शकेल हें कांहीं खोटें नाहीं. पण आम्हांला जशा तऱ्हेचा शोषणरहित, समताधिष्ठित समाज हवा तसा हिंसेच्या मार्गानें बनणार नाहीं. हिंसेचा वापर केला तर कांहीं लोक जनतेच्या उरावर मात्र बसतील. हिंसेच्या मार्गानें गेलों तर जो हिंसा करण्यांत जास्त चतुराई दाखवील त्याचाच विजय होईल. रशियाकडे तर पाहा. क्रांति होऊन तीन तपांवर काळ लोटला. लेनिन म्हणत होता: आम्ही जनतेला हत्यारें देऊन समर्थ बनवूं. पण आतां शस्त्रास्त्रांत केवढा विकास झाला आहे ! आतां बंदुकीचें युग गेलें, अणुबॉम्बचें युग उगवलें आहे आतां इच्छा असली तरी सगळ्या जनतेला समान रीतीनें शस्त्र सज्ज कसें करणार ? रशियांत क्रांतीनंतर तीन तपांनंतरहि सत्ता मूठभर लोकांच्याच हातीं आहे. स्टॅलिनच्या मृत्यूनंतर मॅलेन्कॉव्ह, मोलोटोव्ह आणि बेरिया या तिघांच्या हातीं सत्ता आली. स्टॅलिननंतर कोणाच्या हातीं राज्यसूत्रें राहावीं याबद्दल जनतेला एका शब्दानेंहि कोणी

विचारलें नाहीं, विचारण्याची गरज कोणाला वाटली नाहीं. पुढें मॅलेन्कॉव्ह आणि बेरिया यांच्यांतच जुंपली. पोलीस खातें बेरियाच्या मागें तर सैन्यदल मॅलेनकॉव्हच्या पाठीशीं उभें राहिलें. सैन्यदल पाठीशीं उभें राहतांच सारी सत्ता मॅलेन्कॉव्हच्या हातीं आली, कारण पोलिसदलापेक्षां सैन्य अधिक बलवान् असतें. मग बेरियाला अटक झाली, त्याला फांसावर लटकावलें. काल‌पर्यंत जो विश्वासू मित्र होता तो देशद्रोही ठरला ! हिंसेचा आश्रय जर आपण इथें घेतला तर यापेक्षां फारसें वेगळें होण्याची आशाच नको.

आज हिंसेचा आश्रय करायचा म्हणजे माणुसकीला सुळी द्यायचें. लाखों वर्षांच्या सतत धडपडीनंतर मानव आजच्या विकासपातळी-वर आला आहे. त्याला पुन्हा पशुत्वाकडे लोटणें ही घोडचूक ठरेल. हिंसा ही दोन प्रकारची असते : संघटित आणि व्यक्तिगत. संघटित हिंसाबलानें एखादा प्रश्न सोडवायचा म्हटलें तरी कांहीं नीतिनियमांचें पालन करावेंच लागतें. पण असंघटित हिंसेला नीतिनियमांचें कांहीं बंधन नसतें. असंघटित हिंसा म्हणजे पशुता. आपली संस्कृति शांत-तेचा पुरस्कार करणारी, तिच्याशीं हें सगळें विसंगत आहे. पण आज आज जी समाजव्यवस्था चालू आहे तिच्यांतहि हिंसा कांहीं कमी नाहीं. ही हिंसा जर अन्य मार्गानें निवारली गेली नाहीं तर तिची प्रतिक्रिया हिंसकच होईल आणि सारा समाज होरपळून निघेल.

क्रांति म्हणजे बाह्य फेरफार नव्हे; तसले फेरफार तर सतत होतच असतात. मूल्यपरिवर्तन ही खरी क्रांति आहे. यासाठीं मनुष्याचा स्वभाव बदलावा लागेल. नवा माणूस निर्माण करावा लागेल. प्रेमा-शिवाय नवनिर्माण आणि संवर्धन या गोष्टी शक्य नाहींत. म्हणून नवनिर्मितीचें आणि संवर्धनाचें हिंसा हें साधन होऊं शकणार नाहीं. माणूस बदलूं शकतो, त्याचें हृदय-परिवर्तन होऊं शकतें हा विश्वास

या सर्वांच्या मुळाशीं असला पाहिजे. हा विश्वास नसेल तर लोकशाही म्हणजे एक थोतांड ठरेल. आरशावर धूळ पडून त्यांत चांगल्या वस्तूंचेंहि विकृत प्रतिबिंब पडतें, पण ती धूळ पुसून टाकली कीं तो पुन्हा चमकूं लागतो. माणसाच्या मनावरहि परिस्थितीची अशीच धूळ सांचते; पण ही धूळ पुसून टाकली पाहिजे. माणूस स्वभावतः चांगलाच आहे, वाईट नाहीं. माणूस जर स्वभावतः वाईट असता तर समाजांत वाईटांचीच पूजा चालली असती. पण चांगल्या माणसांची समाजांत पूजा होते, त्याच्यापुढें सर्वांची मान लवते.

गांधीजी प्रथम व्यक्तीला समजावून सांगण्याचा प्रयत्न करीत. विरोधी बाजूला एखादा विचार असला तर त्याच्या नैतिक आधाराचा शोध घेत. असा नैतिक आधार त्या विचाराला नाहीं हें ते दाखवून देत. त्यानंतर चळवळ उभारून विरोधकांवर नैतिक दडपण आणीत. शक्तिशाली लोकमताचा प्रभाव विरोधकांवर पडल्यावांचून राहात नसे. यानंतर अनीतीशीं असहकार करण्याचें पाऊल ते उचलीत. शोषण करूं देण्यांत शोषितांचें सहकार्य शोषकाला मिळत असतें. जर शोषितानें आपलें सहकार्य बंद केलें तर शोषक बलहीन बनतो आणि शोषणाचा अंत होतो.

इंग्रजांशीं गांधीजींनीं या पद्धतीनें लढा दिला. आज समाजरचना बदलण्याचा प्रश्न आहे. या बाबतींत गांधींनीं निर्देशिलेल्या मार्गाचा कसा उपयोग करतां येईल हा बिकट प्रश्न होता. आज विनोबा या पद्धतीची पुनस्स्थापना करीत आहेत. आधीं भूस्वामींनीं मालकी सोडावी यासाठीं त्यांचें मन वळविण्याचा ते प्रयत्न करतात. जमीन-मालकीला कोठल्याहि प्रकारचा नैतिक आधार नाहीं ही गोष्ट त्यानंतर ते सांगतात. जमिनीवर व्यक्तीची मालकी अनीतिमय आहे ही भावना रुजविण्याचा ते प्रयत्न करतात. चळवळींतून धनवानांवर नैतिक

दडपण आणण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. आणि जरूर पडली तर विनोबाजींच्या निर्देशाप्रमाणें कुळें खातेदारांशीं असहकाराहि करतील.

कायद्याच्या गोष्टी कोणी काढतात. पण कायद्यानें जीवन परिवर्तन होऊं शकत नाहीं, ही गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे. चांगलें काम करण्याला कायदा प्रेरणा देऊं शकत नाहीं. कायदा फारफार तर दुर्व्यवहारापासून माणसाला परावृत्त करण्याचा प्रयत्न करूं शकेल. लोकमताशिवाय कायदा पांगळा बनतो. गांधीजी म्हणत असत : हृदयपरिवर्तनाशिवाय कायदा पुस्तकाच्या पानांत बंदिस्त होऊन पडतो. कायदा सांगतो कीं, कुळांना जमिनीवरून हुसकूं नका, पण आज असे प्रकार कितीतरी होत आहेत. कायद्यानें अस्पृश्यता दूर केली, पण समाजांत अजून ती आहेच. विवाहवयावर मर्यादा घालणारा शारदा कायदा झाला म्हणून बालविवाह थांबले आहेत का ? विचारपरिवर्तनाखेरीज कायदा निष्प्रभ बनतो. जमीन-वांटणीचा समजा कायदा झाला तरी मधले लोक भूमिहीनांच्या पदरांत जमीन पडूं देणार नाहींत. जमिनीची जी फेरवांटणी करावयाची त्याचाहि अर्थ समजून घेतला पाहिजे. फेरवांट्याचा अर्थ लोकांना जमीन कायमची द्यायची असा नाहीं. जमीन गांवसमाजाच्या मालकीची असेल. जमिनीचें ग्रामीकरण करावें लागेल. जमिनीची मालकी कोणाला द्यायची नसून आजीविकेचें साधन द्यायचें आहे. जमिनीचें ग्रामीकरण झालें कीं, गांवाच्या योजनेसाठीं आवश्यक आधार निर्माण होईल. गांवाचें आरोग्य, शिक्षण, रक्षण, उद्योग यांच्यासाठीं गांवसमाज योजना ठरवील. जेवढ्या प्रमाणांत आपलीं खेडीं स्वावलंबी व स्वयंपूर्ण होतील तेवढ्या प्रमाणांतच लोकशाही कारभार सार्थ होईल. गांवच्या साधनसंपत्तीची, आयातानिर्यातीची व्यवस्थाहि गांवपंचायतीनें केली पाहिजे. सबंध देश ही एक प्रकारें अमूर्त गोष्ट आहे. ग्रामघटक हा मूर्त स्वरूपांत असल्यानें गांवाला

घटक समजून ज्या योजना बनविण्यांत येतील त्या अधिक उत्साह निर्माण करूं शकतील. पशुसंवर्धन व पिकांची उत्पादन-वाढ ह्या-बाबत गांवपंचायत जागरूक प्रयत्न करूं शकेल. जीवनासंबंधींच्या जास्तींत जास्त बाबींचें शासन गांवांतून झालें पाहिजे. सत्तेचें क्रमशः विभाजन करून जास्तींत जास्त सत्ता गांवांना देण्यानेंच शोषणरहित समाजरचना बनण्याला मदत होईल. १९४२ मध्यें लुई फिशरनें त्यांना विचारलें कीं, या लढ्यांत किसानांचें काय होईल ? तेव्हां गांधीजी म्हणाले, किसान जमिनी ताब्यांत घेतील. जमीनदारी खतम होईल. जमीनदारांना मोबदल्यांत एक पैहि मिळणार नाहीं. स्वातंत्र्या-नंतर ते ज्वालामय झाले होते. त्यांनीं लिहून ठेवलें आहे : समतेशिवाय स्वराज्याचें काम एक दिवसभर देखील चालूं शकणार नाहीं.

* * *

भांडवलशाही समाज शोषणावर अधिष्ठित असतो. शोषण-पद्धतीचे तीन विभाग आपण करूं शकूं. कर्ज, व्याज, गहाणरहाण यांच्यांतून जें शोषण होतें त्याला फायनॅनशियल कॅपिटॅलिझम—सावकारी भांडवल-शाही—म्हणतात. दुसरा प्रकार कमर्शियल कॅपिटॅलिझम किंवा व्यापारी भांडवलदारांची आणि तिसरा प्रकार इंडस्ट्रियल कॅपिटॅलिझम किंवा औद्योगिक भांडवलशाहीचा. हे तीनहि प्रकार नाहींसे झाले म्हणजे बऱ्याच अंशानें शोषण थांबतें. पहिल्या दोन प्रकारची भांडवलशाही फार जुनी आहे. औद्योगिक भांडवलशाहीचा विकास साम्राज्य-प्रस्थापना व वैज्ञानिक साधनांचा शोध यांच्यामुळें झाला आहे. ह्या पद्धतीमुळें श्रमिक उत्पादन साधनांपासून वंचित झालें. महा उत्पादनाचीं साधनें निर्माण झाल्यामुळें तीं घेणें श्रमिकाच्या आवाक्यांत राहिलें नाहीं. या पद्धतींत श्रमिकाला आपले श्रम विकण्याशिवाय गत्यंतर राहिलें नाहीं. उत्पादन-साधनांची उत्पादन-शक्ति वाढल्यामुळें कमी मजुरांवर भागूं

लागलें. बेकारी वाढली. श्रमशक्तीचा भाव उतरला व शोषण वाढलें. आपल्या निर्मितींतून कांहीं भाग केवळ औजारांच्या मालकीखातर दुसऱ्याला द्यावा लागण्यांतून शोषण होत असतें. आरंभीं भांडवलदारांत स्पर्धा होती. एकमेकांचें शत्रुत्व होतें. पण तेहि संघटित होऊन परस्परांचे पोषण करूं लागले. जास्तींत जास्त फायदा आपल्या पदरीं पडावा या उद्देशानें उत्पादन होऊं लागलें. नफा होतो तो यंत्रसामुग्री, कारखान्याच्या जागा, कच्चा माल यांतून होत नाहीं. नफ्याचें मूळ श्रमांत आहे. श्रमाच्या चोरींतून नफेबाजी फोफावते म्हणून श्रम विकण्याची पाळी मजुरांवर येणार नाहीं अशी रचना केली पाहिजे. यासाठीं उद्योगधंद्यांच्या राष्ट्रीयीकरणाचा म्हणजे एका अर्थानें सरकारी करणाचा मार्ग मार्क्स प्रभृतींनीं सुचविला आहे. याचाच अर्थ खासगी भांडवलदारांची जागा सरकारी भांडवलशाहीनें घ्यावयाची. पण या प्रक्रियेंतहि शोषणाचें निरसन होत नाहीं.

शोषणाचें निरसन करावयाचें तर औजारें अशीं असलीं पाहिजेत कीं ज्यांच्यावर मजुरांची मालकी असेल. जीवनावश्यक प्राथमिक गरजा या पद्धतीनें भागल्या पाहिजेत. कांहीं औजारें गांवाच्या सामुदायिक मालकीचीं असतील. कांहीं बाबतींत क्षेत्र–स्वावलंबनाचें धोरण ठरवावें लागेल. कांहीं थोडे उद्योग असे याउपरहि राहतील कीं जें संबंध राष्ट्राच्या दृष्टीनें चालवावे लागतील. अशा धंद्यांचें संचलन राष्ट्र करील. जास्तींत जास्त कच्च्या मालाचा पक्का माल गांवांतच बनावा. जो गांवांत पक्का करतां येणार नाहीं तो ग्रामगटांनीं पक्का करावा. अशा प्रकारें औद्योगिक धोरण ठरविलें तरच औद्योगिक भांडवलशाही व शोषण थांबेल. गांधीजींनीं याच दृष्टीनें ग्रामोद्योगांवर भर दिला होता. हिंदुस्थानांतलें मानवबळ उपयोगांत आणण्याच्या व सर्वांना रोजी देण्याच्या दृष्टीनें हाच एक उपाय आहे.

क्रांति अनंत काळ चालत नाहीं. क्रांति म्हणजे मर्यादित काळांत झालेलें आमूलाग्र परिवर्तन. आपापल्या छोट्या स्वार्थाला लोक इतके चिकटून बसले आहेत. सर्वांगीण क्रांतीसाठीं तळमळ लागलेले क्रांतीच्या घोषणा करणाऱ्यांतहि किती आहेत. सत्ता हातांत घेण्यावर सर्वांचा भर आहे. जनशक्तीची उपासना कितीजण करतात. मग क्रांति कशी होणार ? पण आज विनोबा जनशक्तीची जोपासना करीत आहेत. १९५७ पूर्वीं सर्वांचें मूळ असलेली भूमिसमस्या सोडविण्याचा त्यांचा निर्धार आहे. ते तर म्हणतात ह्या अवधींत केवळ आर्थिकच नव्हे तर सामाजिक आणि राजकीय क्रांति झालेली ते पाहूं इच्छितात. भूदान मिळतें तें हृदयपरिवर्तन होऊन मिळत नाहीं असें कांहीं म्हणतात. विनोबांचें त्यांना असें सांगणें आहे कीं जर जमीन–मालकांचें हृदय न बदललें तर भूदानामुळें आमच्याजवळ एक सेना तर उभी राहील. ते गांवोगांव फिरून अशी सेना जमवीत आहेत आणि आम्ही मात्र ‘ जनता, जनता ’ म्हणून कंठशोष करीत आहोंत. जमिनीच्या फेरवांटणीच्या नांवावर तर आपण निवडणुका लढलों. तसें पाहिलें तर विनोबा आपलेंच काम करीत आहेत. ते स्वतःहि तसें म्हणतात. मग त्यांच्या ह्या कामांत सर्व शक्तीनिशीं मोठ्या संख्येनें सामील होणें कर्तव्यरूप ठरतें.

स्वतंत्र लोकशाही देशांत सामान्यतः हिंसक मार्गांचा अवलंब करण्याची आवश्यकता राहणार नाहीं असें मला वाटत होतें; परंतु आपलें ध्येय साधण्यासाठीं एखाद्या विशिष्ट परिस्थितींत तात्कालिक हिंसेचा आश्रय कदाचित् करणें भाग पडेल असें मला वाटत होतें. पण आतां माझी खात्री झाली आहे कीं हिंसेतून कांहींहि निष्पन्न होणार नाहीं. हिंसेचा त्याग केल्याशिवाय गत्यंतरच नाहीं. माझ्या ह्या विचारपरिवर्तनामुळेंच मी भूदानाकडे वळलों आहें. लोक म्हणतात :

जर जमीनदारांनीं संघटितपणें भूदान-यज्ञाला विरोध केला तर? त्याला तोंड देण्याची आमचीहि तयारी असली पाहिजे. आमची अहिंसा निष्क्रिय असतां कामा नये. अहिंसक शक्तीनें अशीं कामें आपण करून दाखविलीं पाहिजेत कीं जीं हिंसक शक्तीनें साधणें कठीण आहे. भूदानयज्ञामुळें अशी शक्ति निर्माण होत आहे. भूमिहीन जागृत होत आहेत. त्यांना आपल्या अधिकाराचें भान झालें आहे. जर एखाद्या गांवांत कांहींनीं जमीन दिली आणि कांहींनीं दिली नाहीं तर भूमिहीनांच्या मनांत विचार येतो कीं, ज्यांनीं जमीन देऊन आपल्याविषयीं सहानुभूति दाखविली नाहीं त्यांच्या शेतावर कशाला काम करावें? ह्याच भावनेला असहकाराची भावना म्हणतात. शोषित जनता जेव्हां आपल्या शोषणांत सहकार्य देण्याचें नाकारील तेव्हां अहिंसक शक्ति निर्माण होईल.

* * *

समाजवादी विचारांतून आर्थिक क्रांतीचे जे नवे विचार निर्माण झाले त्यांना काँग्रेसची अधिकृत मान्यता मिळावी म्हणून गांधीजींनीं प्रयत्न तर केले; परंतु तें कार्य पूर्ण होण्यापूर्वींच त्यांची जीवितयात्रा समाप्त झाली. वर्गहीन समाज आर्थिक समानता आणि संपत्तीवर सामाजिक स्वामित्व या गोष्टींना साऱ्या देशाची मान्यता मिळवून देण्याच्या बाबतींत गांधीवादी अडथळा तर करणार नाहींत अशी शंका गांधीजींच्या निर्याणानंतर लोकांच्या मनांत येत होती. लोकांच्या मनांतील ही शंका विनोबांनीं दूर केली. सत्याग्रही तत्त्वज्ञानाच्या पोटांत समाजवादी तत्त्वज्ञान सामावून घेणें शक्य आणि आवश्यक आहे याची प्रचीति विनोबा आज आणून देत आहेत. त्यांच्या सर्वोदय तत्त्वज्ञानांत आर्थिक समता आणि आर्थिक क्रांति यांचे विचार समाविष्ट आहेतच.

भूदान-यज्ञ हें स्वातंत्र्योत्तर काळांतलें एक महान् आंदोलन आहे. भूदान—यज्ञामुळें जमिनींच्या न्याय्य फेरवांटणीसाठीं अनुकूल वातावरण मोठया वेगानें तयार होत आहे. लहान लहान किसानहि जमीन देत असल्यानें संपत्तीच्या मालकीबाबत एक नवीन दृष्टिकोन समाजांत मूळ धरीत आहे. जमिनीच्या किंमती पडत असल्यानें मोबदल्याचा प्रश्न सोपा होत आहे. भूमिहीनांना जमिनी मिळत असल्यानें त्यांना सहकारी शेतीसाठीं उद्युक्त करणें शक्य आहे. बेजमीन लोकांना ज्या प्रमाणांत आणि ज्या पद्धतीनें जमिनी दिल्या जात आहेत त्यामुळें कमालमर्यादा ठरविण्याचा आणि वांटपांत वशिलेबाजी पक्षपात होण्याचा प्रश्नच मिटतो. भूदानामुळें फार मोठ्या प्रमाणावर जनसंपर्क प्रस्थापित होत आहे आणि लोकमत तयार होत आहे. ग्राम-नवरचनेचें काम वांटपा-बरोबरच सुरू होईल. ग्रामोद्योगांना उत्तेजन देणें, त्यांत काम करणारांना संघटित करणें, ग्रामोद्योगांचें संशोधन करणें, सहकारी पद्धतीनें मालाची विक्री करणें, हीं कामें महत्त्वाचीं आहेत. खाणी आणि महा उद्योगांत सुमारें ३८ लाख लोकांना काम मिळतें आणि वर्षांत ६४० कोटि रुपयांचं उत्पन्न निघतें. ग्रामोद्योग व छोटे उद्योग यांच्यांत सुमारें दीड कोटींना काम मिळतें आणि ८०० कोटींची पैदास होते. जर ग्रामो-द्योगांच्या दृष्टीनें लोकमत अनुकूल झालें तर त्यांची व्यापकता आणि क्षमताहि वाढेल. भूदान-यज्ञामुळें हें काम सुकर होईल.

◆◆ ◆◆

# भूदान यात्रा

" Socialism begins with the first convert—आत्मपरिवर्तनानें समाजवादाचा आरंभ होतो." असें गांधीजी म्हणत असत. असा आरंभच जर झाला नाहीं तर समाजवादाच्या बाजूनें हात वर करणाऱ्या एकापुढें एक मांडलेल्या शून्यांची किंमत शून्य होते. उलट आत्मपरिवर्तनांतून पहिल्या समाजवाद्यानें आपल्या समाजवादी जीवनाचा पहिला भरभक्कम आंकडा आरंभीं उभा केला कीं त्या प्रत्येक शून्याला अर्थ निर्माण होतो. गांधीजींच्या ह्या उद्गारांत एक महान् तत्त्व सामावलेलें आहे. आपल्याहून अधिक खालच्या पातळीवर असणारांना आपल्या जवळ असलेल्यापैकीं योग्य वांटा देण्याची प्रेरणा जोंवर आपल्याला होत नाहीं तोंवर इतरांजवळचें ओरबाडून घेण्याची तयारी करणें म्हणजे द्वेषमत्सराची उपासना करणें, स्वतःच्या जीवनांतून समाजवादाचा आरंभ करण्याची प्रेरणा जयप्रकाशांना देशांत फारशी कुठें दिसत नव्हती. जोंवर असें होत नाहीं तोंवर जीवनांत समाजवादी मूल्य दाखल झालें आहे असें कसें म्हणावें? कांहीं लोक सर्वस्वाचा त्याग करून अंगीं विभूति चर्चून संन्यास घेणारे देशांत दिसत, पण त्यांच्या त्या त्यागाला सामाजिक अधिष्ठान नसे. सामाजिक संबंधांतूनच मूल्य निर्माण होत असतें. ज्यानें आप्तेष्ट मित्र, पूर्व चरित्र या सर्वांचा त्याग केला त्याचें त्यागी जीवन ही व्यक्तिगत साधना होते, त्यांतून सामाजिक नवमूल्य निर्माण होत नाहीं.

समाजवादी तत्त्वज्ञानाचा प्रसार करणाऱ्यांच्या जीवनांत अपेक्षित समाजरचनेचें ओझरतें दर्शन घडण्याइतपताहि त्याचें प्रतिबिंब पडतांना

आढळत नव्हतें. समाजवादी तत्त्वज्ञानाचे भाष्यकारहि आपल्या जीवनांत तें आणण्यासाठीं कायद्याची वा क्रांतीची वाट बघत असलेले दिसत होते. जयप्रकाशांना ही विसंगति वेदना देत होती. किमान आणि कमाल उत्पन्नांत दहा पटींपेक्षां अधिक फरक असूं नये असा धोशा लावणारेहि आपल्या अधिक उत्पन्नाचा त्याग करावयाला तयार नाहींत आणि जमीन-धारणेची कमाल मर्यादा अमुक असणें देशाच्या आर्थिक प्रगतीच्या दृष्टीनें हितावह आहे असें आंकडेवारीनें सिद्ध करणारे आपण होऊन आपल्या अधिक जमिनीची फेरवांटणी करायला तयार नाहींत असें दृश्य दिसत होतें. एकाच्या तोंडांत समाजवाद होता, दुसरे समाजवाद बोलत नव्हते. समाजवादी कायदा किंवा क्रांति आली तर एकजण आनंदानें तिचें स्वागत करायला तयार होते; दुसरे नाइलाजानें बळी पडायला तयार होते, एवढाच त्यांच्यांत फरक. कायदा किंवा क्रांति याखेरीज आपला आसक्ति सोडायला दोघांचीहि अनिच्छा. आपल्या गरजा कमी करून आनंद मानण्याची तयारी दोघांची तितकीच आणि प्रत्यक्ष त्यागांत फारसा फरक नाहीं. आपल्या लोकशाही समाजवादाच्या आदर्शाचा नमुना आपल्या जीवनांत निर्माण करून लोकांना त्याचा प्रत्यय आणून द्यावा अशी प्रेरणा अभावानेंच बहुधा दिसे. त्यामुळें समाजवादाचा सर्वत्र गजर होत असूनहि लोकांना तो मतलबीपणा असल्याचा संशय येई. एकमेकांशीं हेवादावा करण्याला, द्वेष वाढविण्याला ह्या घोषणेचा उपयोग केला जात आहे असेंच सामान्यत: लोकांना वाटे. स्वप्नरंजी समाजवादी, पोथीनिष्ठ समाजवादी, शाब्दिक समाजवादी अशीं बिरुदें एकमेकांना बहाल करण्याचा मात्र सपाटा सर्वत्र चालला होता.

समाजवाद म्हणजे देण्याची लाट समाजांत उसळाविणें. आपल्यापेक्षां खालच्या पातळीवरच्या लोकांशीं समरस होण्याची तयारी झाली

कीं समतेसाठीं आवश्यक असें लोकमत संघटित होतें. अशा सुजाण लोकमतांतूनच लोकशाही क्रांति होते, यांतूनच एकसंध समाज निर्माण होतो. आपल्या जवळचें जतन करीत आपल्यापेक्षां वरच्या आर्थिक पातळीवरच्यांचें ओढून घेण्यासाठीं धडपड सुरू झाली कीं समाजांत सर्वत्र उतरंडी आणि हेवेदावे निर्माण होतात. प्रभावी लोकमत निर्माण होत नाहीं. अधिक संपत्ति मिळविण्यासाठीं शोषण करणारांशीं असहकार आणि कमी संपत्तिमानांसाठीं आपल्या थैल्या मोकळ्या करणें यांतूनच समाजवादी समाजरचनेची प्रचीति आणून देतां येईल. सर्वत्र घेण्याची भाषा, देण्याची आस मात्र कोठेंच नाहीं. शोषकांशीं सहकार्य करीत त्यांना परिपुष्ट करावयाचें आणि त्यांच्याशीं दोन हात करावयाच्या बाता मारायच्या असें दृश्य देशांत सगळीकडे दिसत असतांना विनोबांनीं देण्याची चळवळ सुरू केली. ‘ दरिद्रान् भर कौंतेय ’ अशी घोषणा करीत ते समाजाला प्रबोधन करीत देशांत संचार करीत होते. विषमतेविरुद्ध एक प्रकारचें वातावरण देशांत निर्माण होऊं लागलें. लोकमत समतेच्या दृष्टीनें प्रभावी होत असल्याचा प्रत्यय येऊं लागला. जयप्रकाशांनीं भूदानाच्या कामाला सुरुवात केली.

हृदयपरिवर्तन, आचारपरिवर्तन व समाजपरिवर्तन हा ह्या नव-क्रांतीचा त्रिपदा गायत्रीमंत्र होता. जयप्रकाशांची स्वतःची संपत्ति अशी कांहींच नाहीं. धनप्राप्तीचा व्यवसाय त्यांनीं कधीं केली नाहीं. परंतु सिताबदियारा गांवांत त्यांची वडिलार्जित जमीन होती. विनोबा येतील, दान मागतील. मग ती जमीन आपण देऊं असा विचार जयप्रकाशजींनीं केला नाहीं. हृदयपरिवर्तनांतून समाजपरिवर्तन करावयाचें तर स्वतःच्या आचारांत परिवर्तन करणें हाच एकमेव मार्ग असतो. जयप्रकाशजींनीं आपली जमीन आपल्या गांवांतल्या भूमि-हीनांना वांटून दिली. गांधीजींच्या कल्पनेप्रमाणें आत्मपरिवर्तनांतून

समाजवादाचा मंगल श्रीगणेशा केला. गांवांत शंभर जणांचें एक सर्वोदय मंडळ बनविलें. ग्रामीकरणांतून शोषणरहित, समताधिष्ठित समाजाची निर्मिति होईल असें त्यांना वाटतें. ग्रामीकरणाची आपली कल्पना त्यांनीं पुढीलप्रमाणें व्यक्त केली आहे : " ग्रामीकरण मालकी हक्क विसर्जनावांचून शक्य नाहीं. मालकी हक्क विसर्जनाचें इच्छित भूदान–यज्ञाच्या मार्गानें साध्य होत असल्यानें भूदान-यज्ञाच्या दरवाजांतूनच ग्रामीकरणाच्या दालनांत प्रवेश करतां येतो. गांवांतील प्रमुख उत्पादन साधन जमीन. त्या जमिनीवर गांवसमाजाची मालकी प्रस्थापित झाली म्हणजे गांवच्या इतर प्रमुख उत्पादन-साधनांवरहि सामुदायिक मालकी प्रस्थापित होईल. जमिनीच्या मशागतीसाठीं लागणारीं औजारें सहकारी पद्धतीनें गांव ठेवील. ग्रामीकरणाचा स्पर्श जीवनव्यापी असला पाहिजे.

"प्राथमिक गरजांच्या बाबतींत, स्वावलंबी
व्यवस्थेच्या बाबतींत, स्वयंशासित
स्वामित्वाच्या बाबतींत, सामुदायिक
औजारांच्या बाबतींत, सहकारी
विकासाच्या बाबतींत, आत्मनिर्भर
राष्ट्रीय गरजांच्या बाबतींत अन्योन्याश्रयी

अशी आर्थिक व सामाजिक व्यवस्था निर्माण करणें हें ग्रामीकरणाचें ध्येय आहे." आपल्या गांवांतील सर्वोदय मंडळामार्फत हें ध्येय साकार व्हावें असा जयप्रकाशजींचा प्रयत्न आहे.

स्वतःच्या विचारा-आचारांत परिवर्तन करून जयप्रकाशजी भूदान मागण्याला निघाले. प्रांतोप्रांतीं, गांवोगांव फिरूं लागले. उपवासानंतर त्यांची प्रकृति नीट अशी कधीं सुधारलीच नाहीं. त्यांतच मधुमेहानेंहि दोस्ती केली. परंतु जयप्रकाशांनीं विश्राम घेतला नाहीं. विनोबा त्यांच्या

प्रांतांत फिरत होते. अंगांत मलेरिया मुरलेला, वयाची साठी गांठलेली, पण सूर्याच्या नियमितपणानें त्यांची यात्रा चालू होती. विनोबांनीं जयप्रकाशांच्या पत्नी प्रभावती देवी यांच्या पत्रांत लिहिलें : " फसल तैयार है, काटनेवालोंकी कमी है ! " पीक तयार आहे पण कापणी करणारांची कमतरता आहे. याला काय म्हणावें ! हें केवढें दुर्दैव ! ज्याच्यासाठीं कष्ट उपसावे, तळमळावें तें वाढून दारापुढें आलेलें असतांना माणसाला काळझोप लागावी तसें होत आहे. जयप्रकाशजींनीं अधिक वेगानें कामाला सुरुवात केली. आळस असा त्यांना ठाऊकच नाहीं. भूदानाच्या वेगवेगळ्या पैलूंबाबत बोलायचा कंटाळा नाहीं. विनोबांना जसा अनुभव आला तसाच त्यांनाहि आला. सद्भावनेची लाट विहारमध्यें उसळली. दातृत्वाला पूर आला. सगळीकडे स्पर्धा, हेवेदावे, द्वेषमत्सर सहकारीहि जेथें शत्रु वाटतात, अशा काळांत आपल्या चतकोरांतला नितकोर देण्याची उदारता आढळत होती. दुर्भावनेच्या जागीं सद्भावना वाटणें, सहकारी हा शत्रु वाटण्याऐवजीं शेजारी सगासंबंधी वाटणें, ही का क्रांति नाहीं ? आळशावर गंगा आली, पण तो जागचा हलला नाहीं अशी स्थिति होतां कामा नये. जयप्रकाशांना एकच एक ध्यास-भूदानांतून नवसमाज-रचना.

एका गांवांत जयप्रकाशजी भूदान मागण्यासाठीं गेले. मामुली गांव पण दान देण्यांत लोकांत जणुं स्पर्धा लागली. एक कार्यकर्ते उठले त्यांनीं आपली सगळी जमीन दान म्हणून जाहीर केली. गांवकऱ्यांच्या डोळ्यांत पाणी उभें राहिलें. केवढा अलौकिक त्याग. राष्ट्रीय चळवळींत त्यांनीं भाग घेतलेला, देहदंड सोसलेला. पण तो त्याग वसूल करण्याची किंचितहि वृत्ति नाहीं. उलट पुन्हा सर्वस्व दानाची तयारी. जयप्रकाशांचेहि डोळे भरून आले. गांवकरी म्हणाले : "त्यांच्याजवळ उपजीविकेचें दुसरें साधन नाहीं, तुम्ही जमीन घेऊं नका. "

“ माझी जमीन तुम्हीं घेतली पाहिजे. माझ्यापेक्षां ज्यांना तिची गरज आहे असे लोक आहेत. आणि या पुण्यपवित्र कार्यापासून कां मला वंचित ठेवणार ?” तो कार्यकर्ता म्हणाला.

“ गांवकरी सांगतात तें जर खरें असेल तर तुमची जमीन मी कशी स्वीकारूं ? ” जयप्रकाश म्हणाले.

“ तें कांहीं नाहीं, माझी जमीन तुम्ही स्वीकारून मला ह्या यज्ञांत सहभागी केलेंच पाहिजे, नाहींतर मला अन्नसत्याग्रह करावा लागेल !” तो कार्यकर्ता निर्धारानें म्हणाला. जयप्रकाश दुविध्यांत पडले.

इतक्यांत एक दुसरा गांवकरी उठला. तो म्हणाला. “ घ्या तुम्हीं त्यांची जमीन. माझ्या जमिनींतला तुकडा मी त्यांना दिल्याचें जाहीर करतों. ”

भारतीय आत्म्याचें दर्शन जयप्रकाशांना झालें. सर्वदूर घेण्याची स्पर्धा चाललेली असतांना त्या गांवांत एकमेकांना जमीन देण्याची अहमहमिका चालू होती. सद्भाव चक्राला अशा घटनांनींच गति मिळते. आणि हा अनुभव कांहीं एकाकी नव्हे. जागजागीं असे अनुभव येत होते. “ दिवसेंदिवस भूदान–यज्ञावरील माझी श्रद्धा बळकटच होत आहे, ” असें जयप्रकाश म्हणूं लागले.

रंगूनला आशियायी समाजवाद्यांची परिषद भरली. जयप्रकाशांशिवाय आशियायी समाजवादी परिषद कशी होणार ? जयप्रकाश तेथें गेले. त्यांचे विचार समजून घ्यायला वेगवेगळ्या देशांचे प्रतिनिधि उत्सुक होते. जयप्रकाश तेथेंहि भूदानाचा संदेश देऊन गेले. “ आशियायी क्रांतीचा आधार किसान हाच असेल. किसानांच्यामध्यें नवजीवन आणावयाचें, उत्साहाचा संचार करावयाचा तर जमिनीची फेरवांटणी झाली पाहिजे. आशियायी देशांच्या मागसल्या स्थितींत येथील लोकक्रांति अहिंसक मार्गानेंच झाली पाहिजे. भूदानयज्ञ

अशा लोकक्रांतीचा एक नमुना आपल्यापुढें उपस्थित करीत आहे! आशियायी समाजवादी संमेलनानंतर ही लोकक्रांति आपल्या डोळ्यांनीं पाहावी यासाठीं कांहीं परदेशी समाजवादी मित्र जयप्रकाशांसमवेत त्यांच्या पदयात्रेंत सामील झाले. त्या दिवशीं ज्या खेड्यांत पदयात्रा गेली त्या खेड्यांतील सर्व लोकांनीं भूदानांत आपली सर्व जमीन समर्पण करून नव्या क्रांतीचें ओझरतें दर्शन त्या प्रतिनिधींना घडवलें.

गया जिल्ह्यावर सर्व शक्ति केंद्रित करावी असा विनोबांचा विचार होता. भगवान् बुद्धांच्या निवासानें व प्रवासानें पवित्र झालेली ही भूमि. ह्या जिल्ह्यांत जर जनशक्तीनें भूमिसमस्या सोडवितां आली तर इतरांना तो एक पदार्थ पाठ होईल. याच दृष्टीनें त्यांनीं आंदोलनाची व्यूहरचना केली. विनोबांच्या या कामांत जयप्रकाश सामील झाले. गया जिल्ह्यांत त्यांनीं पदयात्रा आरंभिली आणि हजारों एकरांचीं दानपत्रें मिळविलीं. समतेचा संदेश त्यांच्या भाषणांतून सर्वत्र घुमला.

पण जमीन मिळविणें हेंच कांहीं केवळ काम नाहीं. नव्या जमिनीची फेरवांटणी, ग्रामीण व्यवसायांचा पुनरुद्धार, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण यांची व्यवस्था अशीं कितीतरी कामें व्हायला हवीं. ह्या कामांशिवाय ही क्रांति पूर्ण होणार नाहीं. कार्यकर्त्यांना शिक्षण हवें. मोठ्या प्रमाणावर कार्यकर्ते हवेत. त्यांच्या निर्वाहाची सोय लावली पाहिजे. जिल्ह्याजिल्ह्याला एकेक आश्रम स्थापन करून तेथें कार्यकर्त्यांच्या निवाऱ्याची, शिक्षणाची सोय करावी; हा आश्रम एक आदर्श म्हणून जनतेपुढें राहावा असें ठरलें. जयप्रकाशांनीं एका आश्रमाचें संचालन करावयाचें ठरविलें. ह्या नवक्रांतीचें नेतृत्व मागें राहून करतां येत नाहीं. अवघडांतील अवघड जबाबदारी पत्करील तो

नेतृत्व करूं शकतो. जयप्रकाशांनीं गया व मुंगेर जिल्ह्यांच्या सीमेवरील सोखोदेवरा ह्या गांवाची निवड केली. गया शहरापासून ६३ मैलांवर हें खेडें वसलें आहे. वाहतुकीचीं साधनें नीट नाहींत. पायीं प्रवासच सोयीचा पडतो. भाग सगळा जंगली. वस्ती आदिवासींची. चार पांचशें घरें असतील नसतील.

या गांवालाहि इतिहास आहे. समाजवाद्यांची ओळख गांवाशीं आहे. पूर्वीं समाजवाद्यांच्या नेतृत्वाखालीं येथें बकाश्त आंदोलन झालें. त्या चळवळीमुळें शेतमजुरांना ३५० बिघे जमीन मिळाली. जयप्रकाश गेल्या वर्षीं तेथें भूदानाच्या कामानिमित्त गेले तेव्हां तेथील १५० इसमांनीं आपलीं सर्वच्या सर्व म्हणजे २६० एकर जमीन भूदानांत समर्पण केली. त्या मागासल्या भागांतील लोकांचा हा त्याग अतुलनीयच समजला पाहिजे. त्यांच्या ह्या त्यागामुळें त्यांनीं जयप्रकाशांना आपल्यांत ओढून घेतलें. जयप्रकाशांनीं याच ठिकाणीं आपला आश्रम सुरू केला आहे. सौंदर्यदृष्टीनें जागा अप्रतिम आहे. त्या सौंदर्यांत आतां समृद्धि आणायची आहे. डोंगर–उतरणीवर शेती पिकवायची आहे. जयप्रकाशजींच्या सहकाऱ्यांनीं तेथें तळ ठोकला आहे. जमिनीची मशागत सुरू आहे. वृक्षारोपण मोठ्या प्रमाणावर करण्यांत आलें आहे. कार्यकर्त्यांसाठीं साध्याच पण सोयीच्या झोपड्या तयार झाल्या आहेत.

सोखोदेवरा या केंद्रांतून त्या भागांत आतां नवजीवनाचें वारें शिरेल. आश्रमांत शिक्षणाची सोय करण्यांत आली आहे. शेतीचें शिक्षण तेथें मिळेल. इतर ग्रामोद्योग सुरू होतील. उत्पादन–वाढ आणि समता ह्या दोन पावलांनीं आदर्श–समाजाकडे गांवाची प्रगति होईल.

* * *

तरुणांमधली ध्येयशून्यता, बेफिकिरी, आळस यांची जयप्रकाशांना खंत वाटते. किती क्षुद्र, खुरटलेलीं जीवनें ! त्यांत साहसाला कुठें जागाच नाहीं. तरुणांत साहसाची गोडी हवी. ध्येयासाठीं बेहोष होण्याचा उत्साह हवा. पण सर्वत्र एक प्रकारचा भित्रेपणा. स्वत:च्या हिंमतीवर नवीन कांहीं करावें, रुळलेल्या रस्त्याच्या पलीकडे जाऊन नवी वाट शोधावी असें कोठें होतांना दिसत नाहीं, चाकोरीबाहेर पडण्याची तयारी नाहीं. पुरुषार्थाची प्रेरणा नाहीं. जयप्रकाशांना याची भारी खंत वाटते. अनुभवांतून जिवंत शिक्षण घ्यायची हिंमत फारशी कोठें दिसत नाहीं. विद्यार्थ्यांच्या सभांत जयप्रकाश गेले कीं, त्यांच्या ह्या भावना व्यक्त होतात. शब्दांच्या, घोषणाच्या पलीकडे जाऊन कृतीच्या क्षेत्रांत विद्यार्थ्यांनीं शिरावें असा त्यांचा आग्रह असतो.

पुण्याजवळ हडपसरला सेवादलाचा श्रमदान मेळावा भरला होता. जयप्रकाशांना मुद्दाम आमंत्रण दिलें होतें. जयप्रकाश दुरून मेळाव्याला आले. पोषाखीवृत्ति टाकून तीन हजार तरुण फावडीं-कुदळीं घेऊन काम करतांना पाहून त्यांना आनंद झाला. ह्या तेजस्वी तरुणांतून निदान शंभर तरुण वर्षभर भूदान यज्ञाला मिळावेत अशी कल्पना त्यांच्या मनांत आली. त्यांनीं एकेक वर्ष या कामासाठीं द्या म्हणून तरुणांना आवाहन केलें. कांहीं नांवें आलीं, पण तेवढ्यानें जयप्रकाशांना समाधान झालें नाहीं. शेवटच्या दिवशीं रात्रीं अकरा वाजतां ते मेळावा छावणींत एकटेच आले. कोणाला कल्पना नव्हती. त्यांनीं जिल्ह्याजिल्ह्याच्या सैनिकांमध्यें जाऊन चर्चा केली. आपल्या जीवनांतले दाखले दिले. एक वर्ष भूदानाला देण्यानें शिक्षण अधिक सजीव, तेजस्वी होईल, पूर्वी सत्याग्रहाच्या काळांत शाळा–कॉलेजांना रामराम ठोकून विद्यार्थी तुरुंगांत जातच होते. मग आतांच ते असे भित्रे कां बनले ? स्वातंत्र्यापेक्षां समाजवादी समाजरचना आणण्याचें ध्येय

का कमी स्फूर्तिदायी आहे? विनोबा म्हणतात: "यशानें नम्रता आणि अयशानें उत्साह हा यश आणि अयश यांचा कर्मयोगांतील विनियोग आहे." भूदान-यज्ञांत जेथें सफलता मिळाली तेथें जबाबदारीच्या जाणिवेनें जयप्रकाश नम्र होतात. जेथें त्याच्या बोलांना साद मिळत नाहीं तेथें त्यांचा उत्साह दुणावतो आणि ते कामाला लागतात. जयप्रकाश हे कर्मयोगी क्रांतिकारक आहेत.

◆◆ ◆◆ ◆◆

मराठी ग्रंथ संग्रहालय. ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम 20969 वि.
क्रमांक नों: दि:
REFBK-0008941